

# Ajintha

1963

M. J. ARTS & SCIENCE COLLEGE, JALGAON

MISCELLANY

★ प्रदीप क्लॉथ सेंटर, जळगांव ★

[ महात्मा गांधी रोड, म्यु. ऑफिसजवळ ]

आमचेकडे : –

सर्व प्रकारचीं जरीचीं व सुतीं ❀ पातळें ❀ व ❀ प्रिन्टेड साड्या ❀

कोईमतूर, कांजीवरम्, म्हैसूर हॅन्डलुम साड्या, चंदेरी वॉश ॲन्ड वेअर साड्या

— तसेंच —

सर्व प्रकारचें नित्योपयोगी ❀ फॅन्सी कापड ❀ व ❀ चादरी ❀

किफायत भावाने मिळेल.

प्रदीप क्लॉथ सेंटर,

महात्मा गांधी रोड, म्यु. ऑफिसजवळ, जळगांव

महाराष्ट्रांत सर्वांत जास्त खप असलेले मराठी

: लोकप्रिय दैनिक :

* लो क स त्ता *

वाचण्यास विसरूं नका

ज ग वांतील एकमेव एजंट—

श्री. ए. जे. गोरे, नवी पेठ, जळगांव.

∘ रविवारची लोकसत्ता ∘ इंडियन एक्स्प्रेस ∘ सन्डे स्टॅन्डर्ड ∘ स्क्रीन ∘ फायनॉन्सियल एक्स्प्रेस ∘

— या सर्वांचे एकमेव विक्रेते —

श्री. ए. जे. गोरे

नवी पेठ, जळगाव.



# मूळजी जेठा आर्ट्स् व सायन्स कॉलेज

— नियतकालिक —

# ★ अजिंठा ★

* मुख्य संपादक *

प्रा. ज. वि. महाजन

* विद्यार्थी–प्रतिनिधि *

श्री. एस्. एस्. भोळे

वर्ष १७ वें ] मार्च १९६३ [ अंक १७ वा

संपादक मंडळ

* प्राचार्य या. शि. महाजन
* प्रा. ज. वि. महाजन
* प्रा. म. ना. अदवंत
* प्रा. अं. गं. चिपळूणकर
* प्रा. शं. र. पुणतांबेकर
* प्रा. व्ही. एल्. पुरोहित
* प्रा. इफ्तिकार अहमद
* श्री. एस्. एस्. भोळे (विद्यार्थी-प्रतिनिधि)


अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| संपादकीय | ... | ... | १ ते ६ |
| मराठी विभाग | ... | ... | १ ते ५८ |
| हिंदी विभाग | ... | ... | १ ते १२ |
| इंग्रजी विभाग | ... | ... | १ ते २८ |
| उर्दू विभाग | ... | ... | १ ते ४ |




# संपादकीय

## झडल्या फैरी रणांगणावर !

आलम दुनियेच्या दरबारांत ज्यांच्या साफ दानतीची मातब्बरांच्या मतविरोधाला न जुमानतां आम्ही हमी देत होतों, ज्यांना विश्वाच्या विश्वस्तसभेंत मानाचं स्थान मिळवून देऊं असा आमचा विश्वास होता, त्यांनीच आमच्या विश्वासाला सुरुंग लावला. महाकवि कालिदासाने मानदंड म्हणून गौरविलेल्या हिमालयाच्या शुभ्र बर्फाच्छादित शिखरांवर 'हिंदी चिनी भाई भाई !!' या मैत्रीची चिरफाड केली. ऐन दिवाळींत आमच्या भलेपणाचें, पंचशीलेंचें साफ दिवाळें वाजविलें. १९६२ सालांतील जगांतील प्रमुख घटना म्हणून भारतावरील चिनी आक्रमणाचा निर्देश करावा लागेल. जगाच्या कोन्याकोपऱ्यांतून या घटनेसंबंधी साद-पडसाद उमटले. सैतानावर ताण करणारी, मानवतेच्या मुखांत माती लोटूं पाहणारी, विश्वशांतीला हादरा देणारी, सीमेचें निमित्त साधून आपल्या पाशवी प्रवृत्तीचें प्रदर्शन दाखवून जगाला संहाराच्या खाईत लोटूं पाहणारी ही चीनची प्रवृत्ति, कृति पाहून भारतांतीलच काय पण श्रेष्ठ जीवनमूल्यांवर श्रद्धा असणाऱ्या जगांतील कोणत्याहि माणसाला चीड आल्यावाचून राहिली नसेल. एकेक ठाणं घशांत घालीत चिनी अजगर पुढे सरकत होता आणि आमचें सर्वस्व पणाला लावून आम्ही प्रतिकार करीत होतों. साऱ्या भारतभर प्रतिकाराची एक प्रचंड लाट उसळत होती. मित्रराष्ट्रांनी सहकार्याचा हात दिला. प्रतिकाराचा बुलन्द आवाज घुमूं लागला. त्यागाची, बलिदानाची अहमहमिका सुरू झाली. तटस्थांनी युद्धतहकुबीचें आवाहन केलें. भारताची संघटन, संरक्षण शक्ति बळावली हें पाहून वा अन्य कुटील नीतीचा अवलंब करून चीननें एकतर्फी युद्धतहकुबीचें व माघारीचें प्यादें पुढे सरकविलें. आणि जगासमोर आपण शांतताप्रेमी, सहजीवनावर विश्वास ठेवणारे असल्यचा आभास निर्माण केला. पण भारताने हें कुटील कारस्थान जाणलें. सर्व आघाड्यांवर संरक्षणकार्याचीं चक्रें वेगाने फिरूं लागलीं. आक्रमणाचा पुरा बिमोड करावयाचा या निश्चयाने संपत्ति, शस्त्रशास्त्र या दृष्टीने सज्जतेची कारवाई सुरू झाली.

## संरक्षणकार्यास हातभार

या राष्ट्रीय आपत्तीमुळे निर्माण झालेली आणीबाणीची परिस्थिति लक्षांत घेऊन कॉलेजांतील सर्व मंडळाच्या एकत्र झालेल्या बैठकींत कॉलेजचें वार्षिक स्नेहसंमेलन, स्थगित ठेवण्याचा निर्णय घेण्यांत आला. त्याचप्रमाणे इतर मंडळांचीं स्नेहसंमेलनें न भरवितां ती रक्कम संरक्षण निधीस द्यावयाचें ठरलें. त्याप्रमाणे मराठी वाङ्मय मंडळ, सायन्स असोसिएशन, आर्ट्स सर्कल, लेडीज असोसिएशन इ. नी आवश्यक तेव्हढे कार्यक्रम करून उरलेली रक्कम संरक्षणनिधीस दिली. तसेंच प्राचार्य, प्राध्यापक, क्लार्क, प्यून यासह सर्व कॉलेज स्टाफने ही आणिबाणीची परिस्थिति चालू असेपर्यंत दर महिन्याला एक दिवसाचा पगार देण्याचें ठरविलें.

या प्रयत्नांत कांही विद्यर्थ्यांनीं निधीस केलेल्या मदतीचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. कु. सुषमा जोगळेकर ( द्वितीय वर्ष, बी. ए. ) या विद्यार्थिनीने तिला मिळालेली सर्वच्या सर्व कॉलेजस्कॉलरशिप निधीस दिली. त्याचप्रमाणे श्री. ठाकूर अरविंदसिंग योगराजसिंग परिहार या विद्यार्थ्याने ५१ रु. निधीस दिले. तर श्री. नरेंद्र शंकर पाटील या विद्यार्थ्याने आपल्या हांतांतील सोन्याची अंगठी अंदाजे ९ मास वजनाची संरक्षणनिधीस दिली.

अशी ही सर्व रकम सुमारे ६५२० रु. संरक्षण निधीस देण्यांत आली.

## इमर्जन्सी रायफल ट्रेनिंग

'शुरूं हुआ है जंग हमारा !' या ईर्षेने आमचे प्राध्यापक कॉलेजच्या मैदानावर सैनिकी शिक्षण व्यावयास उभे राहिले तें दृश्य अतिशय स्फूर्तिप्रद होतें. नोव्हें. डिसें. या दोन महिन्यांत प्राध्यापकांकरितां सैनिकी शिक्षणाचा एक खास वर्ग १८ महाराष्ट्र बटालियनचे ऑफिसर कमांडिंग मे. दबडधाव व प्रिं. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यांत आला. रायफल, पिस्तोल, लाइट मशिनगन, हॅन्डग्रेनेड यासंबंधीचें शिक्षण या वर्गांत देण्यांत आलें. प्राध्यापकांचा उत्साह व त्यांची तयारी विशेष दिसून आली. हा वर्ग चालू असतांना प्रा. पोतनीस, प्रा. जोशी, श्री. दीक्षित यांची देखरेख होतीच. हा शिक्षणक्रम संपल्यानंतर प्रत्यक्ष गोळीबाराचें प्रात्यक्षिक करण्यांत आलें. त्यांत प्रिं. महाजन यांनी दाखविलेलें नेमबाजींतील प्राविण्य उल्लेखनीय होतें.

## सन्माननीयांचा गौरव

या वर्षी २६ जाने. रोजीं झालेल्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपतींनी हल्ली मध्यप्रदेशचे राज्यपाल असलेले श्री. हरीभाऊ पाटसकर व प्रख्यात विद्वान संशोधक डॉ. काणे यांना अनुक्रमें "पद्मभूषण" व "भारत-रत्न" या पदव्या देऊन त्यांचा जो सत्कार केला त्याबद्दल त्या दोघांचें हार्दिक अभिनंदन करतांना आम्हांस अतिशय अभिमान व आनंद वाटत आहे. श्री. हरीभाऊ पाटसकर हे तर आमच्याच जिल्ह्यांतील. भारत सरकारचे कायदेमंत्री म्हणून त्यांनी केलेली कामगिरी सर्वांना परिचित आहेच. त्यांच्या सत्काराने एक प्रकारें जळगांव जिल्ह्याचाच हा सत्कार झाला आहे. डॉ. काणे यांचा व्यासंग, संशोधन क्षेत्रांतील त्यांची कामगिरी, संस्कृत, इतिहास व धर्मशास्त्र या विषयांवरील त्यांचें प्रभुत्व, व या विषयांत त्यांनी मिळविलेली आंतरराष्ट्रीय कीर्ति, त्यांचें ऋषितुल्य जीवन आज साऱ्या भारताला ज्ञात आहे.

या उभयतांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

## स्वामी विवेकानंदांचें पुण्यस्मरण

या वर्षी भारतांत सर्व ठिकाणीं स्वामी विवेकानंद यांचा जन्मशताद्बि महोत्सव साजरा होत आहे. भारतांत अनेक युगपुरुष झालेत. त्यांत 'स्वामी विवेकानंदांची प्रामुख्याने गणना करावी लागेल. महान देशभक्त, थोर तत्त्वज्ञानी, अप्रतिम वक्ते, भारतीय तत्त्वज्ञानाचे व जीवनाचे प्रभावी प्रचारक, निःसंग कर्मयोगी, राष्ट्रप्रेमाने भारावलेला संन्यासी अशा विविध नात्याने स्वामी विवेकानंद भारताला व जगाला परिचित आहेत. भव्य शरीरयष्टि, विशाल नेत्र, विस्तीर्ण भालप्रदेश, तेजस्वी मुखमंडल, ओजस्वी धीरगंभीर वाक्प्रवाह यांच्या जोरावर स्वामींनी अखिल विश्वावर मोहिनी घातली होती. श्रीकृष्ण व अर्जुन याप्रमाणेच स्वामी रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद ही गुरुशिष्यजोडी भारतीय परंपरेंत अमर झाली आहे. अंतरात्म्याचें सामर्थ्य जाणून घेऊन तें प्रत्यक्ष कार्याने अविष्कृत करण्याची ईर्षा बाळगणाऱ्या प्रत्येक माणसाने आधी स्वतःमधील वाईट प्रवृत्तीवर जय मिळविला पाहिजे म्हणजे मग तो जगहि जिंकेल, अशी स्वामीजींची शिकवण होती. त्याचप्रमाणे, करुणा जागृत होऊन प्रेमाने सेवातत्पर होण्याची प्रेरणा प्रत्येकाला झाली पाहिजे. म्हणूनच स्वतः व्यक्तीने निर्भय बनावें, भौतिकांतील नश्वर संपत्तीचा अभिलाष सोडावा आणि स्वत्व प्रकट करण्या-साठी अंतर्मुख बनावें असें स्वामीजी आपल्या देश बांध-वांना उत्कटपणे सांगतात. या शताद्बीच्या निमित्ताने स्वामीजींच्या चरित्राचा आणि शिकवणीचा आदर्श प्रत्येकाने आपल्या डोळ्यासमोर ठेवावा असें आम्हांस वाटतें. या शताद्बीच्या निमित्ताने आम्ही त्यांच्या पुण्य-स्मृतीला अभिवादन करतों !



या शताद्बीच्या निमित्ताने जळगांव येथे जी स्वामी विवेकानंद जन्मशताद्बि महोत्सव समिति स्थापन झाली आहे त्या समितीचें अध्यक्षपद प्रिं. या. शि. महाजन यांचेकडे असून प्रा. मो. स. भाव हे त्या समितीचे एक चिटणीस आहेत.

## आमचा दाता गेला

दि. २५ सप्टें. ६२ रोजीं श्रीमान चत्रभुज गोरधनदास यांचें देहावसान झालें. ही बातमी ऐकून आम्हाला अतिशय दुःख झालें. श्रीमान् शेट यांच्या दानशूरतेमुळेच कॉलेजची स्थापना, भरभराट होऊं शकली. कॉलेजसंबंधी शेटजींच्या मनांत अतिशय आस्था व प्रेम होतें. त्यामुळे कॉलेजला आलेल्या अडचणींत ते स्वतः लक्ष घालीत असत व उदारपणे सहाय्य करीत असत. त्यामुळेच आपल्या कॉलेजचा दिसतो तेव्हढा विकास झाला आहे. शेटजींनी केलेल्या अमोल सहाय्या-बद्दल संस्था शेटजींची सदैव ऋणी राहील. शेटजींच्या निधनामुळे कॉलेजचा एक मोठा अधार गेला असें आम्हांस वाटतें. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांना झालेल्या दुःखांत आम्ही सहभागी आहोंत. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो !

## कॉलेजवार्ता

नेहमीप्रमाणे २० जूनला कॉलेज सुरू झालें. याहि वर्षी सुरुवातीस प्रत्येक वर्गातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमा-संबंधी व कॉलेजमध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती देण्यांत आली. यावर्षी बी. कॉम् चा तृतीय वर्षाचा वर्ग सुरू करण्यांत येऊन बी. ए. ; बी. एस्सी. प्रमाणे बी. कॉम् च्या पूर्ण शिक्षणक्रमाची सोय झाली.

नव्यानेच आलेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आश्चर्यमिश्रित आनंद व उत्साह दिसत होता. त्यांतहि यंदा कॉलेजचे निकाल चांगले होते. बी. एस्सी. परीक्षेत आपल्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांनी मिळविलेलें यश अपूर्व होतें. यश संपादनाची परंपरा अशीच चालूं राहो.

## सन्माननीयांच्या भेटी

याहि वर्षी आपल्या कॉलेजांतील विविध संस्थांच्या उद्घाटनाच्या व कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक मान-नीय व्यक्तींनी कॉलेजला भेट दिली. प्रिं सुरू, मुंबई; प्रिं. आर् एम्. मराठे (धुळें) ; प्रिं. कोगेकर (पुणें); प्रिं. बॅनर्जी (मुंबई) ; श्री. जी. एच्. रानडे हे विद्यापिठाच्या वतीने कमिशनचे सदस्य म्हणून आले. त्यावेळीं प्रिं. सुरू, प्रिं. बॅनर्जी, प्रिं. कोगेकर यांच्या उपस्थितींत झालेला प्रश्नोत्तरांचा भरगच्च कार्यक्रम आमच्या सदैव स्मरणांत राहील. काव्यशास्त्रविनोदाने रंगलेला तो कार्य-क्रम अपूर्व असाच होता.

प्लॅनिंग फोरमच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने श्री. एस्. एम्. जोशी; श्री. बी. जे. खताळ, उपमंत्री, महा-राष्ट्रसरकार हे येऊन गेलेत. तर डिबेटिंग युनियनच्या कार्यक्रमांच्या निमित्ताने मराठींतील सुप्रसिद्ध संशोधक व टीकाकार डॉ वि. भि. कोलते यांच्या व्याख्यानाचा लाभ घडला. तसेंच सायन्स असो. व बॉयॉलॉजी असो. यांच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ अरणीकर ( पुणें विद्यापीठ ); डॉ. चिं. श्री. कर्वे (मुंबई); डॉ. आपटे (पुणें ; डॉ. देवरस (मुंबई) यांची शास्त्र विषयांवरील माहितीपूर्ण व मनोरंजक व्याख्यानें ऐकावयास मिळालीं. त्याचप्रमाणे श्री. स. गो. बर्वे अर्थमंत्री, महाराष्ट्र सरकार; डॉ. रफीक झकेरिया, उपमंत्री, महाराष्ट्र सरकार; प्रा. ग. प्र. प्रधान (पुणें); श्री. एम्. सुंदरम् (रोटरी गव्हर्नर) यासारख्या मान्यवर व्यक्तींनी कॉलेजला भेटी दिल्या. सेवापथकाच्या निमित्ताने श्री. भाऊसाहेब रानडे यांनी भेट दिली.

## नवागतांचें स्वागत व निरोप

यावर्षी पुढीलप्रमाणे स्टाफवर नवीन नेमणूका झाल्या—

| | | |
|---|---|---|
| प्रा. एम्. बी. प्रभु | — | इंग्रजी विभाग |
| प्रा. सौ. नाडकर्णी | — | ,, |
| प्रा. ए. जी. कर्णिक | — | बॉयॉलॉजी विभाग |
| प्रा. एल्. एन्. मुलबागल | — | ,, |
| प्रा. एम्. के. येवले | — | विज्ञान विभाग |
| प्रा. आर. जी. मिजार | — | कॉमर्स विभाग |
| प्रा. डी. एच्. बोरोले | — | ,, |
| प्रा. रा. कृ. प्रभुदेसाई | — | ,, |

डेमॉन्स्ट्रेटर म्हणून विज्ञानशाखेत श्री. व्ही. इ. वाणी, श्री. आर. एल्. माळी, श्री. एस्. एस्. पोतनीस यांची नेमणूक करण्यांत आली. या सर्वांचें आम्ही

हार्दिक स्वागत करतों. हे सर्व नवागत तरुण, उत्साही व अभ्यासु आहेत. कॉलेजच्या उज्ज्वल परंपरेंत ते चांगली भर घालतील असा विश्वास प्रगट करतों.

आपल्या वाचनालयांत काम करीत असलेले श्री. केशव भिकाजी सोनवणी हे ग्रंथपालन वर्गाच्या सरकारी प्रमाणपत्र परीक्षेत द्वितीय श्रेणींत उत्तीर्ण झाले.

प्रा. पी. टी महाजन सुमारे ९।१० वर्षांपासून कॉलेजमध्यें काम करीत होते. व आपल्या मनमोकळ्या स्वभावाने त्यांनी सर्वांचीं मनें जिंकलीं होतीं. त्यांचें विषयांतील प्राविण्य व शिकविण्याची हातोटी यामुळे ते विद्यार्थ्यांत चांगले प्रिय झाले होते जिल्हा शिक्षणाधिकारी या मानाच्या व अधिकाराच्या जागेवर त्यांची निवड झाल्याने ते कॉलेज सोडून गेले. त्या क्षेत्रांतहि त्यांचा नांवलौकिक वाढेल अशी आशा वाटते.

त्याचप्रमाणे प्रा. एन्. जी. बापट यांनाहि नगर येथील कॉलेजमध्ये वरची जागा मिळाल्याने ते कॉलेज सोडून गेले. त्यांच्या बोलक्या व मोकळ्या स्वभावाची आम्हांस सदैव आठवण राहील. श्री. एम्. व्ही. आठवले पुणें विद्यापीठांत पीएच्. डीच्या संशोधनासाठी गेले. त्यांचें प्रसन्न व्यक्तिमत्व आमच्या नेहमी लक्षांत राहील. त्याचप्रमाणे स्टाफ व विद्यार्थी यांच्यांत खूप प्रिय असलेल्या प्रा. सौ. तारळेकर यांनी राजिनामा दिल्यामुळे त्यांच्या बोलक्या, उत्साही, कर्तव्यतत्पर अशा व्यक्तिमत्वाची उणीव जाणवल्यावाचून रहणार नाही. प्रा. सौ. तारळेकर यांचा इंग्रजी वाङ्मयाचा व भाषेचा व्यासंग कौतुकास्पद होता. वक्तृत्त्वपूर्ण निवेदनशैली, विषयावरील प्रभुत्व त्यामुळे त्यांचे तास विद्यार्थ्यांना पर्वणीसारखे वाटायचे.

डेमॉन्स्ट्रेटरपैकीं श्री. झोपे ए. इ., श्री. पाटील बी. के., श्री. पंडित एम्. एस्. हेहि या ना त्या निमित्ताने कॉलेज सोडून गेले. त्या सर्वांना आम्ही सुयश चिंतितों.

## विविध संस्थांचें कार्य

आपल्या कॉलेजांतील संस्था किती कार्यक्षम आहेत हें शेवटीं छापलेल्या त्या त्या संस्थांच्या वार्षिक अहवालांवरून लक्षांत येण्यासारखें आहे विद्यार्थ्यांच्या सुप्त सामर्थ्याला संधि देणें हा या संस्थांच्या कार्याचा मुख्य उद्देश असतो. विविध कला, साहित्य, क्रीडा या क्षेत्रांत या वर्षी आपल्या विद्यार्थ्यांनी चांगलेंच कौशल्य व प्राविण्य दाखविलें आहे. या वर्षी आणिबाणीच्या परिस्थिती मुळे स्नेहसंमेलनें स्थगित करून त्याप्रित्यर्थ खर्च होणारी सर्व रक्कम राष्ट्रीय संरक्षणनिधीस देण्याचा स्वयंस्फूर्त निर्णय घेऊन विद्यार्थ्यांनी एक श्रेष्ठ आदर्श निर्माण केला आहे. त्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचें हार्दिक अभिनंदन! सायन्स असोशिएशन, मराठी वाङ्मय मंडळ, वादविवाद सभा, कलामंडळ, प्लॅनिंग फोरम, लेडीज असोशिएशन, बॉटॉलांजी असोशिएशन, एन्. सी. सी. व या वर्षी नव्यानेच उत्साहाने स्थापन झालेली इंग्लिश लिटररी असोशिएशन यांनी भरगच्च कार्यक्रम सादर केले. कलामंडळाचें 'प्रदर्शन'; मराठीवाङ्मयमंडळाचा 'मराठी कविता दर्शन'; लेडिज असोशिएशनचा 'आनंद बाजार'; इंग्लिश लिटररी असोशिएशनचें रंगलेलें 'प्रश्नोत्तर मनोरंजन' या अभिनव कार्यक्रमांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. एन्. सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी या वर्षी देवळालीं येथे झालेल्या कॅम्पमध्यें सर्वच्या सर्व शील्डस् मिळविली. या वर्षी कलामंडळानें "कलाविश्व" व मराठी वाङ्मय मंडळाने "हिरवळ" ह्या दोन भित्तिपत्रिका सुरू केल्या. हे दोन्ही उपक्रम अभिनव व अभिनंदनीय असेच आहेत. "हिरवळ" मधून उदयोन्मुख व होतकरू विद्यार्थी-लेखकांचें लिखाण सादर करण्यांत येत असे, तर "कलाविश्व" मधून विद्यार्थ्यांच्या उत्तमोत्तम चित्रकलाकृति सादर केल्या गेल्या या दोन्ही उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सृजनशक्तीचा विकास होण्यास चांगली मदत होईल अशी खात्री वाटते.

या सर्व कार्यक्रमांबद्दल व कौशल्याबद्दल विद्यार्थ्यांचें मनापासून अभिनंदन! यापुढेहि अशीच कॉलेजचा नांवलौकिक वाढविणारी परंपरा विद्यार्थी चालू ठेवतील अशी आशा वाटते!

## वादविवाद सभेस मानाचें पान

य.वर्षी बाहेरगांवीं झालेल्या विविध वक्तृत्व स्पर्धेत, आपल्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व असें यश संपादन केलें. (१) नगर येथे झालेल्या वादविवाद स्पर्धेत कु. कुमुदिनी कानडे या विद्यार्थिनीस प्रथम पारितोषिक मिळालें. (२) पुणें येथे पुणें विद्यापीठातर्फे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धेत कु छाया केळकर हीस प्रथम पारितोषिक मिळालें. तर कु. छाया केळकर व श्री. प्र. ल. जोशी यांची पुणें विद्यापीठातर्फे दिल्ली



येथे झालेल्या आंतरविद्यापीठ वादस्पर्धेसाठीं निवड झाली. (३) औरंगाबाद येथे झालेल्या राटरी क्लब शील्ड वादस्पर्धेत कु. मिनाक्षी पळसुले व श्री. भोळे यांना शील्ड मिळालें. ही स्पर्धा इंग्रजी भाषेंतून होती. त्यामुळे कु. पळसुले व श्री. भोळे यांनी मिळविलेलें यश विशेष कौतुकास्पद आहे. (४ पुणें येथे झालेल्या स्वामी विवेकानंद जन्मशताब्दि महोत्सव वादस्पर्धेत कु. मीनाक्षी पळसुले हिला द्वितीय पारितोषिक मिळालें. या सर्व अभूतपूर्व यशाबद्दल या सर्व विद्यार्थ्यांचें व वादविवाद सभेचे चेअरमन प्रा. सु. का. जोशी, सेक्रेटरी श्री. वाणी यांचें हार्दिक अभिनंदन!

## अभिनंदन व नवीं प्रकाशनें

प्रि. या. शि. महाजन यांची जळगांव जिल्हा परिषदेच्या अर्थ समितिवर निवड झाली. त्यांच्या व्यासंगाचा व प्रेरक मार्गदर्शनाचा जिल्हा परिषदेस निश्चितपणे लाभ होईल. हार्दिक अभिनंदन!

यंदा आमच्या प्राध्यापक वर्गाचीं खालील प्रकाशनें प्रसिद्ध झालीं:—

(१) प्रा. म. मो. केळकर—
 १) भासनाटकत्रयम् (संपादन)
(२) प्रा. एम्. एम्. थत्ते—
 1) Themes in inorganic chemistry.
(३) प्रा. व्ही. एल्. पुरोहित—
 1) Fundamentals of Physics (in press)
(४) प्रा. म. ना. अदवंत—
 १) महाराष्ट्र लक्ष्मी (कवि विनायकांच्या निवडक कवितांचें संपादन)
(५) प्रा. राजा महाजन—
 १) गौरव गीतमाला.

## आमचें वसतिगृह

प्रा. म. द. नाडकर्णी यांच्या कुशल मार्गदर्शनाखालीं वसतिगृहाचें कार्य अत्यंत पद्धतशीर व शिस्तबद्ध रीतीने चाललें आहे. या वसतिगृहांतहि यावर्षी विद्यार्थ्यांच्या अभ्यास मंडळाच्या वतीने १५ ऑ. रोजीं निबंधस्पर्धा घेण्यांत आली. सानेगुरुजी जयंति साजरी करण्यांत आली. वसतिगृहाचें स्नेहसंमेलन स्थगित करून ती रक्कम निधीस देण्यांत आली. या वसतिगृहाच्या उजव्या बाजूस एक निळसर रंगाची उभ्या आगपेटीच्या आकाराची एक टुमदार अशी इमारत बांधून पूर्ण झाली आहे. तें आहे आमचें नवीन वसतिगृह. मोकळा प्रदेश, आजूबाजूस ऋतुमानाप्रमाणे बदलणारा निसर्ग, वरती विस्तीर्ण निळसर आकाश, चढउतारावरील जमिनीवर दिसणाऱ्या या वसतिगृहाच्या, कॉलेजच्या इमारती म्हणजे लाटांवर हेलकावे घेणाऱ्या लहान मोठ्या जहाजाच्या काफिल्यासारख्या वाटतात. या नवीन वसतिगृहांत पुढच्या जूनपासून जवळ जवळ ७५ विद्यार्थी राहूं लागतील. या नव्या बांधल्या जाणाऱ्या इमारतीमुळे आपल्या कॉलेजच्या शिल्पवैभवांत अधिकाधिक भर पडत आहे!

## हा अंक

आणिबाणीची परिस्थिति लक्षांत घेऊन हा अंक आहे त्या स्वरूपांत प्रकाशित करीत आहोंत. काटकसरीचें धोरण म्हणून ग्रुप फोटो, दृश्य फोटो, कार्टून्स व प्रत्येक विभागचीं कांही पानें कमी करून बचत होणारी रक्कम (जवळ जवळ एक हजार रु.) निधीस द्यावयाचा निर्णय संपादक मंडळाने घेतला. या निर्णयाशी सर्व सहमत होतीलच.

## आभार

हा अंक तयार करतांना आम्हांस सर्वांचेंच सहाय्य झालें आहे. विद्यार्थी–विद्यार्थिनींनी व प्राध्यापक वर्गाने आम्हाला तत्परतेने साहित्य देऊन अंक दर्जेदार करण्यास मदत केली.

डेक्कन प्रिंटिंग प्रेसचे श्री. नेहेते गुरुजी यांनी नेहमीप्रमाणे हा अंक आकर्षक स्वरूपांत छापून दिला. त्यांचे आणि आमचे गोड ऋणानुबंधामुळे त्यांचे आभार मानलेले त्यांना आवडणार नाहीत. त्यांच्या छापखान्यांतील कामगार वर्गाशीहि या कामानिमित्ताने जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले आहेत. कामास वेग केव्हा द्यावा हें तेहि चांगले जाणतात. त्यामुळे "अजिंठा" छपाईच्या

या कामांत मोठें वैशिष्ट्यपूर्ण अनुभव येतात. चित्रशाळा प्रेसचे श्री. दामुअण्णा रानडे यांनी लवकर ब्लॉक्स करुन दिल्याबद्दल त्यांचें हार्दिक आभार !

संपूर्ण अंकाच्या संपादनकामाचा हा माझा पहिला अनुभव. वेळोवेळीं अडचणी जाणवत असत. त्या त्या वेळीं प्राचार्य महाजन व प्रा. अदवंत यांचेकडे मी धाव घेत असे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हें संपादनाचें काम मी पूर्ण करूं शकलों. या अंकाचें जें यश असेल तें त्यांच्याच मार्गदर्शनाचें फळ आहे.

शेवटीं ज्ञानेश्वरांच्या शब्दांत रसिकांना हीच विनवणी:—

तऱ्ही न्यून तें पुरतें । अधिक ही सरते
करूनि घेयावें हें तुमतें । विनविलें मियां ॥



## चुकीची दुरुस्ती–

Officers' Training Unit साठी More B. M. यांची निवड झाल्याचें चुकून छापलें गेलें आहे. त्याऐवजी तें नांव More S. D. असें वाचावें.

## Our Donor



The Late Shriman CHATRABHUJ GORDHANDAS

# शेट चत्रभुज गोरधनदास

मुंबई शहरांतच नव्हे तर संर्व देशभर आणि परदेशांतहि ज्यांची कीर्ति पसरली होती, असे एक आदर्श आणि साहसी उद्योगपति, दिलदार स्वभावाचे, ज्यांनी लाखो रुपयांचा दानधर्म आपल्या हयातींत केला असे मुलजी जेठा आणि कंपनीचे मालक व आपल्या कॉलेजचे दाते श्रीमान्शेठ चत्रभुज गोरधनदास यांचें दुःखद् निधन २५ सप्टेंबर ६२ रोजीं झालें. शिक्षणासारख्या पवित्र कार्याला शेटजींनी सदैव सढळ हाताने मदत केली आहे. जळगांवकरांना तर त्यांच्या दातृत्वाचें आजपर्यंत व यापुढेहि सदैव स्मरण राहील. भारतांतील विविध संस्थाना देणग्या देऊन ' हस्तस्य भूषणं दानं ' हें सुभाषित त्यांनी आपल्या कृतीने सार्थ करून दाखविलें आहे.

उद्योगी, धन–विद्यासमृद्ध व नांवालौकीकास चढलेल्या आपल्या घराण्याची कीर्ति त्यांनी आपल्या स्वतंत्र नेत्रदीपक कर्तृत्वाने दिगंत पसरविली. सन १८३४ मध्यें नाळ आणि काथ्या या धंद्याची मुळजी जेठा आणि कंपनीनें सुरवात केली. आणि १८५४ मध्यें, शेठ साहेबांचे एकुलते एक पुत्र सुंदरदास शेठ यांनी आपल्या व्यवहार चातुर्याने आणि कुशल बुद्धीने तिला अलौकीक स्वरूप प्राप्त करून दिलें. स्टॉक एक्श्चेंज कंपनी आणि कॉटन मिल याची सुरवात त्यांनी १८७० मध्यें केली. या धंद्याची सुरवात प्रथम मुंबई, मद्रास आणि जळगांव येथें करून त्याला आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळविली व त्याच लौकीकाचे मुंबईमध्यें मुळजी जेठा मार्केट हें भव्य मार्केट बसविलें व कराची येथेहि एक आलीशान मार्केट बांधले.

शेठ चत्रभुज यांच्यावर अनेक, विशाल आणि मातब्बर संस्थाची जबाबदारी पडलेली होती, ती तर त्यांनी पार पाडलीच परंतु आणखीहि कित्येक नवीन योजना त्यांनी आखून त्या कार्यक्षम केल्या. अनेक धार्मिक आणि सामाजिक संस्थाशीं त्यांचें नांव निगडित झालें आहे. त्यांनी केलेल्या दान धर्माची, सत्कृत्याची आणि सेवेची यादीच द्यावयाची झाली तर पानेंच्या पानेंच भरतील. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे त्यांनी केलेल्या दानधर्माचा आकडा अंदाजे पाऊण कोटी रुपयाएवढा सहज होईल. पण हें फक्त त्यानांच माहीत कारण त्यांचा स्वभाव असा होता कीं, उजव्या हाताने दिलेलें दान डाव्या हाताला माहीत होत नव्हतें. नुकतेच त्यांनीं चार नवे ट्रस्ट सुरू केले आहेत. साडेतीन लाखाचा एज्युकेशन ट्रस्ट, साडेपंधरा लाखाचा जनरल ट्रस्ट नंतर भिरंजा हायस्कूल आणि पार्ला ट्रस्ट वगैरे आहेत.

त्यांनी निरनिराळ्या धार्मिक कृत्यांत अत्यंत आस्था दाखविली. त्याचप्रमाणे गरीब आणि निराधार लोकांसाठी स्वस्त धान्याचीं दुकानें उघडलीं व अनेक ठिकाणीं स्वस्त दूध विक्रीचीं केंद्रें उघडलीं त्यांची परोपकारीवृत्ति अतिशय आदर्श अशी होती. त्यांनी आपली दृष्टी केव्हाहि स्वजातीपुरती संकुचित ठेविली नव्हती. सर्व धर्मांच्या व ज्ञातीच्या कल्याणाकरिता त्यांनी अहर्निश खटपट केली व प्रत्येक धर्माच्या लोकांत त्यांच्या उदार वृत्तीचा फायदा मिळविलेला मनुष्य निश्चितपणे मिळालेला दिसेल.

त्यांचा स्वभाव अत्यंत शांत व प्रेमळ असल्यामुळे त्यांचा मित्रपरिवार फार मोठा होता. जळगांव येथे त्यांनी वॉटर वर्क्स, हायस्कूल, मार्केट, मुळजीजेठा आर्टस् आणि सायन्स कॉलेज, जळगांव त्याचप्रमाणे मुंबईत, शेठ गोर्धनदास मेडीकल कॉलेज, जामनगर येथे भाटीया बोर्डिंग, आयुर्वेद मेडीकल कॉलेज, बनारस हिंदु युनिव्हर्सिटीचें मुंबईचें गीतागृह आणि भाटीया जनरल हॉस्पिटल यासाठी अगणित पैसा खर्च करून स्थापना केली. आपल्या कॉलेजला त्यांनी जेव्हढी देणगी दिली तेव्हढी देणगी महाराष्ट्रांतील कुठल्याहि कॉलेजला मिळालेली नाही. यावरूनहि त्यांच्या दानशूर स्वभावाची चांगलीच ओळख होते.

अशा या महान व्यक्तीची समाजांतील उणीव अनेक दिवस जाणवल्याशिवाय रहाणार नाही.

या महान दानशूर आत्म्याला परमेश्वर चीरशांती देवो व त्यांच्या कुटुंबियांना झालेलें दुःख सहन करण्याचें सामर्थ्य देवो एवढीच परमेश्वराजवळ विनंति आहे.



# अजिंठा

## *मराठी विभाग*

साहित्य हें ईश्वराइतकें व्यापक व त्याच्या प्रभावाइतकें समक्ष आहे. ईश्वराचें वर्णन विष्णुसहस्रनामसुद्धा करूं शकलें नाही. श्रुतीने वर्णन करूनसुद्धा जो दशांगुळें उरला, स्मृतींनासुद्धा ज्याचा ठाव घेतां आला नाही अशा ईश्वरा प्रमाणे साहित्य हें आहे. शब्दांत असून शब्दातीत आहे. अर्थांत विलसत असलें तरी त्याचें वैराग्य त्यापलीकडे आहे. आकाश-विरहित स्थान नाही, असें सर्जन नाही कीं, ज्याचें जनकत्व पृथ्वीकडे नाही. तसेंच जविनांत असें कांही नाही कीं, ज्यांत साहित्याचा भाव दिसून येत नाही. जेथे आकाश तेथे अवकाश त्याचप्रमाणे जेथे जीवन तेथे साहित्य आहे. आणि तें स्थिर नाही. प्रवाही आहे. नित्य चिंतन करणारें आहे. नित्य सत्याचें शोधन करणारें आहे.

श्री. न. वि. गाडगीळ

( अध्यक्ष : मराठी साहित्य संमेलन, १९६२ सातारा )

# उन

सोबत साधुनी आकाशाची
सफेद ढग हे उगाच फिरती
गिरक्या मारीत सूर्याभवती ;
खवचट वारा.
थंडीची ही शाल घेऊनी
धक्के मारी, दिसेल त्याला ;
हवा धुक्याच्या पडद्यामागुनी
काढी अपुली भीषण पंक्ति
दांताची ही चावे घ्याया
येईल त्याला,
कारण नसतां मुकेच होऊन
पाणी, नकळत घेते चावा
नाग विषारी, स्पर्शील त्याला ;
आणिक झाडें उभीं राहतीं
भुतासारखीं,
घालून चिंध्या, पिवळ्या काळ्या
आणि पसरून फांद्या ;
उन एकलें, सरळ, गोमटें
निरलस फिरतें गायीमागून
हिरव्या पिवळ्या गवतावरती,
तत्पर येई, अंगणातल्या वेलीपाशीं
करीत चाळा नाजुक जाईसंगे कातर;
प्रेमळ मोठें,
गवाक्षांतूनी उतरुन येतें
हात फिरवितें संकोचाने
दुपट्यावरल्या बाळावरुनी
गोंडस, सुंदर येऊन बसते
सोबत करण्या,
परसदारच्या आजीपाशी
आणि नंतर आज्ञाधारक,
सूर्यामागे चालूं लागे.

—अविनाश वामनराव अत्रे
प्रथम वर्ष, बी. ए.



# व्यथा

कशी कळावी तुला एका चांदणीची व्यथा
कशी कळावी तुला एका फुलाची कथा
कसें कळावें तुज एका निर्झराचें गान
नाही कधी ऐकलें दुःखी पाखराचें मन

तूं असतेस सदा चांदण्यासवे खेळत
नाही तुझी अजून आसवांशी ओळख
कशा कळाव्या तुज भावना वेड्या मनाच्या
भावना आहेत तुझ्या अथांग सागराच्या !

—' भावना '

* × *

# धाप

धाप लागली लाटांना, फेस तोंडात साकळे
वारा वाहून थकला, फांद्याफांद्याशी विलगे
चालले हे वेगे ढग, चंद्र त्यांत अडकला
तुझ्या स्वप्नांच्या राउळीं, वेध मलाहि लाभला !

— पद्माकर लाभसेटवार
द्वितीय वर्ष, बी. एस्सी.

# चित्र

नभाकडे झुकणारा
आम्रवृक्ष उभा ताठ
गवताच्या शय्येपाशीं
शांत राही सदा काठ ॥ १ ॥

मानवांची खळबळ
येई त्याच्या नित्य कानीं
शब्दातीत वेदनेंत
जळतसे परि मनीं ॥ २ ॥

वज्रवेधी झंझावात
देई त्याला घट्ट मिठी
झुलतांना असा परी
कधी ढळली ना दिठी ॥ ३ ॥

जगालाहि तोंड देत
राखी तोच एक बूज
परि कोणीहि हेरेना
त्याच्या अंतरींचें गुज ॥ ४ ॥

— कु. विजया देशपांडे
तृतीय वर्ष, बी. ए.

## मृगजळ

तुझी आठवण,
मृगहास्यापरी अशी बरसते
जळत्या भूमिवरी मनाच्या
गंध फुलविते ॥१॥

तुझी आठवण,
बनुनि येते मोरपिसारा
समोर झुलते, हसते, फुलते
मना झुलविते ॥२॥

तुझी आठवण,
स्वप्न हृदींचें बनुनी येते,
अजाणतेपणीं मनास माझ्या,
हंसवुनी जाते ॥३॥

तुझी आठवण,
चन्द्रकरांचें शीतल गाणें,
आतुर डोळे लावूनि ऐकत,
मन हें आर्त ॥४॥

तुझी आठवण,
दूर कितीतरी माझ्यापासूनि
किती धरावे म्हटले तरीहि,
दूरच जाते ॥४॥

अन् मग धावत जातां पाठीं,
मला वाटतें,
असेल मृगजळ,
कधीच ना का हातीं यायचे ॥५॥

—शैला पवार
द्वितीय वर्ष, बी. एस्सी.

## एका रसायनशास्त्रज्ञाची प्रीत

तुझी आणि माझी प्रीत
आहे केमिस्ट्री लॅबमध्यें ॥
माझ्या प्रेमाचा ' बर्नर ' या
हृदयांत अखंड जळतो आहे
त्याच्या ' ऑक्सिजनेटेड फ्लेम ' नें। ॥१॥
माझें हृदयमंदीर उजळलें आहे

प्रिये, तूं रागावलीस तर ;
तुझ्या कपोलांचें सौंदर्य
' स्ट्रॉनशियम फ्लेम ' लाहि ॥२॥
मागे सारते

आणि तुझें हास्य बघून
' मॅग्नेशियम वायर ' जाळल्यानंतर
पडणारा लखख प्रकाश ॥३॥
माझ्या नजरेसमोर नाचूं लागतो

'ॲरोमॅटिक' पदार्थ जळल्यानंतर
निर्माण होणाऱ्या धुम्रवलयांकडे
मी बघतों आणि मला तुझ्या ॥४॥
कुरळ्या केसांची आठवण येते

तुझी शुभ्रदंतपंक्ति बघून
वाटतें, तुझ्या मुखांत
' ऑक्झॅलिक ॲसिड ' चें ' क्रिस्टल ' च ॥५॥
विधात्याने चुकून ठेवले आहेत

—कु. कला कांबळी
तृतीय वर्ष, बी. एस्सी.



# फिरणें....

छाया केळकर
द्वितीय वर्ष, कलाविभाग

धुक्याने भरलेल्या आणि पांढरंफटक कपाळ असलेल्या त्या 'सकाळीं कोपऱ्यावरच्या इराण्याच्या हॉटेलांत नुकत्याच सुरूं झालेल्या रेडिओवरील सनईच्या सुरांनीं धुंदावून ते दोघं तिची वाट पहात बसले होते. दूर जेथपर्यन्त दृष्टि पोचणें शक्य होतें तेथपर्यन्त धुक्याचा वेध घेत होते. अगदीं ठरवून ठेवल्यासारखा काल रात्रीं पाऊस पडून गेला होता. आणि न्हाऊन झाल्यावर तान्हें मूल जसें दुलई गुरगुटून गाढ झोपतं तशीं सारीं झाडें धुक्याच्या दुलईत झोपलीं होतीं. लहान मुलाच्या टाळूवर घातलेल्या वेखंडासारखा जमिनींतून गंध येत होता. नेहमी वळवळणारा रस्ताहि स्तब्ध पडला होता.

आणि पहातां पहातां ती त्यांना पलीकडच्या कोपऱ्यावर वळतांना दिसली. एकुलता एक प्रकाशकिरण कितीतरी वेळ तिचा पाठलाग करीत होता. धुक्याच्या लड्या उलगडत एखाद्या परीसारखी ती येत होती. पांढऱ्या शुभ्र पातळांत पांढऱ्याशुभ्र कपाळाने ती आली होती. अगदी आंखूड बाह्यांचा ब्लाऊज तिने घातला होता. बाह्या छपरासारख्या दंडांच्या पुढे आल्या होत्या. उजव्या दंडावर बाहीच्या छपराखाली एक तीळ थरथरत उभा होता.

तिला पहातांच ते दोघे उठले आणि रस्त्याच्या कडेला येऊन उभे राहिले. त्यांच्याकडे पाहूनहि न पाहिल्यासारखें दाखवून ती एकदम त्यांच्या पुढ्यांत येऊन उभी राहिली. नेहमीसारखे हंसण्याचे तीन हुंदके तिच्या तोंडून बाहेर पडले.

" दाढी नाही नं केली ? " गोडसा रुसवा आणि भिवया उंचावलेल्या.

" काय करणार ! तुला भेटायला यायचं म्हणून उठल्याबरोबर निघालों. दाढी करण्याइतकासुद्धा आम्हांला धीर नव्हता. " तिच्या दंडावरच्या तीळाकडेच दोघे टक लावून पहात होते.

त्यांच्या उत्तराने तिला गुदगुदल्या झाल्या.

पण तोंडावर शक्य तितका निर्विकारपणा आणत ती म्हणाली " हं ! चला ! " आणि मग निमूटपणे ते दोघे तिच्या दोन बाजूंनी चालायला लागले.

चालतांनाहि समानत्व राखलें जावें यावर तिचा कटाक्ष असे. दोन पुरुष एक स्त्री असतील तर स्त्री मध्यें पुरुष दोन बाजूला. दोन स्त्रिया एक पुरुष असेल तर पुरुष मध्य, स्त्रिया बाजूला.

" ब्लाऊज कोणाचं "

" कां ? माझंच ! " अजून तोरा कायम.

" तसं नाही. कधी पाहिलं नाही. "

" अशा पुष्कळ गोष्टी आहेत. ज्या तूं पाहिल्या नाहीस. माझी हॉस्टेलची खोली पाहिलीस तूं ? आणि टेबलक्लॉथ ? "

" पण खरं सांगूं ? "

" काय ? " उत्सुकता डोकावते.

" तुला हें ब्लाऊज फार छान दिसतंय, आणि विशेषतः तो उजव्या दंडावरचा तीळ ! "

" हो माहित आहे मला. " उत्सुकता लपवायचा प्रयत्न.

" कोणी सांगितलं ? " इतका वेळ गप्प असणारा उजवीकडचा विचारतो.

मग मात्र तिला लाज लपविणं अशक्य होतें. झाडांच्या पानांतून नेमका तिच्यावरच किरण केंद्रित करणाऱ्या सूर्याच्या प्रकाशांत तिच्या गालावरील लालीमा अधिकच लाल होतो. रुमालाने तो पुसून टाकायचा प्रयत्न करीत ती त्याच्याकडे एक तिरपा कटाक्ष टाकते.

" चल ! कांही तरीच " ती हात उगारते.

" मार नं ! " तो तिच्याकडे पाठ फिरवून उभा रहातो.

" तेवढाच तुझ्या हाताचा स्पर्श. "

ती थबकते. तिच्या मनांतल्या नैतिकतेच्या ताण- लेल्या पडद्यावर कुठे तरी आघात होतो. हात तसाच वर ठेवून चमत्कारीक नजरेनं त्याच्याकडे पहात रहाते. आणि मग पदर अगदी अंगाला लपेटून घेऊन भराभर चालायला लागते. बरोबर कोणी आहे याचा तिला विसर पडतो. कोणी तरी पाठलाग करीत आहे अशा भावनेने, अस्वस्थपणे पण भरभर तिचीं पावलें पुढे पडत रहातात.

एकजण दुरूनच ओरडतो, "अग ए, हळूं चल नं! कोणी जर आम्हांला पाहिलं तर मवाली म्हणून आमच्यावर विनयभंगाचा आरोप ठेवतील." त्याचा तो आवाज आजूबाजूच्या हाताची घडी आणि तोंडावर बोट अशा स्थितींत चूप बसलेल्या घरांच्या निःशब्द शांततेंत अधिकच घुमतो. ती ओशाळते. ओशाळून तिथेच थांबते. ते दोघे तिच्याजवळ येतात.

दुसरा म्हणतो, "अग, इतकं घाबरायला काय झालं! तुला माहीत आहे नं! आम्हां दोघांना तुझ्याबद्दल किती आदर आहे? आमचीं मतें बाजूला सारूनहि आम्ही तुला त्रास होणार नाही या दक्षतेने वागतों. आत कांही आम्ही तुझ्या अंगाला हात लावला नसता. पण म्हणून मनांतली इच्छाहि बोलून दाखवायची नाही का! मग आपल्या या जगावेगळ्या मैत्रीला अर्थ काय?"

तिला अधिकच ओशाळल्यासारखें होतें. ती उगाचच तिचें नेहमीचें हसूं हसते. आणि मग आपल्याला कांही विशेष जाणवलें नाही असं दाखविण्यासाठी लपेटून घेतलेला पदर सोडून देते आणि चालतां चालतां सहजपणे दोघांच्या हाताला मुद्दाम स्पर्श करते. तो तिची इच्छा ओळखतो आणि हसतो. हसतांना त्याच्या ओठावरचा जखमेचा व्रण अधिकच स्पष्ट होतो. मग ती अधिकच लाजते. खांदे खाली करून आपल्या सांवलीवर पाय देत चालूं लागते.

आतापर्यन्त झाडाला लटकलेले धुक्याचे पुंजके उन्हाने वितळायला लागतात. झाडांच्या पानांच्या जाळींतून उन्हाच्या तिरकस सावल्या रस्त्यावर पडायला लागतात. रस्ता अजूनहि स्तब्ध असतो.

रस्त्याच्या कडेला एका बांधावर ती बसते. ते दोघे तिच्याकडे पहात उभे रहातात. तिला कसंसंच होतं. ती समोरच्या जांभळ्या रंगाने फुललेल्या झाडाकडे बोट करते. दोघेहि तिकडे पहात रहातात. चटकन् ती पुढे होते. दोघांच्याहि हाताला धरून त्यांना बांधावर बसवते. तिच्या या अवचित उन्मादाने दोघेहि आश्चर्यचकित होतात. वातावरण ताणलें जातें. ती हळूच एकाच्या हातांतला गॉगल काढते आणि डोळ्याला लावते. आणि एक शीळ मारते. ताणलेली प्रत्यंचा ढिली होते. तिघेहि मोकळेपणाने खळखळून हसतात. एकजण दुसऱ्याला धरून तिच्या तोंडासमोर उभा करतो. 'बघ, आता हा काळा दिसतो की नाही?'

"अय्या! खरंच किती काळा! मस्त कल्पना आहे. शशीला कधी काळा म्हणायचा असेल तर गॉगल लावून त्याच्याकडे पहावं" आणि ती जमिनीवरून घरंगळत जाणाऱ्या गोष्टींचें हसूं हसते.

शशी आपल्याच तंद्रींत विचारतो, "खरंच, तूं आमच्याबरोबर कोकणांत येशील का ग?"

"आणि पैसे"

"हात्तीच्या! मी देईन कीं. चल, चलतेस?" त्याचा उत्साह पाहून तिला त्याला नाही म्हणणं जिवावर येतं. ती म्हणते "अंहं!"

"कां ग!"

"मला भीति वाटते सापाची!"

"एँहरे! भीती! मग मी तुला उचलून नेईन."

"इश्य! परत आपलं तेंच तेंच. किती वेळा सांगितलं मला असं बोललेलं आवडत नाही म्हणून"

"बरं! चुकलं!"

परत एकदा प्रक्षुब्ध शांतता पसरते

"बरं! एकदा रात्रीं चांदण्यांत फिरायला येशील?"

"हो येईन कीं."

तिच्या अनपेक्षित होकाराने भारून जाऊन आनंदातिशयाने तो विचारतो, "परीक्षा झाल्यावर?" ती मान पुढे करून, तोंड बंद ठेवून उद्गारते,

"अंहं!"

तो चिडून तिची नक्कल करतो.

"अँ हँ! सारखं अँ हँ! मग कधी येणार राणीसाहेब?"

"२१ वर्षे पूर्ण झाल्यावर." ती आपली व्यथा लपवत गंभीरपणे उत्तर देते.

त्याला २१ वर्षांची तिची ही मर्यादा कळत नाही. तो चिडून म्हणतो, "काय होणार आहे २१ वर्षांनंतर?" ती

तितक्यांत दुसरा जोरजोरानें हंसायला लागतो. ती एकदम दचकते. न रहावून विचारते, "काय झालं रे?"

तो म्हणतो, "अरे २१ वर्षांनंतर माणूस सज्ञान होतो असा कायदा आहे नं!" आणि तो परत हसायला लागतो.

मग दुसऱ्यालाहि हसूं आवरत नाही.



ती गंभीर चेहरा करून शरमून खाली मान घालते.

"म्हणजे आम्हांला अजून ४ वर्षें थांबायला हवं तर!" तो एक मिस्किल निःश्वास टाकून म्हणतो.

दुसऱ्याला थट्टेची लहर येते.

"आणि तेव्हा तुझं लग्न झालेलं असलं तर ग? नवरा पाठवील का?" त्याच्या बोलण्यांतली खोंच तिला कळते. पक्ष्याच्या उरीं बाण लागून तो घायाळ व्हावा तशी ती घायाळ होते. एक आर्त नजर त्याच्याकडे टाकून ती त्याच्या क्रूर थट्टेचा निषेध करते. पाणी येऊन तिच्या पापण्यांशीं थबकतं. गळण्याची वाट पहात रहातं.

आज त्यांच्या फिरण्याला तालच लागत नाही. समेवर आल्यावर सूर अडखळतात.

तो मग आपल्या परदेशगमनाचा विषय काढतो. स्कॉलरशिपसंबंधी बोलत रहातो. तिला बोलतं करण्यासाठी नाना प्रयत्न करतो. बोलतां बोलतां एकदम थांबतो आणि विचारतो,

'खरंच तुला काय आणूं ग मी?'

"इलेक्ट्रिक रेझर" संथपणे ती म्हणते.

दचकून तो विचारतो, "रेझर? तुला कशाला हवा?"

"मला नको रे! माझ्या नवऱ्याला तो रोज दाढी करत जाईल. म्हणजे तो मलाच नाही का उपयोगी पडणार!" ती मिस्किलपणे त्याच्या गुळगुळीत दाढी केलेल्या हनुवटीवरून नजर फिरवते.

तिच्या बोलण्यांतल्या खोंचेमुळे तो व्यथित होतो.

"तुला असं बोललंच पाहिजे का?"

"कठीण आहे! तुम्ही मात्र मनाला येईल तसं बोलायचं आणि आम्ही नाहीं वाटतं!" ती लटक्या रुसव्याने म्हणते. तिच्या मनाला गुदगुल्या होत असतात.

तिच्या या प्रश्नावर त्याला उत्तर सापडत नाही.

"चतुर आहेस. शब्द कधी खाली पडूं द्यायची नाहीस! आणि हट्टी पण!"

"असूं दे आम्ही अशाच" मघाचाच रुसवा कायम. "पण म्हणूनच आम्हांला आवडते"

"असं होय!" तिचें मन पुलकीत होतें. तिचें मन त्या शब्दांच्या दुलईत स्वतःला गुरफटून घेतें.

ती तंद्रीतच उठते आणि चालूं लागते. ते भारल्यासारखे तिच्या बाजूला चालूं लागतात.

चालतां चालतां एकदम ती थांबते. त्यांच्याकडे रोखून पहात विचारते, "एक विचारूं?"

"काय?" भिवया उंचावून गोंधळून ते विचारतात. "समजा," ती एकेक शब्दावर जोर देत सावकाश उच्चारते, द्विधा मनाला दाबायचा प्रयत्न चाललेला असतो; "जर उद्या चारित्र्यहीन म्हणून माझ्याशीं लग्न करायला कोणी तयार नाही झालं तर तुमच्यापैकी कोणीतरी माझ्याशीं लग्न कराल?"

आणि मग उत्तराची अपेक्षा न करतां सावकाश एकक पाऊल जमिनीवर रुतवत ती चालूं लागते.

"मणि" घोगऱ्या आवाजांत एकजण तिला हात धरून थांबवतो. "अजून तुला आमच्याबद्दल अविश्वास वाटतो?" तिच्या अविश्वासाच्या आरोपाने त्याला खंत वाटते.

आणि एकदम मणामणाचं ओझं उतरल्याच्या आनंदाने ती दिलखुलास हसते. आवेशाने दोघांचे हात हातांत घेऊन ती त्यांचीं चुंबनं घेते. आणि मग तसेंच हात हातांत ठेवून चालायला लागते. तंबोऱ्याच्या तारा जुळतात. सुरांत सूर मिसळतो. उन्हाला हळदीचा रंग चढतो. आणि दूरवर कोकीळेची आर्त साद घुमायला घालते.

"पियु! पियु! पियु!"

दुसरा हळूंच तिचा हात दाबतो. मघाशी उगाचच केलेल्या थट्टेबद्दल तिला अतीव दुःख होतं. काकुळत्या नजरेनं ती त्याच्याकडे बघते अश्रूंचा बर्फ वितळतो. विकल होऊन ती त्याच्या खांद्यावर मान टाकून फुलून फुलून रडूं लागते.

दुसरा हात दुसऱ्याच्या हातांत कायमच असतो.

---

# रुढीचे दास आम्ही....

ले. पद्माकर शंकर केसकर
बी. कॉम्. ( फर्स्ट ईयर )

" काय आबासाहेब कुठे निघालात ? "

" हात् लेका, लावलीस टोक. आता कसलं काम होतय् ! " असें म्हणत उतरलेल्या पायऱ्या परत चढून घरांत जात आबासाहेब म्हणाले. मला मोठें आश्चर्य वाटले कीं आपण असें विचारल्यावर यांच्या कामांत कसा काय अडथळा आला. खुलासा करण्यासाठी म्हणून मीहि त्यांच्या मागोमाग त्यांच्या घरीं गेलों. आबासाहेब माझ्यावर खूप खवळले होते. त्यांना शांत करण्यासाठी म्हणून शक्य तितका अपराध्यासारखा चेहरा करून अगदी खालच्या आवाजांत त्यांना विचारले, " माझें कांही चुकलें काय ? "

" चांगलेंच चुकलें. आता कसचा घरीं सापडतो तो "

" कोण ? " मी अभावितपणे विचारलें.

" सुरेश त्रिंबक जोशी. माझ्या माहितींतील एक स्थळ. त्याच्याकडे जाणार होतों मी आपल्या सुमीसाठी. पण कधीनवांत तुला या म्हाताऱ्याचा पुळका आला आणि बसलास विचारून– " कॉय् ऑबॉसाहेब, कुठ्ये निघॉलॉत् ? " मला चक्क वेडावून दाखवीत ते म्हणाले. तरी मला नीट उलगडा होईना म्हणून मी त्यांना स्पष्टपणे विचारलें, " काय बिघडलें विचारलें म्हणून ? "

" म्हणजे काय ? चांगलेंच बिघडलें. " आबासाहेबांची ही नेहमीची बोलण्याची पद्धत " टोकच लावलीस कीं तूं. तो जोश्या आता घरीं असला तरी त्याचें आमचें गोत्र जमणार नाही. नाहीतर पत्रिका जमणार नाही किंवा त्याला नेमका मंगळ असेल आपल्या सुमीला मंगळवाला नकोय् ना ! "

अरे बाप रे ! माझ्या एवढ्याशा विचारण्याने क्षणांत इतके बदल होत असतील तर मोठे अजब की हे ! आबासाहेबांच्या बोलण्याचें आणखी स्पष्टीकरण व्हावे म्हणून मी विचारलें, " पण मी चौकशी केल्यामुळे का सगळे बदलणार आहे ? " नेमके त्याच क्षणीं त्याचें गोत्र प्रतिकूल होऊन, त्याच्या पत्रिकेंत बदल होऊन नसलेला मंगळ का त्याला लागणार आहे ? पण नाही. आबासाहेब एवढे वयोवृद्ध व तपोवृद्ध असूनहि त्याचा मुळीच विचार न करतां अंगांतला शर्ट काढून तो खुंटीवर लटकवत ते म्हणाले, " अरे बाबा, तुला नाही तें समजणार. कोणी कांही महत्वाच्या कामाला जात असतां ' कुठे जाता ' असें कोणी विचारलें तर सगळें काम फिसकटतें. मांजर आडवें गेलें तर काम होत नाही हें तुला माहित आहे नां ? तसेंच टोक लावली तर काम बिघडतें बरें "

" पण कां ? " मीहि हट्टवादीपणाने विचारलें.

" अरे कां काय ? आजपर्यंत असें होत आलें आहे. " आता यापुढे प्रश्न विचारून मला सतावूं नकोस, अशा अर्थाचा कटाक्ष टाकून विमनस्कपणे तक्याला टेकून आबासाहेब सुपारी कातरू लागले. त्यांच्या तर्कशास्त्राने माझें समाधान झालें नाही. पण जास्त चौकशा केल्या तर त्यांच्या रागाचा पारा वर चढून मनाचें थर्मामीटर फुटेल असा विचार करून मी तेथून काढता पाय घेतला.

घरीं आल्याबरोबर आई म्हणाली, " अरे पदऽऽम, किराणा आणायचा आहे रे. आणि हे बघ, आज तुला दोन फेऱ्या कराव्या लागतील हं. तेल आणि तूप बरोबर आणत नसतात. " तें ऐकतांच मनाच्या कबुतराने कुतुहलपूर्वक पंख फडफडले आणि नकळतपणे मी विचारलें, " कां ? एकाच फेरींत आणलें म्हणून काय बिघडलें ? " " काय बिघडलें तें मला माहित नाही, पण आजपर्यंत तेल आणि तूप बरोबर आणलेले नाही. " मला एकदम् आबासाहेबांचें वाक्य आठवलें, " आजपर्यंत असें होत आलें आहे. " म्हणजे काय ? आजपर्यंत असें आणलेले नाही म्हणून आताहि आणायचें नाही, आजपर्यंत असें होत आलें आहे म्हणून आतांहि तें होणार आहे. अरे ! अशी विचारसरणी ठेवली तर आम्ही भारतीय पुढे जाणार कसें ? आमच्या गल्लींतली ख्यातनाम व्यक्ति म्हणजे आबासाहेब. मग त्यांनींच जर असे बुरसटलेले विचार मांडले तर चिनी दिल्लीपर्यंत आले तर नवल कसलें ? रशिया चंद्रावर जाण्याच्या गप्पा मारतोय. अमेरिका टेलिस्टारमध्यें खुडबुडतोय. मग



आम्हीच कां रूढींच्या तंगड्या पकडून स्वस्थ बसावे ? चिनी–आक्रमणाचें मुख्य कारण काय असा वाद मी एकदां ऐकत होतों. वामनराव अगदी तळतळून सांगत होते, ' अरे मागच्या जन्मीचें पाप आता फळत आहे. आता जर पुण्य केलें नाही तर नक्कीच सिलोनहि कन्याकुमारी आमची आहे म्हणून सांगेल. " अजून पाप पुण्याचें बॅलन्स शीट आम्ही मांडत बसलों तर...तर .. जाऊ द्या. आपल्याला काय करायचं. उगीच जास्त गंभीर बाजूकडे जाण्यापेक्षा आणखी कोणत्या रूढी, चालीरीति, समजुती समाजांत आहेत याचा मी विचार करूं लागतों...

कॉलेजच्या समोरच्या सिमेंटच्या चबुतऱ्यावर बसून आम्ही गप्पा मारत होतों. सहामाहीचे मार्क्स समजले होते. बँकींगचा अभ्यास केला नाही म्हणून मला कमी मार्क्स मिळाले असें मी सांगितले. " माझ्याजवळ पुस्तक नव्हतें म्हणून मी लॉजिकमध्यें गचकलों. " जगताप म्हणाला. पण भागवतचें बोलणें ऐकून तर मला हसूंच आलें. तो म्हणाला होता, " अकौंटन्सीच्या पेपरला अगदी सुरवातीलाच माझें पेन हातांतून खाली पडलें. म्हणून त्या पेपरमध्यें माझी चक्क दांडी उडाली. " पेन पडलें हा अपशकून झाला असेंच जणुं त्याला म्हणायचें होतें.

कांही घटना या पाहुण्यांच्या आगमनाची पूर्वसूचना देणाऱ्या असतात असें मीसुद्धा मानतों. घराच्या कौलावर बसून चार पांच कावळे एकदम कावकाव करूं लागले कीं, पळत जाऊन मी त्यांना हांकलून देतो. कां ? तर दुपारच्या काशी एक्स्प्रेसनें भली मोठी पाहुण्यांची टोळी आपल्यावर चाल करून येईल या भीतीने. पाहुणे येण्याची अगाऊ सूचना ते कावळे देतात ही माझी समजूत पण त्यांना हांकलल्याने का जळगांवला पोहोचण्याच्या बेतांत असलेले पाहुणें एकदम त्यांच्या गांवाला जाऊन पोहोचणार आहेत ? अशीच पाहुण्यांच्या बाबतींत माझी आणखी एक समजूत आहे. मी घरांत कधी कधी सिनेसंगीत म्हणतों. एकदा माझ्या खोलींत असेंच मी सिनेमाचें गाणें म्हणत होतों आणि नेमके त्याचवेळीं खोलींत येऊन माझ्या भावाने पण एकाच क्षणीं " चाहे कोई मुझे..." सुरूं केलें. दोघांनी नकळत एकाच वेळीं एकसारखें कांही म्हटलें तर पाहुणें येतात ही आमची ' समजूत ' आठवून आम्ही एकदम गाणें बंद केले. व कोणकोणते पाहुणे येण्याचा संभव आहे याचा विचार करूं लागलों.

या समजुती प्रांताप्रांताप्रमाणें बदलणाऱ्या म्हणजे स्थलसापेक्ष आहेत. खानदेशांत वेगळ्या, वऱ्हाडांत वेगळ्या, कोंकणांत वेगळ्या. प्रत्येक ठिकाणच्या वातावरणावर, संस्कृतीवर त्या अवलंबून आहेत. तळपायाला खाज सुटली म्हणजे प्रवासाला जाण्याचा योग असणें, पाल चुकचुकली किंवा डावा डोळा फडफडला म्हणजे अशुभ घटना घडणें वगैरे समजुती अनुभवावरून झाल्या आहेत. भूतकाळांत जेव्हा धूमकेतूचें दर्शन झालें तेव्हा कांही तरी विघ्न आलें असेल म्हणून आता धूमकेतू दिसणें आणि विघ्न येणें यांचा लोकांनीं संबंध लावून टाकला. पानशेत धरण फुटणें, कोंकणांत वादळ, चिनी आक्रमण वगैरे विघ्नें अष्टग्रहयुतीचे परिणाम आहेत. असे होराशास्त्रज्ञ म्हणतात.

कांहीं रूढींचा अवलंब केला तर कामांत दिरंगाई होते व केवळ रूढीवर अवलंबून राहिल्यामुळे आपले नुकसान होतें. पण अशा नुकसानकारक रूढी आपण मानतोच असें नाही. कांही वृद्ध माणसेच अशा रूढी मानतात. म्हणूनच केशवसुतांनीं गेल्या पिढींतील लोकांना ' रूढींचे दास ' म्हटले आहे. मी अजाणता चौकशी केल्यामुळेच आबासाहेबांनीं इतकें महत्त्वाचें काम हवेवर सोडून दिलें. रूढींना प्रमाण मानून त्यांना ओलांडणें म्हणजे घोर पातकच आहे असें, या रूढींच्या दासांना वाटतें. गोविंदाग्रजांनीहि ' दसरा ' या कवितेंत रूढींचें सीमोल्लंघन केल्यानेच खरा दसरा साजरा होईल, असा मोलाचा संदेश दिला आहे. पण मी मात्र विशेष नुकसान होणार नाही अशा व ज्यापासून मनाला आल्हाद वाटेल वाटेल अशा रूढी पाळण्यांत आनंदच मानतों. अशाहि पुष्कळ निरुपद्रवी रूढी आहेतच. एखादेवेळीं विशेष महत्वाचें काम नसेल किंबहुना आपल्याला जायचा आणि काम करायचा कंटाळा आला असेल तर मांजर आडवें गेलें म्हणून परतून ' रूढींचे दास ' व्हायला कांहीच हरकत नाही.

# अन् सुशे, तूं बदललीस....

ले.– कु. मीनाक्षी पळसुले

सुशे, तूं किती ग बदललीस ? त्या दिवशीं तूं मला गाडींत भेटलीस, पण माझ्यापासून तूं खूप दूर होतीस. तरी मी खुप वेळ तुझ्याकडे टक लावून पाहिलं व जोरांत ओरडून हांक मारली, ‘सुशे !’ तूं देखील माझ्याकडे पहातच होतीस. प्रत्युत्तरादाखल तूं हसलीस. तेंच पूर्वीचें परिचित पण क्षीण हास्य. तूं म्हणालीस ‘येना !’ परंतु त्यापूर्वींच मी तुझ्याकडे यायला निघालें होतें. तुझ्या समोरच्याच बाकांवर थोडीशी जागा करून घेऊन मी तुझ्या जणूं पुढ्यांतच बसलें आणि म्हटलें ‘हं बोल!’ ‘काय बोलूं ? बोलण्यासारखं माझ्या जीवनांत कांही घडलंच नाही. सगळं कसं नेहमी-सारखंच चालूं आहे. शांत–थंड–संथ. तूं आपली कॉलेजांत जातेस. इकडेतिकडे हिंडतेस. तूंच बोल नां कांहीतरी. तूं सांग, मी ऐकतें. आपलं नेहमीचं व्रत फार दिवसानंतर आज पुढे- चालवूया. आणखी देखील लांबलचक बोलण्यांत सुशी गुंगली असावी. पण माझ्या डोळ्यापुढे सुशीचें निराळेंच चित्र दिसूं लागलें.

“न जुमानतां तोंडावर येणाऱ्या अवखळ बटा, एक वेणी वर बांधलेली व एक सुटलेली, किंवा २ रंगाच्या २ रिबीना बांधलेल्या दोन वेण्या, तिरकस लावलेलें कुंकू आणि आम्हा सगळ्यांहून वेगळं म्हणजे चिटाचं देखील नव्हे तर खणाचं परकरपोलकं अंगांत घातलेली सुशी माझ्या डोळ्यापुढे आली. आम्ही सगळ्या मुली चित्र-विचित्र रंगाचे, मोठ्या–मोठ्या फुलांचे झगे घालून येत असूं; व सुशे, तूं मात्र एकटी परकर–पोलकं घालायची. पोलकं तरी केवढं, दोन सुशा मावतील एवढं मोठं ! आढ्यापासून कमरेपर्यंत नळकांड्याप्रमाणे सारखंच सैल. परकराचा ओचाहि सदोदित तुझ्या हातांत असायचा ? सुशे, तुला आठवतं, आपली गाण्याची तोंडी परीक्षा होती. तुझा आवाज कांही केल्या सरांना एकूंच येईना. म्हणून सरांनी तुला टेबलाजवळ बोलावलं. तूं तिथं जाऊन गाणं म्हणूं लागली. बऱ्यापैकीं आलाप घेऊं लागली. तालाच्या मात्रा मोजूं लागलीस. आणि एकाएकी वर्गांत हास्याची लाट उसळली. गायनमास्तर एकदम चिडलें. त्यांनीं मलाच हसण्याचं कारण विचारलं. मी देखील हसत-हसतच बोलूं लागलें. पण मला बोलतांच येईना. म्हणून मी तुझ्या पायाकडे बोट दाखवलं. अन् सुशे, तूं, सर, व सगळा वर्ग पुन्हा हसूं लागला. तूं पायांत एकच चप्पल घालून उभी होतीस व दुसरी चप्पल तुझ्या जागेवरच होती.”

आणखी मी भूतकाळांत किती रमलें असतें कोण जाणें ? पण तूं मला गदगदा हलवून माझ्या तंद्रींतून जागं केलंस. “काय गं कसला विचार करतेस !” तेंच पूर्वीचं तुझं नाकांत बोलणं. प्रत्येक शब्द अनुनासिक समजून. आणि मला हलवतांना जाणवलेला तोच पूर्वीचा धसमुसळेपणा.

‘सुशे, चित्र–बित्र काढतेस की नाही ? आता मला पाहिलंच आहेस, माझं एक चित्र काढून मला पाठवशील ?’ मी बोललें, आणि मला वाटलं, मी उगाच बोललें. “मागे एकदा सकाळची शाळा असतांना सुशीचे वडील तरातरा शाळेंत आले होते. ऑफीसमध्यें न जातां थेट वर्गांतच आले होते. ते एकदम गर्जून बोलूं लागले, ‘ह्यो असं आमच्या घरांत चालायचं नाय !’ तासावर कुळकर्णी मास्तर होते. अगदीच लेमळे. त्यांनीं गुळमुळीत-पणानं विचारल, ‘असं म्हणजे कसं !’, ‘मला उलट शबुद खपत नाय. क्यसं म्हणें क्यसं ? माझ्या पोरीनं चित्तर— बित्तर काढलेलं मला खपत नाय. नायतर पोरी उंद्यापासून तुझी साळा बंद !’ त्यांनी सुशीकड पाहिलं. व आले तसेच ते तरातरा निघून गेले. सगळ्यांच्या नजरा सुशीकडे वळल्या. ती हमसून–हमसून रडत होती. व तिचं सगळं अंग थरथर कापत होतं. आम्ही सगळ्या तुझ्याभोवतीं जमलों. पण तूं अधिकच रडूं लागलीस. आम्हाला आवरायचा प्रयत्न असफळ झालेला पाहून कुळकर्णी सर वर्गांतून निघून गेले व आपले हेडमास्तर तिथं आले, त्यांच्याकडून आम्हाला कळलं कीं गांवांत भरलेल्या चित्र–प्रदर्शनांत ड्रॉइंग मास्तरांनी तुझ्या नकळत तुझं चित्र त्यांत ठेवलं होतं. व तुला २ रें बक्षिस त्यांत मिळालें होतें. आणि हीच बातमी



तुझ्या वडिलांच्या कानांवर गेली असावी. त्यानंतर वर्गांत ड्रॉइंगच्या तासालाहि तूं ब्रश हातांत घेऊन नुसती रडायचीस. अगदी पोटभर रडायची. पण तुला कोणीच जाब विचारत नसे.”

एका क्षणांत हें चित्र माझ्या डोळ्यापुढून सरकलें. व मी तुझ्याकडे पाहिलें, जणूं तुझे डोळे बोलत होते, ‘कशाला ग जखमेवरची खपली काढलीस ?, पण सुशे, त्या प्रसंगानंतरच तूं व मी मैत्रीणी झालों. मला अडलेलीं गणितं तूं वहींत सोडवून द्यायची व तुला कठीण वाटणारे इंग्रजी–मराठीचे प्रश्न मी तुला सोडवून द्यावयाची.

त्यानंतर आपण दोघी एकमेकींनां आपलीं मनोगतें सांगूं लागलों. अमक्या दुकानांतला तमका फ्रॉक मला आवडला किंवा ह्या वाढदिवसाला मी आईजवळ बाहुलीचा हट्ट धरणार आहे; असल्या माझ्या गप्पा असायच्या. पण तूं , तूं खूपच वेगळं बोलायचीस. तुला दोन आया आहेत हें ऐकून मला कुतुहल वाटलं. एक दिवस तूं म्हणालीस, ‘मला बहीण नाही. तूं होतेस माझी बहीण?’ मी पटकन् ‘हो’ म्हटलें व आपण एकमेकीकडे पाहिलें, डोळ्याची भाषा डोळ्यांना समजली.

नंतर सुशे, तूं एकाएकी बदललीस. फारशी बोलेनाशी झालीस. बोललीस तरी मला समजेल असं फार थोडं बोलूं लागली. तूं आता साड्या नेसूं लागली होतीस. एक दिवस मधल्या सुट्टींत तूं मला माझ्या–करितां आवळे–चिंचा आणल्याचं सांगितलंस व मग मी मधली सुट्टीभर तुझ्याजवळ होतें. ‘उद्या कनई आई मला खाऊ म्हणून जी टॉफी–बिस्कीटें देईल ना, तीं मी तुला देईन हं.’ अशीं आश्वासनं तुला देत होतें तूं फक्त ह्यावर हंसलीस. तूं मला म्हटलं, ‘तुला एक गोष्ट सांगूं ? पण कुणा–कुण्णाजवळ नाही हं, बोलायचं. माझ्या गळ्याची शप्पत आहे तुला. बघ हं शपथ मोडली कीं माणूस मरतं.’ मी ‘हो–हो’ म्हटलें तूं माझ्या कानांत रडत, रडत सांगितलं, ‘माझं लग्न ठरलेय ग.’ आणि तुझा रडण्याचा आवेग थांबेना. मी जोरांत ओरडलें, ‘हात् वेडे ! असं रडत कशाला सांगतेस मग ? तुला मस्त–खूप नवे कपडे मिळतील ! छान–छान दागिनें मिळतील ! गोड–गोड खाऊ मिळेल ! कुठं आहे ग सुशे तुझें लग्न ? मी येउना ? येणार. आम्ही येणार. अग शोभा, मंदा, सुधा आपल्या सुशीचं किनई......’ पण तूं मला पुढं बोलूंच दिलं नाहीस. तूं म्हणली, ‘शप्पथ आहे हं— मोडायची नसते ती.’ आणि जमलेल्या शोभा–मंदा–सुधा खूप खूप विचारत असतांनाहि मी एकदम चूप्प झालें.

त्या दिवशीं शाळा सुटल्यावर तूं मला म्हणालीस, ‘आता तुझी माझी भेट कधी होईल ग ? मी किनई लग्नाच्या आधी आत्याकडे जाणार आहे. तिथं माझा माझा आतेभाऊ आहे. तो माझी खूप–खूप वाट पहात असेल. त्याचं माझ्यावर प्रेम आहे. माझी आत्या मला सून करून घ्यायला तयार आहे.’ मला काय बोलावं तें सूचेना. मी म्हटलं, ‘मग हो त्यांची सून. लग्न तर आता कर !’ पण तूं पुढं बोलतच राहिलीस. तूं म्हणाली, ‘तसं जर झालं नाही तर मी तिथल्या नदींत जीव देईन. कारण माझ्या आताच्या ठरवलेल्या नवऱ्याची खूपशी जमीन गहाण आहे. तो फार वाईट आहे. दारू पिऊन तो बायकोला मारतो. त्याची पहिली बायको आहे अजून. माझी स्थिति कशी होणार ?’

एवढं बोलून सुशी तरतरा निघून गेली. मला त्यातलं फारसं कांही कळलं नाही. पण एवढं समजलं कीं सुशी काही आता नेहमी भेटणार नाही. कदाचित् नाहीच.

पण नंतर सुशे, तुझं लग्न तर थाटामाटानं झालं मला वाटलं कीं तो वरातींत तुझ्या शेजारी बसलेला तुझा आते-भाउच असावा. मी तुला तेव्हा विचारायलाहि येणार होतें. पण तूं मला लग्नापूर्वी २ दिवस पत्र पाठवून कळवलं होतंस कीं ‘काय वाटेल तें झालं तरी माझ्या लग्नाला येऊं नकोस ’ म्हणून तर मी वरात पाहूनच समाधान मानलं.

नंतर तूं अचानक एक दिवस शाळेंत आलीस. मुलींनीं ‘नांव घे’ म्हणतांच रडूं लागलीस. मुली पांगल्या पण तुझं रडणं, तें सुरूंच होतं. अचानक एक–दोन तासानंतर शाळेंत पुन्हा तुझे वडील आले. बाहेर २ मोटारी उभ्या होत्या. तुझे वडील तुला ओढून न्यायची भाषा बोलत होते. तुझ्या दोन्ही

आया तुझ्यापुढे पदर पसरीत होत्या. आणि वरातींत तुझ्या शेजारी बसलेला तुझा नवरा— तो म्हणत होता 'जाऊद्या, मामासाहेब, मैत्रीणीचा निरोप घेत असेल, ये सुशीला लवकर' पण त्याच्या बोलण्यामुळे कसलातरी दर्पच वर्गांत पसरला होता. सासरीं जायचा दिवस माहित असून तूं पळून शाळेंत आली होतीस. तुला जायचं नव्हतं. पण शेवटीं बळजबरीनं जावं लागलं. मी एकदोन वर्षानंतर हें सर्व विसरून गेलें.

पण २ वर्षांपूर्वी, आता-आता, तुझा आतेभाऊ भेटला होता. तुझा फोटो दाखवून त्याने म्हटलं, 'हिला ओळखता?' मी एकदम ओरडलें, 'ही तर सुशी' पण तुम्हांला काय माहित ही माझी मैत्रीण आहे म्हणून. कुठं असते ती? तुमचीच बायको नां? तो म्हणाला, 'सुशीनं शाळेच्या मासिकांतील तुमचा फोटो दाखवून तुमची ओळख करून दिली होती. सुशी माझी बायको होणार होती. पण झाली नाही. झाली दारुड्याची. त्याच्याकडच्या माणसांनीं तिला आधीच ४-५ दिवस बळजबरीने बैलगाडींतून तिच्या माहेरी नेली. आणि आता मी बसलों आहे पुढच्या जन्मीं सुशी माझी बायको होईल त्याची वाट पहात ..'

नंतर एकदम सुशे, तूं आज भेटलीस, पण तूं आता माझी पूर्वीची सुशी राहिली नाहीस, तर खूप खूप बदलली आहेस ग. मी म्हटलं, 'चल पुढच्या स्टेशनवर चहा घेऊं, येतेस?' तूं म्हणालीस, पुढच्या स्टेशनवरच तर मला उतरायचं. तुझे मेव्हणे येणार आहेत ना घ्यायला. खूप-खूप छान वागतात ते माझ्याशीं. काळजीहि घेतात खूप मीं पळून जाऊ नये म्हणून. पण त्यांना तूं आज सांग कीं मी हा जन्म संपेपर्यन्त तुमच्याच जवळ राहणार आहे. पळून नाही जाणार कांही.' तूं आता येवढं बोलून पूर्वीसारखी रडली नाहीस तर एक दीर्घ उसासा टाकला व म्हणालीस 'तुझा पत्ता दे ग, मी कधी तरी, मन मोकळं करावसं वाटलं तर तुला पत्र लिहीन. तूं लिहूं नकोस हं मला. शप्पथ आहे तुला!' तूं माझा पत्ता घेतलास व तो ठेवायला पेटी उघडलीस, मी सहज तुझ्या पेटीकडे पाह्यलं; त्यावर नांव होतं "सौ. सावित्रीबाई......" मी म्हटलं, "सावित्री कोण ग सुशे?" तूं सांगितलंस माझंच सासरचं नांव आहे तें. मुद्दामच ठेवलं आहे. दरवर्षी पूजते नां वड. व म्हणतें 'देवा मला पुढच्या जन्मीं......' जाऊदे, तुला सगळं माहितच आहे.'

इतक्यांत तें स्टेशन आलं. तुमच्या घरचा गडी तुला घ्यायला आला होता. तूं विचारलं, 'धनी कुठं र तुझे?' तो म्हणाला, 'हैत की बाहेर गाडींत. धमनी आणलीयां.' एवढं म्हणून त्याने तुझी पेटी उचलली व तूं मला हात हलवून निघून गेलीस. तूं गेल्यावरहि गाडी सुटेपर्यन्त मी त्याच दिशेकडे पहात राहिलें.

माझा पत्ता घेऊन गेलेली सुशी, पूर्वीची माझी बदललेली सुशी— मला पत्र लिहिणार म्हणणारी सुशी— सुशे, एकदम तुझ्या जागीं मला पु. शि. रेग्यांची सावित्री दिसूं लागली. तिला खूप-खूप लिहायचं होतं— तसंच तुलाहि— पण तिच्यासारखी तूं काहीच न लिहिता खूप थकणार होतीस, उदास हसणार होतीस, दीर्घ उसासा सोडणार होतीस, आणि तुझ्या मनांतील आठवणींचा— बकुळीच्या फुलांचा सुवास घेऊनच तृप्त होणार होतीस. वाळलेलीं-सुकलेलीं असली तरी तींच फुलं तुला आजच्या परिस्थितींत थोडेसे का होईना पण चार समाधानाचे क्षण मिळवून देणार होतीं......!

---



# मीहि लष्करांत भरती झालों असतों, पण........

ले.- रमेश गं. झवर [ पदवीपूर्व- कलाविभाग (ब) ]

भारत मातेच्या हांकेला ओ द्यायचाच, असा निश्चय करूनच मी घरी आलों. म्हणजे लष्करांत भरती होऊन लाल चिन्यांना पाणी पाजायचं ठरविलं. माझ्या दुर्दैवाने मी बेचाळीसच्या आंदोलनांत सामील होऊं शकलों नाहीं. कारण माझें वय त्यावेळीं वजा दोन वर्षें होतें! भारताला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा मी अंगाई गीत ऐकत असे. तेव्हा माझं राष्ट्रप्रेम व्यक्त व्हायला संधि कोठून मिळणार! सातव्या इयत्तेंत असतांना जेव्हा मी इतिहास प्रथम वाचला, तेव्हा मला वाटायला लागलं, पंचवीस तीस वर्षें मी अगोदरच जन्मलों असतों तर किती बरें झालें असतें?

हं, तर राष्ट्रप्रेम व्यक्त करायला मला फारशी संधि मिळाली नाही. नाही म्हणायला गोवा विमोचन चळवळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ अशा दोन तीन चळवळी झाल्या. 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे'च्या चळवळींत मी भाग घेतला होता. (एकशें पांच हुतात्म्यांत माझा नंबर लागूं शकला नाही. मी जळगांवांत राहत होतों.) मी त्यावेळीं नेहरू-स. का. पाटील ह्यांच्याविरुद्ध फारच संतापलों होतों. एक हेडमास्तर शाळा बंद करायला तयारच होत नव्हते. हरताळवाल्यांनीं त्यांना बरेंच समजावून पाहिले, तरीहि ते ऐकतच ना. मी शेवटीं नाईलाजानें शाळेच्या आवारांतलें एक फुलझाड उपटून टाकलें. मी फारच रागावलों होतों! नेहरू, स. का. पाटील आणि ते हेडमास्तर ह्यांच्यावरील राग त्या फुलझाडांवर असा निघाला. असो!

विचाराच्या तंद्रींतच मी जेवायला बसलों. आपला निश्चय ह्यांना सांगून टाकावा, असा विचार करून मी म्हणालों,

'मी सैन्यांत भरती व्हायचं ठरवलंय् उद्या!'

'ओहो! तूं सैन्यांत जाणार! सैन्यांत जाणाऱ्या ह्या काडी पहिलवानाचें तोंड बघून घ्या!' सुन्या खट्याळपणे उद्गारला.

'अरे तिकडे थंडी फार पडते म्हणे! मी आजच वाचलं आमच्या भूगोलांत.' अरुण म्हणाला.

'कांही करा! गिळायला मात्र सव्वाशेर पाहिजे. एवंढ काम कर, म्हटलं की जिवावर येतं! कोणाच्या वांचून माझं अडलं नाही खेटर!' आई फणकाऱ्याने म्हणाली. दुपारीं मी तिचें काम ऐकलें नव्हतें म्हणून ती माझ्यावर रागावली होती.

मला वाईट वाटलें. मी कोणालाच उत्तर दिली नाहीं. राष्ट्राबद्दल किती आस्था दिसून आली! तथापि मी माझा बेत बदलला नाही. जननीपेक्षा जन्मभूमीच मला श्रेष्ठ वाटली! राष्ट्रासाठी त्याग करणाऱ्याच्या कपाळीं सुख कोठलें? विरोध, उपहास, थट्टा, दुःख, कष्ट इत्यादि त्याच्या अनुभवास यायच्याच.

दुपारीं मी रागावून करंज्या खाल्ल्या नव्हत्या त्या सरुने आणून, मला न विचारतांच वाढून दिल्या. 'कोणाला विचारून वाढल्यास तूं ह्या? आँ?' मी चढ्या आवाजांत विचारलें. 'दिवाळी साजरी करूं नका, असा चव्हाणांचा आदेश पार धुडकावून लावला म्हणजे काय? सीमेवर जवान लढताहेत, राष्ट्र संकटाच्या खाईंत सांपडलें आहे नि तुम्ही खुशाल लाडू, करंज्या, अनारसे ..... मिटक्या मारून खाता?...' मी एक व्याख्यानच सुनावणार होतों. पण उपयोग झाला नसता. गाढवापुढे... मी त्या करंज्या जरी रुचकर लागत होत्या तरी अनिच्छेने खाल्ल्या. उष्टं टाकणें मला पसंत नाही

जेवण झाल्यावर गणूच्या घराकडे मोर्चा वळविला. 'गणू, मी सैन्यांत भरती होणार!' माझा निश्चय त्यास सांगितला. 'आँ? तूं सैन्यांत भर्ती होणार? मग निरोपसमारंभासाठी कमिटी नेमतों मी! तो उत्साही स्वरांत म्हणाला.

'उ हूं, निरोपसमारंभ वगैरे जाने देव!'

'नो नो, लेट इट नॉट गो! निरोपसमारंभ होणारच. फार तर, कमिटी नेमीत नाही. कारण तसें केलें म्हणजे काम सर्वेषामविरोधेन होणं मुष्किल!

'बरं' मी नाइलाजाने संमतिलों. पण त्यास बजावलं कीं, कॉलेजभर जाहिरात फडकावूं नकोस! हो, 'तूं म्हणजे कॉलेजचा ऑल इंडिया रेडियो!'

'नाही रे,' तो म्हणाला, 'चारपांच मित्रमंडळीसच बोलवूं. त्या दाम्याला मात्र बोलवायला पाहिजे. त्याचा बाप वर्तमानपत्राचा रिपोर्टर आहे—'

'गण्या! व्हाट डू यू मीन ऑं? मी काय प्रसिद्धीलोलुप आहे?' मी लटक्या रागाने म्हणालों. 'बरं जशी तुझी इच्छा.' तो म्हणाला. माझ्या लटक्या रागाचा अनपेक्षित परिणाम झाला, याचें मला वाईट वाटलें. दुसऱ्या दिवशीं पांचाची वेळ त्याने ठरविली. थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्यानंतर मी घरीं परतलों. रात्रीं बिछान्यावर पडल्या पडल्या— उत्तरादाखल कसें बोलवयाचे ह्याचा विचार करीत मी झोपी गेलों.

सबंध रात्रभर मला विचित्र स्वप्नें पडत होतीं. मी लष्करांत भरती झाल्याबरोबर मला नेहरूंची तार आली— 'माझें हात बळकट झालें आहेत. दहा दहा पौंडांनीं वजन वाढलें!' दुसरें स्वप्न पडलें कीं, मी आघाडीवर लढत आहे नि शेकडों चिनी सैनिक गारद करीत आहे. रात्रभर मला हेंच स्वप्न पुन्हा पुन्हा पडत राहिलें— लढतां लढतां मी ओरडत होतो— 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्!' साडेचार पांचच्या सुमाराला सुरेश मला उठवायला आला. 'उठ रे चंदू ऽ!' तो म्हणाला.

'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्!' मी अर्धवट झोपेंत उत्तर दिलें.

'चंदिट्ल्या ऽ? उठतोस की नाही? आज नर्क चतुर्दशी!' तो म्हणाला. मी जागा झालों. झोपेंत असल्याची बतावणी करीत मीं म्हटलें, 'मी नाहीं... जा... नर्कांत... स्वर्गांत!' शेवटी त्याने माझें पांघरुणच काढून घेतलें. मला नाइलाजाने उठावें लागलें.

कुडकुडत मी अभ्यंगस्नान केलें. जिवावर आलें अगदी. बाकी सबंध दिवस बोलतां बोलतां निघून गेला. साडेचारला मी कपडे करुन गणूच्या घराकडे निघालों.

तो माझीच वाट पहात उभा होता. त्याने मला वर नेलें नि माझ्या हातांत 'लोकसत्ता' देऊन खाली सामान–सुमान आणण्यासाठी निघून गेला. थोड्या वेळांत केळीच्या पानाचें पुडकें व इतर सामान घेऊन तो वर आला. सामान ठेऊन दोन–तीन खुर्च्या त्याने फरफटत मी बसलों होतों तेथे आणल्या. मी घड्याळाकडे पाहिलें. पांचाला पांच कमी होते. अजून निमंत्रित कसे आले नाहीत म्हणून मी गणूला विचारणार होतों तोंच 'धाप धाप' आवाज करीत म्हादू, रमेश, प्रकाश ह्यांनीं प्रवेश केला.

'नमस्काऽर!' त्यांनीं अभिवादन केलें. मीहि प्रतिनमस्कार केला.

'गणू,' म्हादू म्हणाला, 'आता सुरुवात करायला हरकत नाही.' 'हं. चला.' गणू म्हणाला. तीनहि जण एक एक खुर्ची ओढून बसले. गणू माझ्या शेजारी बसला.

'अध्यक्ष कोण बनतो बुवा?' गणूने प्रश्न केला.

'कोणीहि व्हा ना, त्यांत काय मोठसं!' म्हादू बोलला.

'तूंच बन ना, म्हादू, चल!' गणूने त्याला बोलविलें.

'आपल्याला सभा चालवितां येत नाही. कॉलेजांत जेव्हा सभा होतात तेव्हा आपण दांडी मारतों! ह्या रमेशला करा.'— म्हादू

'आपण सभेंत कधीच बोललों नाही बुवा.' रमेश

'मी बनायला तयार आहे. पण चालेल का?' मी म्हणालों.

'अच्छा जाने देव,' गणू म्हणाला, 'मीच बनतों. अनुमोदन द्या!'

'एस् एस्, दिलं! करा सुरुवात.' सगळीं ओरडलीं. मीपण ओरडून गेलों. पण इतरांचें लक्ष नव्हतें.

प्रास्ताविक भाषण करण्यासाठी गणूने म्हादूस विनंती केली. त्याने बरेच आढेवेढे घेतले, पण रमेशने व प्रकाशने त्यांस बाकोटीस धरून उठविलें. तो म्हणाला, 'मित्रानो, आज चीनने भारतावर पाशवी आक्रमण केलें आहे. आज भारताच्या स्वातंत्र्यसूर्यास ग्रहण लागेल असें दिसत आहे. आमचे जवान आज प्राणपणाने



लढताहेत. घरटीं एक तरुण लष्करांत भरती व्हायला पाहिजे. आमचे मित्र श्री. चंदू मोतीवाले हेहि राष्ट्राच्या संरक्षणासाठी लढण्यास सिद्ध झाले आहेत. त्यांना निरोप देण्यासाठी ही सभा आयोजित केली आहे.' त्याने भाषण संपविलें.

गणू उठला. हार माझ्या गळ्यांत घातला नि हातांत (बिन) वासाच्या फुलांचा गुच्छ दिला. सगळ्यांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. (हार घातला जात असतांना मला फोटोग्राफरची आठवण झाली.)

गणूने भाषण करण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, 'उपस्थित सज्जनहो, (आमच्यांत दुर्जन कोणी नव्हता ह्याची खात्री आम्हा सर्वांना होतीच.) आजच्या प्रसंगीं भारताची कशी स्थिति आहे हें आपण जाणतां आहांच. आपण येथे जमलों आहोंत. तिकडे सीमा आघाडीवर आपले शूर जवान काय करत असतील बरे? संगीनी रोखून बसले असतील! आपले पंतप्रधान म्हणतात...' पुढे त्याने बावीस तारखेला रेडियोवर झालेलें नेहरूंचें सबंध व्याख्यान तोंडपाठ म्हणून दाखविलें. सुसंगति विसंगति वगैरेचा विचार त्याने मुळीच केला नाही. आम्ही जांभया देत देत त्याचें भाषण सहनशीलतेनें ऐकत राहिलों. पुढे तो म्हणाला, 'चव्हाण म्हणतात...' चव्हाणांचें वर्तमानपत्रांत आलेलें व्याख्यान आठवून आठवून त्याने म्हटलें. शेवटीं तो म्हणाला, 'महाराष्ट्राचा काळा फत्तर छातीचें कोट करून हिमालयाच्या रक्षणासाठी धांवून जाईल! आमचा मित्र चंदू मोतीवाले आज लढण्यास जात आहे. आम्हा सर्वांच्या सदिच्छा त्याच्या सदैव पाठीशी राहतील.'

मला उद्देशून तो म्हणाला, 'चंदू, तूं निःशंकपणे आघाडीवर जा. तूं लढाई जिंकून परतल्यावर आम्ही तुझें स्वागत करूं. तुमच्यासाठी रक्त, घाम व पैसा सगळं सगळं कांही पाठवायला आम्ही कसूर करणार नाही. चिनी नरकासुराचा निःपात तुझ्या हातून होऊं दे. स्वर्ग जिंका वा मही! ऐका रणीचे चौघडे! शुभाशिर्वाद! जयहिंद!' त्याने भाषण संपविलें.

त्याने मला आशीर्वाद देऊन टाकला; वस्तुतः मी त्याच्यापेक्षा मोठा आहे. कॉलेजरेकॉर्डप्रमाणे तो मोठा आहे.

रमेश बसल्या जागेवरूनच म्हणाला, 'माझें देखील भाषण आपल्या अध्यक्षाप्रमाणेच आहे. चंदूला माझ्यापण सदिच्छा.' म्हादू आणि प्रकाश यांनीं देखील भाषणें न देतां फक्त सदिच्छा व्यक्त केल्या. एका दृष्टीने तें बरेंच झालें.

मग मी उत्तरादाखल भाषण करण्यास उठलों. 'लवकर आटप बुवा!' रमेश कंटाळून म्हणाला. मी म्हणालों, 'आपल्या सर्वांच्या सदिच्छा माझ्या पाठीशीं आहेत म्हणून मी आपला आभारी आहे. तुमच्या सदिच्छेमुळे मला भीमाचें बळ आलें आहे. लालचिन्यांना आपण पाणी पाजूं, असा मला ठाम विश्वास वाटतो. .. जयहिंद!' मी अधिक पाल्हाळ न लावतां भाषण उरकाविलें. "माझा कंठ दाटून आला होता कारे?" मी भाषण संपल्यावर विचारलें. फक्त म्हादूच्या मतें माझा कंठ दाटून आला नव्हता.

सभेच्या शेवटीं 'जनगण मन' म्हणण्याचा प्रघात आहे. परंतु तें गीत गणूशिवाय कोणाचेंच पाठ नव्हतें.

'राष्ट्रगीतके लिये होशियार!' गणू उठून खड्या आवाजांत म्हणाला. आम्ही नाइलाजानें उठलों. ताठ उभे राहिलों. गणूने सुरवात केली,

'जन मण नन अधिनायक जय हे ऽऽ'

परंतु शेवटपर्यंत तो एकटाच म्हणत राहिला. रमेश, म्हादू, प्रकाश इकडे तिकडे बघत उभे राहिले. मीपण मूकस्तंभासारखा उभा राहिलों. राष्ट्रगीत सभेच्या सुरवातीसच घेऊन टाकावें, अशी कल्पना माझ्या डोक्यांत चमकून गेली. कारण, राष्ट्रगीत म्हणण्याचा बहुतेक लोकांना कंटाळा येतो. लाउडस्पीकरवरून 'थांबा, थांबा' अशी सूचना देऊनहि लोक थांबत नाहीत! 'भारत माता की जय' असें मात्र आम्ही एका आवाजांत म्हटले.

'थांबा' अशी हाताने खूण करुन गणूने बशा आणल्या. 'काय?' आम्ही पृच्छा केली.

'अल्पोपहार'? तो म्हणाला. अल्पोपहारच्या नांवाखाली आमचा पूर्णापहार झाला. करंज्या, चकल्या, अनारसे, शंकरपाळीं वगैरे पदार्थ मेड ॲट होम होते. कचोरी व समोसा बाजारातून

मागविले होते. मला ' अल्पोपहारा ' ची कल्पना रूचली नाही. मी तसें म्हटलें देखील. पण तिकडे कोणी लक्ष दिलें नाही. ' आता आपल्याला बॉर्डरवर थोडेच मिळणार हे पदार्थ ' असा विचार करून मी ते पदार्थ चापून खाल्ले.

' अच्छा ऽ ' असें म्हणून आम्ही त्याचा निरोप घेतला. त्याचे स्पेशल आभार मानण्यास मी विसरलों नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच गणू माझ्याकडे लगबगीने आला व मला माझें वजन-उंची विचारूं लागला.

' शंभर पौन्ड, पांच फूट साडे दोन-अडीच इंच. ' मी ऐटींत म्हणालों.

' उं...हूं ! यू आर नॉट इलिजीबल फॉर रिक्रूटींग ? ' माझी फार निराशा झाली ! माझा चेहरा हिरमुसला झाला !

' आपला निरोपसमारंभ फुकट गेला ! ' मी म्हणालों.

' जाने देव, ' तो म्हणाला. ' नेव्हर माइंड ! जातां आलें नाही तरी आपण इथे मोर्चा काढून चौ एन् लायची प्रतिमा जाळूं ! तूं नेतृत्व कर. '

मी ती सुपारी आनंदाने स्विकारली. तो निघून गेला व मी अर्नाळकरांची ' अंतरीची ओढ ' वाचावयास घेतली.

———

# साक्षात्कार....

युगे युगे अठ्ठावीस
पाय रोविले विटेंत
भक्तजनांची पुण्याई
विठाबाईच्या ओटींत १

दोन हात कटिवरी
कसा उभा वीटेवरी
विठाबाईच्या रूपाचा
नांव लौकिक (!) ' बाजारीं ' २

विठ्ठरायाच्या डोळ्यांत
' चन्द्रभागा ' जी विसावे
जेथे नभ रडे बाई
कोणी पुसावी आंसवें ? ३

पाय शोधतां राऊळीं
पंचप्राण गोळा झाले
एकतारीच्या सुरांत
" पाय पालखींत आले " ४

—शशीकान्त राजदेरकर
टी. वाय्. बी. एस्सी.



# भूलोकींची कल्पलता : अतृप्तता....

ले.– गोविंद ख. इंगळे ( बी. ए. प्रथम वर्ष– कलाविभाग )

वाचनालयांतून पुस्तक घेऊन मी घरीं परतलों असतां माझ्या मनाची मोठी विचित्र अवस्था झाली होती. खरं म्हणजे तें माझ्या आवडत्या लेखकाचं एक चांगलं नांवाजलेलं पुस्तक होतं. त्याचा शोध करतां करतां मी थकून गेलों होतों आणि आतां तें कुठंच वाचायला मिळायचं नाही अशी मनाची समजूत झाली होती. पण तेंच पुस्तक आमच्या खेडेगांवांत मिळतांच माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. मला हा जो आनंद झाला तो चिरकाल टिकणारा ठरला नाही. श्रावणांत क्षणभरच्च पावसाची रिमझिम बरसावी अन् फिरून ऊनं फाकावं तसाच माझा आनंद लुप्त झाला आणि मला मोठा खेद झाला.

मला दुःख झालं तें अशासाठी कीं त्या पुस्तकाचीं शेवटचीं १५–२० पानं संपूर्ण गेलीं होतीं. माझ्या हातांत पडलं होतं तें अपुरं पुस्तक ! एवढंच नव्हे तर त्या शेवटच्या पानावर जें मोठं सुंदर वाक्य होतं तें देखील तसचं अपुरं ! वाक्याचा पूर्वार्ध मोठा चित्तवेधक होता आणि तें पुरं वाचावं या आशेनं मी तें वाचूं गेलों तों तें अपुरं ! मला किती खेद वाटला ! खूप भूक लागलेली असावी, आपल्या आवडीच्या पक्वान्नांचा एकच घास घ्यावा आणि समोरचं ताटचं ताटच नाहीसं व्हावं तसं मला झालं. आणि अशा तऱ्हेनं मला मोठी चुटपुट लागून राहली.

मला जाणवणारं हें दुःख आणखी वाढलं तें सारं पुस्तक वाचून संपवितांना. एक अत्यंत सुंदर कथानक लेखकानं मोठ्या कौशल्यानं गुंफत आणलं होतं. त्यांतलीं पात्रं अत्यंत रेखीव, ठसठशीत आणि चित्तवेधक वठलीं होतीं. नायक आणि नायिकेचं अस्फुट, कोवळ्या कळीसारखं प्रेम फुलवतांना त्याच्या लेखणीला विलक्षण नाजुकपणा प्राप्त झाला होता आणि ऐन उकलीच्या वेळेला ती कादंबरी संपली होती. संपली होती याचा अर्थ असा कीं, पुढची पानंच नव्हतीं. पुढचं कथानक कसं असेल ? नायक–नायिकेचं मिलन झालं असेल कीं नाही ? कीं ती कादंबरी शोकान्त असेल ? अशा अनेक प्रश्नांनीं मला सतावून सोडलं. ज्यानं तीं पानं फाडलीं होती त्याच्यावर मी किती आणि कसा संतापलों असेन हें काय सांगायला हवं ?

हाच नव्हे तर असे अनेक प्रसंग माझ्या वाट्याला आले, कीं त्या त्या वेळेला माझ्या वाट्याला असं अपुरं सुख आलं. ऐन भरलं ताट डोळ्यादेखत नाहीसं झालं. दूरचं कशाला ? शेजारच्या राधाकाकूंच्या सुनेचं बघा ना. रूपा आणि राधाकाकूंच्या मोहनचं लग्न पाहून कुणालाहि आनंदच झाला असता. अगदी लक्ष्मी-नारायणाचा जोडा. रूपा नक्षत्रासारखी. दोघांचा चिमणा–चिमणीचा संसार. पण हा सारा गोड संसार दैवाला पाहवला नाही. संसाररथाचं चक्र– मोहन– ऐन उमेदींत मोडून पडलं. रूपाच्या लग्नाच्या हळदीचा रंगहि अजून फिका झाला नव्हता. बिचारीचा भरला संसार उधळला गेला. जीवनांत याहून दुःखद असं काय आहे ?

अशाच प्रकारचे शेंकडो अनुभव तुम्हाला आणि मला जीवनांत पदोपदीं येत असतात. आणि मग सुखानं आणि दुःखानं मन काठोकाठ भरून जातं. आणि माझ्या मनांत एकच प्रश्न घुमत रहातो. " देवानं माणसाला पूर्ण सुख उपभोगूं द्यायचं नाही असंच ठरवलं आहे काय ? कुणाचं सुख पुरं झालेलं त्याला खपत नाही काय ? "

मी हा जो प्रश्न मनाशीं विचारतों तो उगाच नव्हे. साऱ्यांच्याच जीवनाचा तो अनुभव आहे. पहा ना, अत्यंत सुंदर सिनेमा. आपले आवडते कलाकार, चित्त-वेधक कथानक, आणि कान तृप्त करणारं अनुपम संगीत. आता पुढं काय होणार म्हणून मोठ्या आतुरतेनं चित्रपट बघत असावं आणि ऐन अशावेळीं आपल्याला तो चित्रपट अपुरा टाकून जावा लागावं, किंवा ऐन उन्हाळ्याच्या दिवसांत थंडगार पाण्याचा पेला तोंडाजवळ न्यावा आणि १–२ घुटके घेतां घेतां तो हातांतून निसटून

जमिनीवर पाणीच पाणी व्हावं व तहान मात्र तशीच अपुरी रहावी यासारखे प्रसंग माणसाच्या आयुष्यांत काय कमी येतात? अशावेळीं मनांत विचार येतात, "हें असं कां? माझा हा ऐन सुखाचा घास मला कां घेतां येऊं नये? मला हें अपुरंच सुख का मिळावं? मला हें सुख पुरं कधीच मिळायचं नाही कां? माझी ही भूक अशीच अपुरी रहायची कां? मला ही जी तहान लागली आहे ती कधीच भागूं नये काय?"

तें अपुरं पुस्तक वाचून संपविल्यावर या साऱ्या प्रश्नाचं थैमान उठून मी कमालीचा अस्वस्थ झालों. मला जीवनांत सुख हें असं अपुरं उपभोगावं लागावं याचा फार मोठा खेद झाला. आणि असं हें सुख देणाऱ्या देवाचा म्हणा कीं दैवाचा म्हणा मोठा राग आला. हें असं कशाला? नसेल सुख चाखूं द्यायचं तर त्याची चव देऊन जीवाला चटका तरी कां? हें असं अपुरं अतृप्त... त्यापेक्षा नकोच तें सुख!

माझ्या मनाला स्वस्थता लाभली नाही. दुपारीं मी रमाकाकूकडे सहज गेलों. आपल्या उनाड मुलाचं गाऱ्हाणं सांगून, त्याचं कसं होणार याची काळजी व्यक्त करून त्या मला शेवटीं म्हणाल्या, "याला अजून समजत कसं नाही? आई-बाप काय जन्माला पुरणार आहेत?"

रमाकाकूंच्या घरून आल्यावर तेंच वाक्य माझ्या कानांत कितीदा तरी घुमलं, "आई-बाप काय जन्माला पुरणार आहेत? आई-बाप काय जन्माला पुरणार आहेत?"

माझ्या मनांतल्या त्या प्रश्नानं पुन्हा उचल खाल्ली. आई-बाप जन्माला न पुरणं हें देखील आयुष्यांतलं एक अत्यंत मोठं पण अपुरंच सुख नव्हे काय? आई-बापाच्या प्रेमाचं वर्णन मी पुन्हा कशाला करायला पाहिजे? कोवळ्या अंकुराला वाढवावं तितक्या काळजीनं आपलं लालन-पालन करणारे, सदैव आपल्या सुखाची इच्छा करणारे आई-बाप जन्मभर पुरणार असले तर ते कुणाला नकोसे होतील?

पण ते जन्मभर पुरत नाहीत. पुरावेत असं वाटून देखील पुरत नाहीत.

आणि मग मला वाटतं, या अपुऱ्यांतहि एक प्रकारची पूर्णता आहे. हें अपुरं सुखहि मोठं सुखद आहे. पहा ना, आपले हे आईबाप आपल्याला जन्मभर पुरणार नाहीत, असं माहित असूनहि आपण त्यांच्या प्रेमाचा अव्हेर केला आहे काय? आई-बापच कशाला, पत्नी, पुत्र, मित्र सारींच घ्या. त्यांच्यापासून मिळणारं सुख हें आयुष्यभर सतत आणि पूर्णांशानं मिळत राहिलं असं थोडंच आहे? मी हायस्कूलमध्यें असतांना माझा एक अत्यंत जिवलग मित्र होता. त्यानं माझ्यावर अलोट प्रेम केलं आणि मीहि त्याच्यावर सतत प्रेमाची बरसात केली. आमचा तो ३-४ वर्षांचा काळ अत्यंत सुखद असाच म्हटला पाहिजे. पण मॅट्रिकनंतर आमच्या आयुष्याला वेगळीं वळणं लागलीं. आणि नंतर माझा तो मित्र मला अजून भेटला नाही. त्याची ती सुखद स्मृति तेवढी माझ्या मनांत आहे. अत्तर उडून गेल्यावरहि रिकाम्या बाटलीचा वास यावा ना तशी!

माझ्या ह्या अत्यंत प्रिय सुहृदाच्या सहवासाचं प्रेम जें मी लुटलं, त्याचा जो अवीट आनंद उपभोगला तेव्हा हें सुख अपुरं आहे तें तसं जन्मभर मिळणार नाही याची मला कल्पना नव्हती असं थोडंच आहे? मला तेव्हा कल्पना होती तरी देखील मी तो आनंद उपभोगलाच की नाही? मग मी अपुऱ्या सुखाला कां नावं ठेवावी?

अन् मला साऱ्या अपुऱ्या सुखाची आठवण झाली. मला असं वाटत गेलं कीं माणसाचं सारं आयुष्यच मुळीं अपुऱ्या सुखाचं बनलं आहे. तें अपुरं पुस्तक, तो अपुरा सिनेमा, वगैरे अनेक प्रसंग मला आठवले. मी मनाशीं म्हटलं मला सिनेमाचं अपुरच सुख मिळालं हें खरं पण तेंहि केवढं सुखकारक होतं! पुरं मिळालं नाही म्हणून मी मिळालेला आनंद कां लाथाडावा? छे...छे... मिळालं तेवढं सुख घेतलं पाहिजे. आणि मिळालेल्या आनंदात न मिळालं त्याचं दुःख विसरलं पाहिजे.

अपुरं सुखच एकप्रकारे अमर्याद असतं. कसं तें बघा. तो सिनेमा मी अपुराच पाहिला. त्याचा शेवट मला ठाऊक नव्हता. मी मनांतच त्याचा मला आवडलेला शेवट केला. प्रत्यक्ष सिनेमांत नायक नायिकेचं



मिलन होत नसलं तरी मी मनांतच त्यांना कायमचं एकत्र आणून टाकलं होतं. पुस्तकाचा मला आवडणारा शेवट करून टाकला होता. माझी कल्पना-शक्ति स्वतंत्र राहूं शकत होती. तिला पूर्ण वाव होता.

कल्पना करण्याचं सुख मला तो सिनेमा पुरा पाहून अथवा पुरं पुस्तक वाचून मिळालं असतं कां? सिनेमाचा शेवट मला न आवडणारा असता तरी तो सहन करावा लागला असता. पण दोघांचा अपुरेपणा माझ्या वाट्याला आलेला असतांना मी त्यांना माझ्या मनाने एक प्रकारचा पुरेपणा आणला होता. कल्पनेच्या अनेक भराऱ्या मारल्या होत्या आणि सारं कसं मनासारखं घडवून आणलं होतं.

असं असतांना मी अपुऱ्या सुखाचा खेद काय म्हणून बाळगावा? खरं सांगायचं तर मला पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रबिम्बापेक्षा द्वितीयेची चिमुकली चंद्रकोरच अधिक आवडते. अन् म्हणूनच मी आतां मुद्दाम शेवट नसलेलीं पुस्तकं आणणार आहे अन् ऐन रंगला असतां सिनेमा अपुरा टाकून येणार आहे.

---

: प्रथम श्रेणीच्या :

चित्रा स्टोअर्सला

भेट द्या!

* कपबशा * ग्लासेस *
-आणि-
सर्व प्रकारच्या कांच व चिनी सामानाकरितां

-आणि-

टाईम्स, नवभारत टाईम्स, फिल्म फेअर, पराग, इलस्ट्रेटेड वुइकली, फेमिना व धर्मयुग

नवीन प्रकाशन :— महाराष्ट्र टाईम्स, सारिका, एकॉनॉमिक टाईम्स व
दैनिक केसरीचे अधिकृत विक्रेते

चित्रा स्टोअर्स, १८, फुले मार्केट, जळगांव.

# आरती....!

ले.– दिवाकर द. गंधे
बी. ए. द्वितीय वर्ष– कलाविभाग

गणूकाकांनी डोळे चोळून ज्यावेळीं पाहिले, त्यावेळीं सूर्याचीं कोवळीं किरणें खिडकी- फटींतून धूलीकणांना अंगाखांद्यावर घेऊन त्यांच्या अंथरुणावर येऊन पहुडलीं होतीं. ते हातांचा टेका जमिनीला देत उठले आणि बसल्या बसल्याच त्यांनी खालच्या खिडकीची एक फट आपल्या थरथरत्या हातांनी उघडली... आंत येणाऱ्या प्रकाशाच्या भपक्याने प्रथम त्यांचे डोळेच दिपले! आणि वाऱ्याच्या थंडगार झोताने त्यांचें शिडशिडीत अंग शहारलें! त्यांनी आपली उदास नजर खिडकीबाहेर खिळविली. एकंदरीत चांगलेंच उजाडलें होतें. आज आपणांस पलिकडच्या विठोबाच्या देवळांतील पहाटे होणारी काकड आरती कशी ऐकूं आली नाही ह्याचं गणूकाकांना आश्चर्य वाटलं. एवढ्या सत्तर वर्षांच्या आयुष्यांत गणूकाका उजाडेपर्यंत झोपलेले आहेत, असें कुणी पाहिले नव्हते. तिकडे पहाटे पांचाच्या सुमारास विठोबाच्या देवळांत काकडआरतीस सुरुवात झाली असली म्हणजे गणूकाका इकडे थंडगार पाण्याने आंघोळ करून, नुकत्याच नेसलेल्या स्वच्छ धोतरावर आपलं जानवं पुसत असायचे, आणि ज्यावेळीं सर्वजण साखर–झोपेंत असत त्यावेळेस तर त्यांचें देवाजवळचें आन्हिकहि आटोपत असे. सात–साडेसातच्या सुमारास ज्यावेळीं घरांतील सारेजण उठत त्यावेळीं गणूकाका दाराच्या फटींतून आंत पडलेला 'केसरी' दाराच्या फटींतून येणाऱ्या अंधुक प्रकाशांत अगदी डोळ्याजवळ नेऊन वाचतांना दिसायचे. आतां–आतांशाच ते थोडे थकले होते. भूपाळ्या म्हटल्याशिवाय त्यांची एकहि सकाळ आतांपर्यंत सुनी गेली नव्हती. गणूकाकांचा आवाज गोड होता. भजनं आणि भूपाळ्या ते फारच गोड आवाजांत म्हणत. गोड आवाजाबरोबरच ते म्हणतांना तल्लीन होऊन जात. त्यामुळे तर त्या भजनांना व भूपाळ्यांना एक विशेषच गोडवा प्राप्त होई. परंतु आज सूर्य चांगला त्या समोरच्या दिनूअण्णांच्या घराच्या कौलावर येऊन बसलेला पहातांच गणूकाकांना फार आश्चर्य वाटलें. त्या आश्चर्यांत थोडी खेदाचीहि भर होती. गणूकाकांना अगदी अपराध्यासारखं वाटलं. शेजारच्या खोलींत असणाऱ्या घड्याळांत आठाचे ठोके पडलेत. मात्र गणूकाकांना उशिरा उठण्याचें कारणहि लगेच लक्षांत आलें. काल रात्रीं त्यांना खूप ताप भरला होता. आणि रात्रीं २ वाजेपर्यंत त्यांना झोप आली नव्हती. साधारणतः अडीचच्या सुमारास गणूकाकांचा डोळा लागला होता आणि मग सकाळीं आठ वाजेपर्यंत मात्र झोपेने त्यांच्यावर चांगलाच अंमल चालविला होता!

गणूकाकांनी उठण्याचा प्रयत्न केला. पण थोडावेळ असेच तक्क्याला टेकून बसावे असें त्यांना वाटलें. तोंडाने श्लोक पुटपुटत त्यांनी एक जांभई दिली. आणि आपली खोल गेलेली नजर दाराकडे लावली. दाराजवळ नेहमीप्रमाणे ' केसरी ' पडलेला नव्हता. तो घरांतील कुणीतरी वाचण्यासाठी म्हणून पळविला होता. गणूकाकांनी आपल्या नातवंडाला हांक मारली, " राम... अरे राम . ! " वास्तविक ज्या नातवाला ते हांक मारीत होते त्या नातवाचें नांव हें नव्हतें. त्याचें खरें नांव होतें बबलू! पण हें ' सिनेमा-थाटी ' नांव गणूकाकांना मुळींच आवडत नव्हते... म्हणून ते बबलूला, राम म्हणून हांक मारीत. गणूकाकांच्या आवाजांत थोडी क्षीणता होती. तरी पण त्यांतला करारीपणा मात्र लोपला नव्हता. एवढ्यांत त्यांच्या मधल्या मुलाचा मुलगा–बबलू धावत आजोबापाशी आला आणि गणूकाकांना त्याने एकदम मिठीच मारली. गणूकाकांनी त्याचे मोठ्या प्रेमाने दोन–तीन पापे घेतलेत. ते त्याला म्हणाले,

" राम, जा बरं. आईला म्हणावं आजोबा उठले आहेत; त्यांना तोंड धुवायला पाणी दे. "

बबलू आजोबांची आज्ञा पालन करण्याकरिता त्वरित आंतल्या घरांत आईकडे धांवत गेला.

गणूकाका हळूच उठलेत. कुणाच्याच मदतीची अपेक्षा नको म्हणून तीन खोल्या हळूहळू चालत स्वयंपाकघरांत आले. त्यांची मधली सून त्यांच्यासाठी गरम पाणी घेऊन येतच होती. मधली सूनच काय ती आपली थोडी काळजी घेते, बाकीच्यांना मी म्हणजे अडगळ वाटतो; अशी समजूत ह्या कांही दिवसांतच



गणूकाकांची होत चालली होती. आणि ती समजूत खरीहि होती.

गणूकाकांनी तोंड धुतलें. तोंडावर पाणी मारतांच त्यांच्या साऱ्या अंगांत शिरशिरी निर्माण झाली. मोठ्या हिंमतीने ते परत तीन खोल्या पार करून आपल्या खोलींत गादीवर येऊन बसले. एवढ्यांत त्यांच्या दोन नंबरच्या मुलाची मुलगी सुमी तिने गणूकाकांना चहा आणून दिला. आणि ती आली तशी निघून गेली. ' आजोबाशी फार लाडं लाडं करायचं नाही हं! ' असा सक्त इशारा तिच्या आईने तिला दिला होता. गणूकाकांच्या कानावर तो आला होता. तिला हांक मारण्यासाठी त्यांचे विलग झालेले ओठ तसेच राहिले. थरथरत्या हातांनी गणूकाकांनी हळूहळू चहा पिऊन टाकला. त्यांना हुशारी वाटली. बसल्या बसल्या त्यांना सहज कालच आलेल्या आपल्या मुलीच्या पत्राची आठवण झाली. तापाच्या भरांतच काल त्यांनी तें आपल्या नातवाकडून वाचून घेतलें होतें. त्यामुळे त्यांतील मजकूर त्यांच्या नीटसा लक्षांत राहिला नव्हता. त्यांनी गादीखालीच ठेवलेलें तें पत्र थरथरत्या हातांनी काढलें आणि तक्क्याच्या मागे ठेवलेला तडा गेलेला चष्मा काढला. त्याची एक काडी ढिली झाल्यामुळे तो एक–दोन वेळा तरी त्यांच्या डोळ्यांवरून निसटलाच! एका हाताने चष्म्याची उजवी बाजू धरून त्यांनी आनंदभराने तें पत्र वाचलें. त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू जमा झाले. गणूकाकांची ही एकुलती एक मुलगी. सगळ्यांपासून बऱ्याच दूर जाऊन पडली होती. गणूकाकांचा तिच्यावर फार जीव. तिने महिना–पंधरा दिवसांसाठी अगदी आवर्जून गणूकाकांना तिच्याकडे बोलावले होते. तिच्या प्रेमळ पतीनेहि त्याच पत्रांत गणूकाकांना येण्याचा आग्रह केला होता. त्यांच्या एकाकी वाटणाऱ्या मनाला ह्या दोघांची पत्रांतून व्यक्त होणारी आत्यंतिक आपुलकी केवढी दिलासा देणारी वाटली! परंतु हें वडिलोपार्जित घर, ही मुलें–बाळें सोडून जाणें त्यांच्या जीवावर येत होतें. उतारवय झालें आणि मृत्यूची सीमारेषा जवळ दिसूं लागली म्हणजे माणसाला, स्वतःचें गांव, स्वतःचें घर सोडवत नाही असें जें म्हणतात तें गणूकाकांनाहि पटूं लागलें होतें. त्यामुळे त्यांचा निर्णय पक्का ठरत नव्हता. घरांतून बाहेर पाय काढण्याची कल्पनाहि त्यांना नकोशी वाटली. एकीकडे मुलीचें आत्यंतिक प्रेम त्यांना ओढीत होतें तर दुसरीकडे तें खूप मोठें, वडिलोपार्जित घर त्यांना जाऊं द्यायला तयार नव्हतें. सत्तर वर्षांच्या आयुष्यांतील गोड–कडू फळें त्यांनी ह्याच घरांत चाखली होती. आणि अनेक चांगल्या–वाईट स्मृतींच्या लाटेवर तें ह्याच घरांत..... ह्या घराला फक्त दगडविटांचाच आधार नाही. तर प्रेम, आपुलकी, श्रद्धा यांच्या आधारानेच तें आज दीडशें वर्षें झालीं कणखरपणे उभे आहे. न जाणो मुलीकडे गेलों आणि तेथेंच समजा वरचें बोलावणें...... असला थोडा विचित्र विचारहि त्यांच्या मनांत चमकून गेला. त्यांतून त्यांना दोन दिवस झाले घरांतल्या घरांतहि धड चालवत नव्हते. तर मग प्रवासाची दगदग काय सहन होणार!! त्यांनी पत्र थोडे नाराजीनेच आपल्या डोळ्यांसमोरून बाजूला ठेवलें. आणि मग गणूकाका कितीतरी वेळ बाहेरील लिंबाच्या झाडावर चाललेल्या दोन खारींच्या खेळाकडेच पहात राहिले. त्यांच्या चेहेऱ्यावर विलक्षण भाव पसरले. जणूं त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांचें बालपण साक्षात् उभे राहिलें असावें, असें भासलें! पण पलिकडच्या खोलींतून त्यांच्या मोठ्या नातवाने म्हटलेली गणपतीची बोबडी आरती ऐकूं आल्यावर ते एकदम भानावर आले. त्यांना एकदम कांहीतरी आठवलें. आणि ते उठवत नव्हते तरी घाईनेच उठले. मधल्या खोलीच्या दारांत उभे राहून त्यांनी मोठ्या आवाजांत हांक मारली,

" सूनबाई... अगं सूनबाई ऽऽ...

जवळपास कुणीच नव्हते. शेजारच्या खोलींत गणूकाकांची दोन नंबरची सूनबाई आपल्या पतिराजांना ' ब्रेकफास्ट ' देण्यांत दंग झाली होती. गणूकाकांची हांक ऐकून तिने आपल्या पतीला–माधवला– म्हटले,

" पहा झाली लागलीच हांक! सारखी दिवसभर कटकट असते. आताशा हाताशीं कुणीना कुणी लागतंच. जेव्हा पहावं तेव्हा आपलं ' सूनबाई... सूनबाई ' म्हणून हांका मारीत असतात. सूनबाई म्हणजे यांना काय काणी खेळणं वाटलं की काय? "

मात्र यावर माधव गप्पच होता. मालतीच्या तोंडीं कोणी लागावे ? म्हणून त्याने लोणी लावलेल्या पावाचा एक तुकडा तोंडांत टाकला. एवढ्यांत मालती फणकाऱ्याने बाहेर आली. आणि तिने थोड्या रुद्ध स्वरांतच गणूकाकांना ' काय पाहिजे ? ' म्हणून विचारले. गणूकाका नेहमीच्या संवयीप्रमाणे थोडे हसले. आणि मोठ्या उत्साहाने त्यांनी विचारले,

" अगं सूनबाई... आज कार्तिकी एकादशी आहे ना ? "

" मला नाही माहीत काय आहे तें ! " मालतीने उत्तर दिले.

" अगं, मग मला तेवढं पंचाग आणून दे पाहूं... जरा बघायचं आहे ! "

आणि गणूकाका देवाचें नांव पुटपुटत पुन्हा आपल्या खोलींत गादीवर येऊन बसले. त्यांच्या डोळ्यांत पाणी जमा झालें होतें !! आज कार्तिकी एकादशी असावी असें त्यांना वाटलें. तीन दिवस तापामुळे ते भानच हरपून बसले होते. कार्तिकी एकादशीला त्यांच्या गांवचा रथ असतो. श्रीरामाचा रथ ! आज गांवांत जी धामधूम चालली आहे ती त्याच्याच उत्सवाची असावी. त्यांना आठवलें. आज अडीचशें वर्षें झालीं हा श्रीरामाचा रथ नियमाने निघतो आहे. त्यांत कधीहि खंड पडला नाही. आपल्या घराण्यांतहि रथाला आरती नेण्याचा परिपाठ कधी चुकला नाही. कधीहि रथाला आरती चुकली नाही. आतां शहर वाढलें आहे. नव्या लोकांची देवावरची श्रद्धा थोडी कमी झाली आहे. पन्नास वर्षांपूर्वी ह्या गांवांत आम्हीच काय ते एकटे ब्राह्मण होतों. आणि रथाला आमचीच पहिली आरती जायची. ती आरती आजपर्यंत चालत आली आहे. ती आरती म्हणजे श्रद्धेचा दिवा ! तो आजपर्यंत न विझतां घराण्याला प्रकाश देत आला आहे. खरेंच काय तें दृश्य असायचें !... सकाळपासून रथ ओढायचा... रात्रीं ,राममंदिरांत सगळ्यांना फराळ व्हायचा. त्या दिवशीं रामाच्या मूर्तीहि किती प्रसन्न दिसायच्या !! पण... पण... आज कसें व्हायचें ?... गणूकाका ह्या विचाराने भानावर आले. आज कसें होणार ? रथाला आरती कोण नेणार ? रथ सायंकाळीं साधारण साडेसातच्या सुमारास येथून तीन गल्ल्या पलीकडे त्या आठवल्यांच्या कोपऱ्यावर येतो. पण मला तर साधें घरांतहि चालवत नाही... मी कसा नेऊं शकेन आरती ? इतक्या लांब आपल्याला कसें चालविले जाईल ? ह्याच एका काळजीग्रस्त विचारांत गणूकाका पडले. पण लागलीच त्यांना मार्ग सापडला. त्यांच्या खडबडीत उदास चेहेऱ्यावर एक हास्यरेषा चमकून गेली. प्रभाकर, पद्माकर, माधव, भाऊ नाहीतर दिनू कोणीतरी आज आरती घेऊन जाईल. आपण कुणाला तरी सांगू न्यायला आरती. पोरं आनंदाने नेतील. माझीच मुलं आहेत तीं. आणि गणूकाकांना हायसें वाटलें. त्यांच्या डोक्यावरचें काळजीचें ओझें ह्या नुसत्या विचाराने हलकें झालें. एवढ्यांत सुनबाईने घरांतील पंचांग मुलांना चिवडा वाढण्यासाठी म्हणून फाडल्यामुळे शेजारच्या दामूअण्णाकडील मागून आणून गणूकाकासमोर टाकलें. गणूकाकांनी तें निरखून पाहिलें. ह्या अपरिचित पंचांगाची ओळखहि त्यांच्या अधु डोळ्यांना पटल्याखेरीज राहिली नाही. त्यांनी आपला तडकलेला, ब्रिनकाडीचा चष्मा डोळ्याला लावला. चष्म्याची एक बाजू धरून त्यांनी पंचांगाचें एक-एक पान उलटविण्यास सुरुवात केली. आणि तें कार्तिकाशी येऊन ठेपले. त्यांचे खोल... आणि पाणीदार डोळे एका पानावर स्थिर झाले... क्षणांत विलसूं केवढा आनंद त्यांच्या चेहेऱ्यावर लागला !... हो आजच कार्तिकी एकादशी होती. आजच श्रीरामाचा रथ होता... त्यांनाहि उपवास करायचा होता. त्यांनी पंचांग बाजूला ठेवलें, पूर्वीसारखीच अजूनहि गर्दी होते. लाखो भाविक लोक खेड्यापाड्यांतून त्या रथोत्सवाला येतात. जग बदललें तरी अजूनहि जगांत श्रद्धा, ईश्वरावरील प्रेम, निष्ठा जिवंत आहे, हें त्या दिवशीं जमणाऱ्या अफाट जनसमुदायाकडे पाहून पटतें

आरती कोणाला सांगावी ह्याच विचारांत गणूकाकांचा बराच वेळ गेला. वास्तविक तीन दिवस झाले त्यांच्या अंगांत ताप होता. तरीहि ते आंघोळीसाठी उठले. आणि मधल्या घरांतून ते पलीकडे असणाऱ्या बॉथरूमकडे जाऊं लागले. एवढ्यांत माडीवरून त्यांना



पद्माकर येतांना दिसला. आरती नेण्यासंबंधी पद्माकरला विचारून पहावे म्हणून गणूकाकांनी त्याला हांक मारली. पद्माकर उसनें हास्य चेहेऱ्यावर खेळवीत वडिलाजवळ येऊन उभा राहिला. त्याच्या खांद्यावर हात ठेवीत गणूकाका त्याला म्हणाले,

" अरे पद्माकर, आपल्या गांवाचा आज रथ आहे. श्रीरामाचा रथ. दरवर्षी आपल्या घरांतून आरती जाते रामाला. आजहि आरती न्यायची आहे. पण कोण नेणार ? मी हा असा आजारी..... घरांतल्या घरांत चालवत नाही तर आठवल्यांच्या कोपऱ्यापर्यंत कसा जाणार ? तूं नेशील का सायंकाळीं तेवढी आरती ? "

" बाबा, नेली असती हो पण मला सायंकाळीं आज ऑफिसांतून परस्परच एका मित्रानं बोलावलं आहे. आज त्याच्या लग्नाचा वाढदिवस आहे म्हणून ...पार्टी आहे आम्हां मित्रांना... मग कसं शक्य... "

पण पुढील शद्ब ऐकायला गणूकाका तेथे उभे कोठे होते ! ते भरलेल्या डोळ्यांनीच बाथरूमकडे गेले. त्यांच्या खोल डोळ्यांच्या कपारींतून पाणी ओघळत होतें... पण त्या आसवांना पुसावे असें वाटलेंच नाही !

स्नान आटोपून येतांना त्यांनी मोठ्या सूनबाईला विचारले,

" अगं प्रभा आहे कां घरांत ? असला तर त्याला पाठव बरं माझ्याकडं ! "

सूनबाई प्रभाकरला बोलवायला वरती निघून गेली. गणूकाका समोर कोनाड्यांत ठेवलेल्या देवांसमोर येऊन हात जोडून उभे राहिले. त्यांनी डोळे मिटले एक क्षण... दोन क्षण ते तसेंच स्तब्ध उभे राहिले. जणूं त्यांच्या मिटलेल्या डोळ्यांना परमेश्वराचें साकार रूपच दिसत होतें ! प्रभाकरच्या चाहुलीने ते भानावर आले. प्रभाकराने जवळ येऊन त्यांना विचारलें,

" काय बाबा मला बोलावलं ? "

" अरे हो... हो. हें पहा आज आपल्या गांवाचा रथ आहेना ? अरे कार्तिकी एकादशीला नसतो का दरवर्षी ? आरती न्यायची आहे त्याला, पण कोण नेणार ? मला तर चालवत नाही रे... तूंच नेशील ना ? तेवढं माझं काम कर बाबा आजच्या दिवस ! "

मात्र प्रभाकर आपल्या अंगावरचें काम झटकीत म्हणाला,

" बाबा, न न्यायला काय झालं आरती ! पण रथ येतो सायंकाळीं आणि मी दुपारींसच ऑफीसच्या कामासाठी दौऱ्यावर जात आहे. त्यामुळे तें कसं जमणार ? आपल्या माधवला विचाराना ! "

आणि प्रभाकर वरतून गॅलरींतून खूणेने बोलावीत असणाऱ्या पत्नीकडे निघून गेला. वास्तविक आज प्रभाकरला मुळीच दौऱ्यावर जायचे नव्हते. दोघे पतिपत्नी आज सायंकाळीं एका नाटकाला जाणार होते !!

गणूकाका आपल्या खोलींत आले. त्यांच्या मनांत विचारांचें काहुर माजलें होतें... मी म्हणजे सर्वांना अडगळ वाटूं लागलों आहे काय ? कुणालाच त्या आरतीचं महत्त्व वाटत नाही परंपरागत चालत आलेल्या आरतीची अवहेलना करत आहेत सारे. देवधर्माचं कुणालाच महत्व राहिलं नाही. देव्हाऱ्यांत पूर्वी किती देव होते !... आज कोनाडाहि त्यांना खूप मोठा वाटतोय !! देव्हारा अडगळींत गेला, कदाचित मी गेल्यावर देवांह अडगळींत......

तोंच " काय बाबा, मला बोलावलं होतं ? "... ह्या माधवच्या शब्दांनीं गणूकाका भानावर आले माधवच्या हातांत भाजीच्या दोन पिशव्या भरलेल्या होत्या. तो भाजी बाजारांत गेला होत . प्रभाकरनेच त्याला इकडे पाठविले होते आणि ' आरती ' चीहि कल्पना दिली होती. डोळ्यांत आलेलें पाणी आपल्या धोतराच्या सोग्याला पुशीत गणूकाका म्हणाले,

" कायरे आज बरीच भाजी आणलीस ? आणि त्या पुड्यांत पेढेहि दिसतांहत; काय कसची गडबड आहे आज ? "

" कांही नाही बाबा... आज तारखेनं मालतीचा वाढदिवस आहे ना ! म्हणून सायंकाळीं आमच्या मित्रमंडळींना पार्टी आहे...आपल्या वरच्या हॉलमध्ये ! बाबा, आमच्या ऑफिसांतील माझे साहेबहि येणार आहेत . ! "

मात्र माधवचे हे शद्ब ऐकतांच गणूकाका थिजले. माल्तीपुढे माधव, 'आरती' ला काय महत्त्व देणार ? म्हणून त्यांचे ओठाजवळ आलेले शद्ब आंतल्या आंत एका आवंढ्याबरोबर चालले गेले. माधवने परत विचारले,

" बाबा काय काम होतं ? "

त्याच्या पाठीवर हात फिरवीत व उदास हंसत गणूकाका म्हणाले,

" अरे कांही नाही. कांही नाही. सहज बोलावलं होतं मी. काम वगैरे कांही नाही ! "

आणि गणूकाका आपल्या खोलीकडे चालले गेले.

भाऊने व्याख्यानाला जायचें कारण दाखविलें आणि दिनूने मित्रांबरोबर 'Dance with me O' Henry' ह्या इंग्रजी सिनेमाला जायचें कारण दाखविलें. एकूण आजच्या रथाबद्दल कुणालाच थोडीसुद्धा आस्था नव्हती.

सत्तर वर्षांच्या गणूकाकांना मात्र आत्यंतिक दुःख झालें. त्यांच्या मनांत असंख्य विचारांचे तुषार उठले. कुणाला कसं माझ्याबद्दल कांहीच वाटत नाही. तीन दिवस झाले मला ताप येतोय पण कुण्णी म्हणून माझी चौकशी करायला माझ्या खोलीकडे फिरकलं नाही. सगळ्यांना तळहातावरच्या फोडाप्रमाणं जपलं मी ! कुणाला एवढंसंसुद्धा दुःख होऊं दिलं नाहीं मी. सर्वांना वाढवलं, जीवाचा आटापीटा करून शिकवलं. आज सर्वांना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या आहेत. पण आतां सर्वच माझ्याजवळ असून दूर असल्यासारखी आहेत मनानं आणि शरीरानेहि ! ! सर्वांनाच मी अडगळ भासूं लागलों आहे. पण मी तरी कुठं जाऊं ? परमेश्वरसुद्धा माझीच परीक्षा पहातो आहे काय ? आणि गणूकाकांना त्यांच्या पत्नीची – सावित्रीबाईची – आठवण झाली. सावित्री कशाला गं मला एकट्यालाच ह्यांच्यांत सोडून गेलीस ? हें लाजिरवाणं जिणं मला अगदी नकोसं झालं आहे गं ! एवढं सगळ्यांना कष्टानं वाढवलं तें म्हातारपणीं सुख मिळण्यासाठी ! पण सावित्री मला लवकर बोलावणं धाड गं ! तुझ्या सहवासांतच माझं दुःख हलकं होऊं शकेल ..

गणूकाकांनी ओंजळींत तोंड खुपसून भरपूर रडून घेतलं. सर्व अश्रू त्यांनी वाहून जाऊं दिले. दुःखाचा भर थोडा ओसरला. आणि मग कर्तव्याची त्यांना जाणीव झाली. तें मनाशींच पुटपुटले... नाही, नाही, श्रीरामाला आरती गेलीच पाहिजे. ही आरती चुकली नाही पाहिजे. कुणालाच आस्था राहिली नाही .. श्रद्धा राहिली नाहीं. सारेच शहाणे झाले आहेत. रामापेक्षा सिनेमा महत्वाचा झाला आहे. माल्तीपुढे आरती फिकी वाटूं लागली आहे... कुणालाच आस्था नसली तरी मला गेलेंच पाहिजे. आज आरती रामाला पोंचलीच पाहिजे ...

° ° °

झाडांच्या फांद्याफांद्यांतून सोनेरी किरणं कलंडलीं. पक्ष्यांचे थवेच्या थवे आकाशांत उडाले. गांवांत तुफान गर्दीचा सागर हेलावत होता. दिवेलागणीची वेळ झाली होती. गणूकाका बाहेरच्या ओट्यावर बसले होते. कुणा–कुणाला 'रथ कुठपर्यंत आला', असें सारखे विचारीत होते. घरांत प्रभाकर, दिनू, भाऊ, पद्माकर कुणीच नव्हते. त्यांच्या बायकाहि दिसत नव्हत्या. माधव माल्तीची वरच्या हॉलमध्ये पार्टी चालली होती... एवढ्यांत आठवल्यांच्या कोंपऱ्यावर रथ आल्याचें कुणी तरी येऊन गणूकाकांना सांगितलें. अंगांत ताप असतांनांहि गणूकाकांना जोर आला. ते उठले. धडपडत ते आंत आले. त्यांनी खुंटीवरची आपली काळी टोपी काढून एकदा झटकली. आणि आपली शेंडी मधोमध दाबून त्यांनी ती डोक्यावर ठेवली. देवाजवळच्या निरांजनींत वात व तूप टाकले. सकाळींसच मोठ्या मिनतवारीने माधवच्या भाजीपाल्यांतून मागून घेतलेलें एक केळ त्यांनी ताम्हणांत ठेवलं. कुंकू व अक्षता ठेवल्या. निरांजन पेटविलें... आणि पैशांची त्यांना एकदम काळजी पडली. आता रुपया कोणाजवळ मागायचा ? घरांत तर कुणीच नव्हते. ते धावतच त्यांच्या खोलींत गेले. परवा विड्याची पानं आणलां होतीं त्यांतील कांही पैसे उरले असावेत म्हणून त्यांनी त्यांची गादी वरती उचलली. किरकोळ सात–आठ आण्यांचा खुर्दा निघाला. कोटाच्या खिशांत त्यांनी हात घातला. जेमतेम चार–पांच आण्यांची चिल्लर निघाली. त्यांनी ते सर्व पैसे तसेंच ताम्हणांत ठेवले. आणि डोळ्यांत पाणी येऊं न



देण्याच्या निश्चयाने ते पायऱ्या उतरून रथाकडे जाऊं लागले.

लाखों लोकांच्या गर्दीतून गणूकाका मोठ्या मुष्किलीने वाट काढीत काढीत जात होते. त्यांचे पाय लटपटत होते. 'मला सामर्थ्य दे !' म्हणून ते मनांतल्या मनांत श्रीरामाला म्हणत होते. धक्के व ठेंचा खात पण आरती विझूं न देता ते गर्दीतून मार्ग काढीत होते. पण रथाजवळ पोंचण्याआधीच एकदम् गर्दीचा एक लोंढा आला. आणि त्या लोंढ्याच्या लाटेने गणूकाका एकदम् फेकले गेले. त्या गर्दीत ते कोठे पडले ह्याचा कितीतरी वेळ पत्ताच लागला नाही. पण गर्दी सरली... रथ हालला गणूकाका रस्त्याच्या कडेला असणाऱ्या फूटपाथवर पडले होते. त्यांच्या गुडघ्यांतून रक्त वहात होतें त्यांनी आजुबाजूला पाहिलें. पैशांचा खुर्दा इतस्ततः पडला होता. तेथेंच कुंकू व अक्षता थोड्या सांडल्या होत्या. मात्र निरांजन, ताम्हण व प्रसाद त्यांना कुठेंच दिसला नाही. त्यांनी समोर पाहिले. एक भिकाऱ्याचा मुलगा त्यांचं ताम्हण व निरांजन घेऊन त्यांच्याकडेच येत होता. तो जवळ आला. त्याने गणूकाकांच्या पुढ्यांत तें ताम्हण व निरांजन ठेवलें. आणि तो आरतीच्या प्रसादांत मिळालेल्या केळापैकीं अर्धे केळ घेऊन तेथेच फूटपाथवर गणूकाकांच्या शेजारीं खात बसला. त्याच्या चेहेऱ्यावर त्या निरांजनाची दीप्ति पसरली होती. गणूकाका खाली पडल्याचें पाहून त्यानेच ती आरती न विझवतां रामाला पोंचती केली होती. गणूकाकांच्या क्षणांत सारें लक्षांत आलें. त्यांनी त्या भिकाऱ्याच्या पोराकडे निरखून पाहिले. त्यांना त्याच्यांत रामाचें दर्शन घडलें. श्रद्धा, प्रेम, आणि प्रामाणिकपणाचें मूर्तिमंत दर्शन त्यांना त्या भिकाऱ्याच्या मुलांत घडलें. रथ पुढे सरकत होता. गणूकाकांनी पुन्हा रथाकडे पाहिले. श्रीरामाची मूर्ति आपल्याकडे पाहून हंसते आहे असें त्यांना वाटलें. त्यांनीं परत शेजारी पाहिलें. मात्र तो भिकाऱ्याचा मुलगा आता तेथें नव्हता. त्याने जवळपास विखुरलेले सारे पैसे नीट ताम्हणांत ठेवून दिले होते. निरांजनांतील वात... आरती विझूं नये म्हणून .. थोडी वरती करून तो निघून गेला होता. अर्धे केळहि त्याने नीट ताम्हणांत ठेवलें होतें. त्या भिकांऱ्याच्या मुलाच्या रूपानेच परमेश्वराने .. रामाने... आपल्याला दर्शन दिल्याचें गणूकाकांना वाटले. त्यांच्या चेहेऱ्यावर विलक्षण तेज पसरलें. त्यांना खूपच आनंद वाटला. ते उत्साहाने उठले. आणि आरती घेऊन घराकडे चालूं लागले.

आपल्या मुलांपेक्षाहि तो भिकाऱ्याचा पोर त्यांना जवळचा वाटत होता !

---

* नानाविध आकर्षक डिझाइन्सचें—
मुंबई, अहमदाबाद येथील प्रख्यात मिल्सचें ❀ कापड ❀
तसेंच— वुलन, रेऑन, सुटिंग्ज, टॅरेलीन, शर्टींग व सर्व पेठांचीं नवीन डिझाइन्सचीं
सुंदर आकर्षक पातळें यासाठीः—
आर. राजकोटीया आणि कंपनी
माहिजी बाजार, जळगांव.
फोन नंबर : १२४.]

# " सुहास " : एक व्यक्तिचित्र....

ले.– **सुरेश हिरोडकर.** ( तृतीय वर्ष, वाणिज्य विभाग )

घाईघाईने मी स्टेशनवर आलों आणि पाहिलं तर सुरत-भुसावळ पॅसेंजर– १ तास लेट ! तसाच वर रिफ्रेशमेंट रुममध्ये गेलों आणि चहाची ऑर्डर दिली. चहाचा कप तोंडाला लावणार तोंच सुहास येतांना दिसला. मी आणखी एक चहा सांगितला.

सुहास म्हणजे पावणे सहा फूट (त्यांत केसांची उंची चार इंच) आणि जाडी शून्य ( उंचीच्या मानाने ) असलेली व्यक्ति. त्याला आपल्या केसाच्या वळणाविषयीं फार आदर वाटतो. लोक म्हणतात, त्याच्या केसांचें वळण त्याने ××× या नटापासून घेतलें आहे. पण तो तें कबूल करायला तयार नाही. आपले लहानपणीचे फोटो दाखवून तो हें सिद्ध करून देतो कीं, तें वळण जन्मजात आहे. कपड्यांच्या इस्त्रीपेक्षाहि केसांच्या वळणाला तो जास्त जपतो. मधून मधून उगीचच आपल्या केसांवरून हळूवारपणें हात फिरवून केस व्यवस्थित असल्याची खात्री करून घेतो.

असाच केसांवरून हळूवारपणें हात फिरवीत आणि दुसऱ्या हाताने पुस्तकें सांभाळीत सुहास आंत आला आणि माझ्या शेजारीं बसला. दोन्ही हातांचीं बोटें एकमेकांत अडकवून आणि त्यावर हनुवटी टेकवून तो दूर कुठेतरी शून्यांत पहात होता. कांहीतरी विशेष असं घडलं म्हणजे तो नेहमीच असा शून्यांत पहात बसतो.

त्याचा चहा आल्यावर मी त्याला हांक मारली, " सुहास ! "

उत्तर नाही.

" ए सुहास, " मी दुसरी हांक मारली.

" आयुष्यांत पुन्हा कधी प्रेम करणार नाहीं. " शून्यांतून नजर न काढतांच तो उत्तरला.

एखादी नोकरी सुटली आणि दुसरी नौकर मिळाली नाही म्हणजे बेकार माणूस जसा जीवनाला कंटाळतो तसाच सुहासहि कंटाळणें सहाजिक होतें. त्याची बेकारी मात्र नोकरीविषयी नसून प्रेमाविषयी होती. गेले २ महिने सुहास नवीन प्रेमाच्या शोधांत हिंडत होता पण अजून त्याची ' बेकारी ' संपत नव्हती.

" आयुष्यांत खरं प्रेम एकदांच मिळतं आणि मला तें आज मिळालं. " सुहास म्हणाला.

" म्हणजे तूं प्रेम करणार ! " मी.

" अर्थात् ! "

" मग प्रथम प्रेम करणार नाही असं कां म्हणालास ? "

" पुन्हा करणार नाहीं. " ' पुन्हा ' या शब्दावर जोर देत त्याने उत्तर दिलें. थोडा वेळ तो बोलायचं थांबला आणि नंतर डोळे मिटून स्वप्नांत असल्यासारखं तो बडबडू लागला.

" एस्. टी. म्हणजे मूर्तिमंत सौंदर्य ! एस्. टी. म्हणजे मूर्तिमंत काव्य ! एस्. टी. म्हणजे मूर्तिमंत प्रेम ! "

" खरा कवि आहेस सुहास ! " त्याच्या पाठीवर थाप मारीत मी म्हणालों, " आजपर्यंत अनेक कवींनी प्रेम केलं; पण एस्. टी. च्या गाड्यांवर प्रेम करणारा तूं पहिलाच कवि. प्रेमांत आणि काव्यांतहि क्रांति केलीस तूं ! "

" एस्. टी. म्हणजे State-Transport नव्हे ! " एकदम डोळे उघडून सुहास किंचाळला, " एस्. टी. म्हणजे शंकुतला तिरळे. "

" माफ कर हं सुहास. मला कल्पना नव्हती. पण काय रे, या तिरळ्या पोरीवर तुझं प्रेम कसं काय बसलं ? "

" तिच नांव तिरळे असेल, पण तिचे डोळे...... अहाहा ! तिच्या डोळ्यांच्या सौंदर्याचें वर्णन करतां येणें अशक्य आहे. "

" सुहास, ती एस् टी. बाजूला राहूं दे. आधी या चहाचं आइस्क्रीम होतंय तें बघ. " थंड होणाऱ्या चहाकडे पहात मी म्हणालों.



एका मिनिटांत सुहासने चहा संपविला, पुस्तकें उचलली, " अच्छा " म्हटलं आणि जसा अचानक आला तसाच अचानक निघून गेला.

सुहासच्या या वागण्यांत मला नवीन असं कांहीच नव्हतं. लहर लागेल तेव्हा यावं, लहर लागेल तितका वेळ बोलावं आणि अचानक निघून जावं असं तो नेहमीच करतो. कांहीवेळां तर तो बोलत असलेलं वाक्यहि पूर्ण करीत नाही, तसाच निघून जातो. विचित्र वागणें हा त्याचा स्वभावच आहे. आज आम्ही दोघं T. Y. B. A. ला आहोत. P. D. पासूनच आमची ओळख आहे. कॉलेजांत आल्यावर पुष्कळ मुलांच्या स्वभावांत फरक पडतो. पण सुहास मात्र तीन वर्षांपूर्वी होता तसाच आजहि आहे. तो माझ्याशी क्वचितच बोलतो. पण जेव्हा बोलतो तेव्हा त्याच्या बोलण्यांत ( आणि त्याच्या म्हणण्याप्रमाणें जीवनांतहि ) फक्त दोनच गोष्टींना महत्व असतं— प्रेम आणि काव्य !

सुहासची आणि माझी ओळख झाली तो दिवस मला आजहि आठवतो. त्यावेळीं आम्ही P. D. Arts ला होतों. एका वेगळ्या जगांत आम्ही पाऊल टाकत होतों. कॉलेज–जीवनाविषयी त्यापूर्वी पुष्कळ एकलं होतं. आतां तें आम्ही अनुभवीत होतों. उत्साह, आनंद आणि त्याबरोबरच आपण कुणीतरी निराळे आहोंत ही जाणीव वाढत होती.. सुरवातीला २–३ महिने सुहासचा आणि माझा परिचय नव्हता. आपल्यासारखाच भुसावळहून जळगांवला कॉलेजसाठी येणारा आणि आपल्याच वर्गात असलेला एक विद्यार्थी यापलीकडे मला त्याच्याविषयी जास्त माहिती नव्हती.

असाच एक दिवस मी गाडीची वाट पहात स्टेशनवर बसलों होतों. सुहास माझ्या शेजारींच बसला होता. आजुबाजूचीं बहुतेक मुलें हास्यविनोदांत गर्क होतीं. कांही मुलें नुसतीच दुसऱ्यांचीं बोलणीं ऐकत होतीं तर कांही लक्ष लागत नसतांनाहि पुस्तक उघडून आपल्या अभ्यासू वृत्तीचं प्रदर्शन करीत होती. सुहासचं मात्र कुणाकडेच लक्ष नव्हतं. पेन उघडून तो कसला तरी विचार करीत होता आणि मधूनच वहींत कांहीतरी लिहित होता. मी सहज त्याच्या वहीवर नजर टाकली.

" तुझं नांव शशीकला,
त्याची जाण आहे मला,
चंद्राच्या चौदा कला !

अशा तीन ओळीं त्याने लिहिल्या होत्या आणि पुढच्या ओळींचा विचार करीत होता.

" छान आहे कविता ! " मी म्हणालों.

" खरंच ? " त्याने विचारलें.

" खरं कीं खोटं कुणास ? ठाऊक मला आवडली एवढं मात्र खरं. "

" तुम्हाला माझ्या इतर कविता दाखवूं ? "

" अवश्य. "

त्यानंतर त्याने त्याच्या १०–१२ कविता दाखविल्या. त्याच्या काव्यांतील कांही कल्पना खरोखरच सुंदर होत्या. तर कांही ठिकाणीं नवकाव्याचा वास येत येत होता. उदा०—

" तुझ्या डोळ्यांतील पक्षी,
एक डोळा वाकडा करून,
बोलतो आहे.
पण......
त्याला शिंगे कां नाहीत ? "

असल्या ओळींचा अर्थ केवळ त्यालाच माहीत. एक गोष्ट मात्र स्पष्ट दिसत होती. ती म्हणजे त्याच्या बहुतेक कवितांचा विषय " शशी " हाच होता.

त्याच्या कवितांबद्दल मी थोडीशी आस्था दाखविल्यामुळे तो आनंदित झाला आणि काव्यांविषयीं बोलूं लागला. इतर कवींसारख्याच त्याच्याहि तक्रारी होत्या. जगाला काव्य कळत नाही, लोकांना त्याची किंमत नाही, वगैरे वगैरे.

शेवटीं मी त्याला विचारले,

" सुहास, ही शशी कोण रे ? "

" शशीकला आपटे. आपल्याच वर्गातली. लांब वेण्या असलेली आणि रोज केसांत गुलाबाचं फुल लावणारी. "

" तिचा आणि तुझा संबंध ? "

या प्रश्नावर सुहास स्वतःशीच हंसला आणि वहीवर एक आकृती काढून त्याने मला विचारले,

" हें काय ? "

" बदाम "

" बदाम तुमच्या दृष्टीने. आमच्या दृष्टीने तें हृदय आहे. "

नंतर त्या हृदयाशेजारीं त्याने आणखी एक हृदय काढलें आणि मला विचारलें,

" समजला आमचा संबंध ? "

" होय! " मी म्हणालों.

सुहासचा स्वभाव जसा विचित्र आहे तसंच त्याचं प्रेमहि. गेल्या ३ वर्षांत त्याने ३ मुलीवर प्रेम केलं. शकुंतला तिरळे चौथी. नवें वर्ष, नवी मुलगी आणि नवें प्रेम हा त्याचा नियम आहे. पण त्याच्या प्रेमाचें वैशिष्ट्य हें कीं, त्याचं प्रत्येक प्रेम अगदी मनापासून असतं. एकदा एका मुलीवर प्रेम बसलं कीं दुसऱ्या मुलीकडे तो चुकूनहि पहात नाही. ती मुलगी त्याला सर्वस्व वाटते. त्या प्रेमाच्या काळांत त्याच्या बोलण्यांत आणि काव्यांतहि त्याच मुलीचा विषय असतो. तिची वाट पहात तो बस–स्टॉपवर तासन् तास उभा राहतो. एखाद्या दिवशी ती कॉलेजला आली नाही तर त्याला दिवसभर चैन पडत नाही. या प्रेमाचा त्या मुलीला कदाचित् पत्ताहि लागत नाही. पण सुहासला त्याची काळजी नसते.

मला आश्चर्य या गोष्टीचं वाटतं कीं, मागील प्रेम संपूर्णपणें विसरून, मात्र पूर्वीच्याच उत्साहाने आणि पूर्वीच्याच भावना कायम ठेऊन नवीन प्रेम करणं त्याला शक्य कसं होतं. मुलींची टिंगल करणं त्याला आवडत नाही. दुसऱ्याहि मुलांच्या कंपूपासून तो निराळा असतो. त्याला आवडतं फक्त प्रेम करणं. त्याच्या प्रेयसीचा चेहरा हंसरा असलातर त्याचाहि चेहरा हंसरा. तिला दुःख झालें तर यालाहि दुःख तो म्हणतो, " नुसतंच प्रेम करण्यांत कांही निराळीच मजा आहे, मग ज्या व्यक्तीवर आपण प्रेम करतो तिला आपल्या प्रेमाची जाणीव असो वा नसो. "

दोन-तीन महिने निघून जातात. सुहासच्या बोलण्यांत किंवा वागण्यांत नवीन असं कांहीं आढळत नाही. कॉलेजची दुसरी टर्म सुरूं झालेली असता शकुंतला तिरळेचा मात्र पत्ता नसतो. ती कॉलेज सोडून गेल्याचें समजतें. सुहासहि बऱ्याच दिवसांत भेटला नसतो. एक दिवस बस-स्टँडवर तो दिसतो. नजर नेहमीसारखीच कुठेतरी शुन्यांत असते आणि हात केंसांवर असतो. शकुंतलेविषयीं त्याच्याजवळ कांहीतरी बोलावे असें वाटतं पण त्याला वाईट वाटेल म्हणून मी बोलत नाहीं.

बस आल्यावर मी त्याला विचारतों,

" कॉलेजला येणार कां सुहास ? "

" नंतरच्या बसने. "

" कां ? कुणी येणार आहे ? "

" हं. रजनी परांजपे. "

मला एकदम आश्चर्याचा धक्का बसतो.

" म्हणजे काय पुन्हा प्रेम सुरूं केलं ? "

यावर मान हलवून तो " नाही " म्हणतो आणि खाली जमिनीकडे पहात उत्तर देतो,

" खरं सांगू कां ? रजनीच्या डोळ्यांत मला शकू दिसते. "

— ——



# " मागे वळून पाहतांना....! "

ले.– सुभाष एकनाथ सोनवणे ( बी. ए. प्रथम वर्ष )

' व्यक्ति तितक्या प्रकृति ' असें म्हणतात तेंच खरें ! याचा अनुभव प्रत्यहि आपणांस येत असतो. प्रत्येकाची आवड निरनिराळी असते. प्रत्येकाला निरनिराळ्या गोष्टींत आनंद वाटतो. अन्यांना निसर्गाच्या सहवासांत जाऊन त्याशी समरस होण्यांत आनंद वाटतो तर फडक्यांना ' वाट चुकल्यांत आनंद ' वाटतो. तेव्हा ' व्यक्ति तितक्या तितक्या प्रकृति ' हेंच खरें ! आमच्या गांवापासून ४–५ मैलावर एक टेकडी आहे. त्या टेकडीवर मधून मधून मी नेहमी जात असतों. आणि ती टेकडी चढून वर गेल्यावर मागे वळून पहात असतों. बराच वेळ सारखे मागे वळून पाहतों. आणि मागे वळून पाहण्यांत मला एक वेगळ्याच आनंदाची अनुभूति येत असते कदाचित् हें वाचून तुम्हाला आश्चर्य वाटेल. आणि आणि माझी वेड्यांत गणनाहि करूं पहाल. पण एकदा या की माझ्याबरोबर टेकडीवर चढण्याला आणि मग बघा टेकडीवर चढल्यानंतर मागे वळून पाहण्यांत किती मजा वाटते ती !

मागे वळून पाहणें ही आपली प्रवृत्तीच आहे ! फिरावयास जातांना कोणी ' लावण्यवती ' दिसली कीं कसं चोरून आपण मागे वळून बघत असतों. आणि हें आपलें मागे वळून बघणं अखेर मित्रांच्या तीक्ष्ण नजरेंतूनहि सुटत नाही. आणि ' टॉण्ट ' मारण्याच्या निमित्ताने तेहि मागे वळून पाहतात. तसेंच सज्ज्यांत एखाद्या ' व्यक्तीस ' पाहिले कीं सायकल गतिमान झालेली असते; पण आपण पुन्हा-पुन्हा मागे वळून पाहतों. आपलें मन त्या व्यक्तिभोवती रेंगाळतें. आणि हीच मानवी प्रवृत्ती आपणांस निरनिराळ्या क्षेत्रांत निरनिराळ्या निमित्ताने दिसून येते एखाद्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या ५० व्या किंवा ६० व्या वर्षानिमित्त आपण सारेजण चिंतन करूं लागतों. आणि आतापर्यंत केलेल्या कार्याचा आढावा घेऊं लागतों. तसेंच एखाद्या नियतकालिकाचा १०० वा अंक निघाला कीं त्या निमित्ताने संपादक मागे वळून बघतो. मागील भीषण अंधःकारांतून व निरनिराळ्या संकटांनीं युक्त अशा रस्त्याने चालतांना आपण आपत्तीरूपी कंटक व पाषाणांनीं कसें ठेंचाळलों आणि रक्ताळलों तें बघून आज आपण या स्थितिप्रत आलों हें बघतांना कृतार्थता आणि आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण झाल्याबद्दल वाटणारा आनंद कांही औरच असतो. आणि असें सिंहावलोकन करून तो नव्या उमेदीने, अधिक जिद्दीने भविष्यकाळांतील ध्येय गांठण्यास उत्साहीत होतो. सश्रद्ध मनाचे लोकमान्य टिळक देखील कारावासामुळे ' केसरी ' मधील संपादकीय लेखनांत खंड पडला म्हणून ' पुनःश्च हरि ॐ ' करून मागे वळून पाहतात. आणि गतकाळांत घडलेल्या परिस्थितींचें–घटनांचें समालोचन करतांना दिसतात. तसेंच एखादा यात्रेकरु बरेंच अंतर चालल्यावर मागे वळून पाहत असतो. आपल्या दृष्टिपथांत येणाऱ्या रस्त्याच्या टोकापर्यंत त्याची नजर स्थिरावते. आणि आपण किती चालून आलों व किती चालावयाचें आहे याची त्याला कल्पना येते; आणि आता थोडें चालावयाचें राहिले या जाणीवेने तो सुखावतो. व खूप चालून थकल्याची जाणीव तो कांही वेळपुरता तरी विसरतो. याचा अर्थच हा कीं, प्रत्येक जण केव्हा न केव्हा मागे वळून बघतच असतो ! म्हणून मानवी जीवनांतील असे दैनंदिन स्वरुपाचे प्रसंग पाहिले कीं मागे वळून पाहण्यांत कोणत्या आनंदाची अनुभूति येत असते याची कल्पना येते.

मागे वळून पाहण्यांत खरोखरच काव्य आहे ! आणि तें काव्य जीवनांत व निसर्गांत ओतप्रोत भरलें आहे. मागे वळून पाहण्याची आवड मात्र हवी. आणि मागे वळून पाहणें ही आपली प्रवृत्तीच असल्याने आपणांस तिचा अनुभव भिन्न भिन्न वेळीं येत असतो. जर डोळसदृष्टिने सभोवतालच्या जगाकडे बघितलें तर अशीं कित्येक उदाहरणें आपणांस आढळतात जेव्हा तेनसिंग व हिलरी एव्हरेस्ट चढून शिखरावर पोहोचले तेव्हा ते ज्या मार्गाने वर चढले त्या मार्गाकडे त्यांनीं वळून पाहिलं असेल. रस्ता कापीत असतांना जीवावर

गुदरलेले प्रसंग, बर्फ पडण्याची भीति आणि हळूहळू रस्ता कापीत असतां झालेला त्रास व आतापर्यंत केलेल्या अयशस्वी मोहिमा आणि आता अखेर मिळविलेला अभूतपूर्व विजय इत्यादि विचार मनांत डोकावून त्यास झालेल्या आनंदाची 'ब्रह्मास्वादसहोदर' या आनंदाखेरीज दुसऱ्या कशाशी त्याची तुलना करता येईल ? तेव्हा आपणांस या सर्व विविध उदाहरणांवरून 'मागे वळून पाहण्यांतील' आनंदाची कल्पना आली असेल.

मागे वळून पाहण्यांत काय आनंद आहे ? जेव्हा गागारीन व टिटोव्ह या अंतरीक्षवीरांनीं पृथ्वी-भोवती प्रदक्षिणा घातल्या तेव्हा पृथ्वीवर परततांना मागे वळून पाहतांना कोणकोणते विचार त्यांच्या मनांत आले असतील ? तसेंच एखादा मदनाचा मूर्तिमंत पुतळा बघितल्यावर काय होतं हेंहि आपण जाणतोंच की ! हमखास तिथंहि मागं वळून बघितलं जात असलंच पाहिजे, होय ना ?

मागे वळून पाहतांना आपणांस भूतकाळांतील निरनिराळे सुखदुःखाचे प्रसंग आठवतात. भूतकाळां-तील आपल्या आवडत्या व्यक्ति निघून गेल्याच्या होणाऱ्या जाणीवेने दुःख होतें; तसेंच सुखाचे प्रसंग आठवून त्या प्रसंगामधील अवीट असा आनंद पुन्हा प्राप्त होतो. भूतकाळाकडे पाहिल्यामुळेच आपणांस भूतकाळांतील निरनिराळ्या आपत्ती आठवतात. व वर्तमानकाळांत आज त्यामुळे ज्या सुखांत त्याची परिणिती झाली असते तें बघून मन सुखावतें व भविष्यकाळाविषयीं नवा जोम, नवी उमेद निर्माण होतो.

मागे वळून पाहण्याचें मला जणूं कांही वेड लागलें आहे. वर्षाच्या प्रारंभी आदर्श वेळापत्रक व आदर्श अभ्यासपद्धती आंखून स्वतःविषयीं उभारलेल्या अपेक्षेच्या मनोऱ्याकडे परीक्षा झाल्यानंतर मागे वळून पाहण्यांत वाटणारा आनंद कांही औरच आहे. आणि त्या आनंदाचा तुम्हांला आता हेवा वाटू लागला असेल तर मागे वळून बघायला नको का ? पण जरा जपून हं ! नाहीतर एखाद्या प्रमदेकडे पुन्हा पुन्हा मागे वळून पहाल तर 'डोळे हे जुल्मि गडे ! रोखुनी मज पाहू नका !' अशी लाडिकपूर्ण तक्रार केली जाईल. भविष्यकाळांत मी प्रथितयश लेखक झाल्यास लालित्याने युक्त असा संदेश देईन कीं,

'मागे वळून पहा... !'

---


## ❋ मे. कन्हैयालाल उदयराम शर्मा ❋

जळगांव

सर्व प्रकारचें

❋ कापड ❋

व

पातळें

मिळतात.

—तसेंच—

फेवरलुबा, वेस्ट एण्ड, रोमर सर्व प्रकारचीं नवीन

❋ घड्याळें ❋

स्वस्त किंमतींत मिळतात.

* लग्न मौंजीस लागणारें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण *

— महाग वाटल्यास पैसे परत —






# मला जगलं पाहिजे !....

ले.– जयवंत तानाजी इंगळे
बी. एस्सी. तृतीय वर्ष

गाडी धाड् धाड् करीत नागपूर स्टेशनांत शिरली आणि वेग कमी होत शेवटीं थांबली. तशी अविनाशने सेकंड क्लासच्या डब्यांतून पटकन् प्लॅटफॉर्मवर उडी मारली. सुधाने त्याच्या हातीं ट्रंक आणि होल्डऑल दिला. त्यान तो सामान व्यवस्थितपणे एका बांकाजवळ ठेवला आणि सुधाला उतरायला मदत करण्यासाठी तो पुन्हा डब्याच्या तोंडाशीं गेला. परंतु तोंपर्यंत सुधा खाली उतरलीदेखील होती. ती प्लॅटफॉर्मच्या दोन्ही टोकांना शोधक नजरेने बघूं लागली. "नाना कांही आलेले दिसत नाहीत." अशी ती पुटपुटत नाही तोंच तिला नाना येतांना दिसले. परवांच तिने नानांना पत्र पाठवून 'आम्ही दोघे दिवाळीसाठी नागपूरला येत आहोंत' असें कळविलें होतें त्याप्रमाणे नाना त्यांना घ्यायला आले होते. ते घाईघाईनेच जवळ आले आणि घाईतच म्हणाले, "चला, चला लवकर. सामान कुठाय तुमचा ?"

अविनाशने सामानाकडे बोट दाखवितांच त्यांचा ड्रायव्हर रामू झटकन् पुढे झाला अन् डोक्यावर होल्डॉल आणि हातांत पेटी घेऊन तो कारकडे निघाला. सामान मागच्या बाजूला ठेवून त्याने कारची दोन्ही दारं उघडलीं. इकडे नाना, सुधा नि अविनाश यांच्या गप्पा सुरुदेखील झाल्या होत्या. नाना विचारीत होते, "काय अप्पासाहेब, प्रवास चांगला झाला ना ? थोडासा त्रास झालाच असेल म्हणा ! कारण प्रवास म्हटला म्हणजे थोडीशी दगदग सहन करावी लागणारच. का ग सुधा !" त्यांनी हंसत हंसत सुधाकडे बघितलं. त्यावर अविनाश बोलला, "खरंच अप्पासाहेब, प्रवास मात्र अगदी आरामशीर झाला हं !"

तोंपर्यंत मंडळी कारपर्यंत येऊन पोहोचली होती. नानासाहेब पुढच्या आणि सुधा अन् अवि मागच्या सीटवर स्थानापन्न झाले. कार चालू झाली; तशी नानांची टकळीसुद्धा सुरू झाली.

"काय ग सुधा ! तुम्हाला तर रजा मिळत नव्हती ना ?" नानांनी विचारले. "खरंच नाना, रजा मिळत नव्हती. परंतु आम्ही दोघांनी खूप प्रयत्न केला. अविचर साहेबांची चांगलीच मर्जी आहे. मी आमच्या हेड्-नर्सला पंधराच दिवसांपूर्वी रजेचा अर्ज दिला होता. त्यांनीहि कर्नल साहेबांजवळ शिफारस केली. शेवटी आम्हा दोघांची एकेक महिन्याची रजा मंजूर झाली. आमचा येथला पत्ता लिहून घ्यायला मात्र ते विसरले नाहीत." सुधा मोठ्या उत्साहाने सर्व हकीगत सांगत होती. अविनाशहि तिला मधून मधून साथ देतच होता.

कार माडीच्या गेटजवळ थांबतांच छोटा अरविंद आणि आशा यांनी गाडीजवळ येऊन 'ताई आली, ताई आली' असा एकच गिल्ला सुरू केला. सुधा पटकन खाली उतरली. आणि आशा–अरूचे ती पटापट मुके घेऊं लागली. कितीहि मुके घेतले तरी तिचें समाधान होईना

"अग सुधा ! पुरें की आता ! त्यांचे गाल बघ किती लाल झालेत ते !" असे अवि जेव्हा हंसत हंसत म्हणाला तेव्हा कुठे सुधा भानावर आली. आणि एका हातांत आशाचें अन् दुसऱ्या हातांत अरूचें बोट धरून ती दाराकडे वळली. दारांत माईसाहेब आपल्या लेकीकडे कौतुकाने पहात उभ्या होत्या. सुधा दाराजवळ येताच माई तिला म्हणाल्या, "थांब ग सुधा ! तुम्हा दोघांची दृष्ट काढते आधी, नजर लागली असेल कुणाची !"

दृष्ट काढण्याचा विधि आटोपल्यावर सर्व मंडळी आंत शिरते न शिरते तोंच 'ताई आम्हाला खाऊ पाहिजे' 'ताई आम्हाला खाऊ पाहिजे' असा आशा व अरू यांनी एकच गोंधळ घालायला सुरूवात केली. त्यावर सुधा लटक्या रागाने म्हणाली, "अरे बाबांनो, जरा थांबा ! चिवडा, टॉफी, बिस्कीटं सर्व कांही आणलं आहे. ही पेटी उघडली कीं देतेंच तुम्हाला खाऊ." त्यावर आशा–अरू तालांत नाचा-यलाच लागले. सर्व मंडळीची हंसता हंसता पुरेवाट झाली. सुधाने मग त्यांना चार–चार चॉकोलेट्स आणि भरपूर चिवडा देऊन वरच्या मजल्यावर पाठवून दिले.

नाना माईकडे बघून म्हणाले, "आज स्वयंपाकाचा कसला बेत करणार?" माईंनी स्मित करीत एकदा सुधाकडे अन् एकदा अविकडे बघितले नी म्हणाल्या, "अप्पांनाच विचारा कीं कसला बेत करायचा तो!"

"ओ! येस्! यू आर राईट!" नाना मोठ्याने हंसून म्हणाले, "हं सांगा अप्पासाहेब, कसला बेत करावयचा?" त्यावर अविनाश हंसतच म्हणाला "सुधालाच विचारा की!" त्यावर सर्वांनाच जोराचें हंसू लोटलें.

शेवटीं सुधाच्या सांगण्याप्रमाणे माईंनी बटाट्याचा रस्सा, भात आणि खमंग पुऱ्या तयार केल्या. सर्व मंडळींचीं जेवणें आटोपतां आटोपतां दुपारचें तीन वाजलें होतें. नाना आणि अवि माडीवर निघून गेले सर्व भांडी वगैरे आवरून झाल्यावर दोघी मायलेकी पुढच्या बैठक खोलींत आल्या. 'हाश् हुश्' करीत सुधाने पलंगावर अंग टाकलें. माईंनी सुपारी कातरून थोडीशी आपल्या तोंडांत टाकली आणि बाकीची सुधाला देऊं लागल्या. सुपारी न घेतां सुधा म्हणाली, "अं हं! मी सुपारी अशी नाहीं घेणार!" "मग कशी?" तिच्या म्हणण्याचा अर्थ न समजून माई म्हणाल्या. "मला तुझ्याच हाताने खाऊं घाल." सुधा लाडांत येऊन म्हणाली. "इश्श! हे ग काय सुधा? तूं काय आता कुक्कुल बाळ आहेस?" "नसूं दे. पण तरीहि मी तुझ्याच हातांने सुपारी खाणार हं!" सुधा त्यांच्या मांडीवर डोकं टेकवित म्हणाली. माईंनी हळूंच तिचा एक गालगुच्चा घेतला नि चिमणीच्या पिलाप्रमाणे उघडलेल्या तिच्या तोंडात हळूंच सुपारी टाकली. त्या तिच्या अंगा-तोंडावरून ममतेने हात फिरवूं लागल्या.

"सुधा"

"अं!" सुधाने वर मान करून माईकडे प्रश्नांकित मुद्रेने पाहिलें.

"अलिकडे तूं रोडावलेली दिसतेस कशी! काय होतं ग तुला?" माई तिला अधिकच कुरवाळीत विचारूं लागल्या.

"छे ग माई?" माईकडे पाहत सुधा म्हणाली, "मला फार दिवसांनी बघितल्यामुळे तुला तसं वाटतंय!"

"छे बाई! तुला कांहीतरी होत असलं पाहिजे! खरं सांग ना सुधा?" माईंनी तिच्या डोक्यावर हळूवारपणे थोपटीत विचारले.

"खरंच माई! मला कांही होत नाही. मी अगदी चांगली आहे."

"तरी पण! कांही नविन विशेष आहे का?" माईंनी उत्सुकतेने विचारले.

"म्हणजे काय ग माई!" माईच्या विचारण्याचा रोख समजूनहि न समजल्यासारखें दाखवून सुधाने विचारले.

"हात् वेडे!" असें म्हणून माईंनी समोरच एका लहान बाळाचा फोटो असलेल्या कॅलेंडरकडे बोट दाखवून तिच्याकडे मोठ्या उत्सुकतेने बघूं लागल्या. त्यावर सुधा खूपच लाजली नि म्हणाली, "इश्श! हे ग काय माई!"

माईंना 'ती' गोष्ट जाणून घ्यायची आता खूप उत्कंठा लागली होती. त्या हळूंच तिची हनुवटी वर उचलीत म्हणाल्या, "खरं सांग बाई! एवढी लाजतेस काय?"

"माई, मला चवथा महिना......!" असें म्हणून सुधाने पटकन् माईच्या कुशींत आपलें तोंड लपविलें. माईंना त्या बातमीने खूप आनंद झाला.

माडीवर नाना आणि अवि असे दोघेच होते. अरू आणि आशा कुठे तरी खेळायला गेलीं होतीं. मस्तपैकी जेवण झाल्यामुळे गादीला पाट लागतांच नानांना गाढ झोप लागली. अविमात्र जागाच होता. त्याने झोपायचा खूप प्रयत्न केला. परंतु त्याला झोप येईना कां कोण जाणें पण आज त्याला तात्यांची आणि आईची तीव्रतेने आठवण येत होती. तात्यांची ती धीर गंभीर मुद्रा पुन्हा पुन्हा त्याच्या नजरेसमोर येऊं लागली. लक्ष्मीबाईंचा हंसरा चेहरा त्याच्या डोळ्यासमोर उभा राहिला. त्याच्या मनःचक्षूंपुढ गतायुष्य जसेंच्या तसें उभें राहिलें

तात्यासाहेब– अवीचे वडील– नागपूर येथे स्टेट बँकेंत साध्या क्लार्कच्या जागेवर होते. महिना दीडशें



रुपये मिळत. परंतु घरांत तात्या, अवि आणि त्याची आई– लक्ष्मीबाई अशी तीनच माणसें असल्यामुळे तेवढ्या पगारांत त्यांच अगदी उत्तम भागत असे. तात्यांना भाऊ–बहिण वगैरे कुणीच नव्हतं. नाही म्हणायला दूरची एक मावशी होती. पण पुढे तीहि वारल्यामुळे जगांत त्यांचं असं कुणीच राहिलं नाही. त्यांची शिस्त मात्र वाखाणण्यासारखी होती. कोणचंहि काम असो. तें वेळच्या वेळीं झालंच पाहिजे. त्यांत थोडीशीहि कुचराई होतां कामा नये, असा त्यांचा बाणा होता. छोट्या अवीलाहि त्यामुळे शिस्तीचं जणूं बाळकडूच मिळालं होतं

असेच दिवस जात होते. अवि तेव्हा ९ व्या ईयत्तेंत होता. त्या दिवशीं कसल्याशा कारणामुळे त्यांची शाळा नेहमीपेक्षा १ तास लवकर सुटली होती. तो तात्यांची वाट पाहूं लागला. 'तात्या आले कीं आपण बाहेर फिरायला जाऊं आणि खूप मजा करूं' असें त्यानें मनाशीं ठरविलें होतें. लक्ष्मीबाईसुद्धा तात्यांची वाट पहात होत्या. तात्यांना ऑफिसांतून आल्याबरोबर चहा लागतो म्हणून त्यांनी चहाच्या सर्व साहित्याची मघाशीच तयारी तयारी करून ठेवली होती अन् आता त्या अविजवळ येऊन तात्यांची वाट पाहूं लागल्या.

तात्यासाहेबांनी ऑफिस सुटताबरोबर सायकलवर टांग मारली अन् घरीं यायला निघाले. त्यांचे सहाध्यायी रमेश सबनीस त्यांना हांका मारीत होते. त्यांना थांबायला सांगत होते. परंतु तात्यांना थांबायला वेळ होता कुठे? केव्हा एकदा घरीं जाऊन प्रमोशन मिळाल्याची बातमी लक्ष्मीबाईंना सांगू असें त्यांना झालें होतें. त्यामुळे ते वेगाने सायकल दामटीत होते. एका वळणावर ते सायकल वळवीत होते तोंच प्रचंड ओझ्याने लादलेली एक लॉरी एकदम सायकलीवर येऊन आदळली. तात्यांची मान नेमकी पुढच्या चाकाखाली आली. तात्या जागच्या जागीं ठार झाले.

लक्ष्मीबाईंवर तर आकाश कोसळलें. दोनच वर्षांनी त्यासुद्धा आपल्या पतीला भेटायला निघून गेल्या. गांवात कॉलऱ्याची साथ पसरली होती. वेळेवर कसल्याहि प्रकारची मदत मिळूं न शकल्यामुळे कॉलऱ्याने बळी घेतला. अवि पोरका झाला. आईच्या मायेला तो कायमचा पारखा झाला. लक्ष्मीबाई वारल्या तेव्हा तो अकरावीला होता. त्यांच्या मृत्युमुळे त्याच्या मनावर व अभ्यासावर फारच परिणाम झाला. परंतु त्याने धीर सोडला नाही. तो अगदी गंभीर बनला. कसाबसा मॅट्रीक सुटला. वार लावून जेवण करीत, लोकांकडे त्यांचें सकाळ–संध्याकाळचें पाणी भरून देत तो पुढे बी. एस्सी. सुद्धा झाला. आणि नंतर सुधा कशी त्याच्या जीवनांत आली तो प्रसंग त्याला आठवला.

त्यादिवशीं एरवी कारमधून येणारी सुधा देशमुख पायींच कॉलेजला जात होती. ती अर्ध्या रस्त्यावर आली तेव्हा एक वात्रट मुलगा तिच्याशी लगट करूं पाहात होता. योगायोग असा कीं अविसुद्धा त्याचवेळीं कॉलेजला निघाला होता. त्याने तें दृश्य पाहिले. त्याला त्या मुलाचा संताप आला. त्याने वह्या तेथेच टाकल्या आणि धांवत जावून तो त्या मुलावर तुटून पडला. त्याला दोन तीन ठोसे लगावून पिटाळून लावले. सुधाने मनःपूर्वक त्याचे आभार मानले.

दोघांची अशा रितीने झालेली ओळख वाढत गेली. पुढे पुढे तर दोघांनाहि ऐकमेकावाचून करमेनासें झालें. अवीची सुधाच्या आई–वडिलांशीं सुद्धा चांगलीच ओळख झालेली होती. मधून मधून तो त्यांच्याकडे यायचा नि गप्पा मारत बसायचा. अवीला आई–वडील नाहीत असें कळल्यावर तर त्यांना त्याच्याबद्दल जास्तच सहानुभूति वाटूं लागली. नानांना आणि माईंना अवीचा शांत पण प्रेमळ स्वभाव, बोलण्याची त्याची आर्जवी पद्धत, साधी पण स्वच्छ राहाणी फार आवडली.

बी. एस्सी. सुटल्यानंतर अवि सरळ लष्करांत दाखल झाला. त्यावेळीं नानांना नि माईंना तर वाईट वाटलेंच पण सुधालाहि फार वाईट वाटलं. तिचं अतःकरण दुःखाने भरून आलं. त्याला निरोप देतांना तिच्या डोळ्यांत पुन्हा पुन्हा अश्रू उभे राहात होते. ती त्याला म्हणाली होती. "अवि, सांभाळून जा हो! मला मात्र विसरूं नकोस! पत्र पाठवायला चुकूं नकोस! मी तुझी वाट पाहीन" तिला एकदम रडूंच कोसळलं. अवीनेहि मग तिची पाठ थोपटीत लवकर परत येण्याचं आश्वासन दिलं होतं.

अवीची भरदार शरीरयष्टी, त्याची चालण्याची ऐट, वाक्चातुर्य यामुळे त्याला लष्करांत ताबडतोब संधि मिळाली. इतकेंच नव्हे तर आपल्या कर्तबगारीच्या जोरावर चार वर्षांत लेफ्टनंट होऊन अंबाल्याला आला होता.

चांगला शुभवार पाहून त्याने नागपूरला जायचं ठरवलं. पंधरा दिवसाची रजा काढली. सुधाला त्याने आधींच कळविलें होतें. ती स्टेशनवर हजर होतीच. त्याला पाहातांच तिचं हृदय आनंदानं, अभिमानानं फुलून गेलं. त्याने नानाजवळ नम्रतेनें सुधाला मागणी घातली. नाना-माईंना तर अवि प्रथमच आवडला होता. ते या संधीची वाटच पहात होते. एका चांगल्या मुहूर्ती अगदी धुमधडाक्यांत लग्नसोहळा पार पडला.

रजा संपत आली तशी त्याने अंबाल्याला परत जाण्याची तयारी केली. लेकीला निरोप देतांना माईंच्या नि नानांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले.

अंबाल्याला दोघांचे दिवस आनंदात चालले होते. पण पुढे तिला कंटाळा येऊं लागला. अवि ड्यूटीवर गेला म्हणजे ती एकटीच घरीं असायची. त्यामुळे तिला अगदी करमेनासें होई. शेजारच्या फॅमिलीशीं तिची ओळख झाली होती. परंतु रोजच्या रोज त्यांच्या-बरोबर कसल्या गप्पा मारायच्या. वेळ फुकट घाल-विण्यापेक्षा कांहीतरी केलं पाहिजे असं तिला वाटायला लागलं. तिने तसं अविजवळ सांगितलं अन् त्याला नौकरीबद्दल विचारलं; तेव्हा तो म्हणाला, " हे बघ सुधा! तूं नोकरी करावी हें मला पटत नाही. " परंतु तिने त्याच्याजवळ नोकरीसाठी हट्ट धरला. शेवटीं तो तिच्या म्हणण्याला तयार झाला. त्याने तिला विचारले, " सुधा, आमच्या लष्करी हॉस्पीटलमध्यें तूं नर्सचें काम करशील का? "

सुधाला फार आनंद झाला. आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे थोड्याच दिवसांत हेड नर्स मिसेस् शेजवाड-करची मर्जी तिने संपादन केली होती. + + + +

मग पंधरा दिवसांमध्यें त्यांनी संबंध नागपूर शहरांतून फेरफटका मारला. ज्या ज्या वस्तु खरेदी कराव्याशा वाटल्या त्या त्या खरेदी केल्या.



दिवाळी जवळ आली— अगदी चार दिवसांवर आली. लाडू, शेव, करंज्या, कडबोळी, चकल्या वगैरे दिवाळीचा सर्व फराळ जय्यत तयार झाला. पण त्या-बरोबरच चीनने केलेल्या आक्रमणामुळे वातावरण कसं तंग झालें होतें. धनत्रयोदशीचा दिवस उजाडला सर्वांनी सकाळीं लवकर उठून आंघोळी आटोपल्या. नऊ वाजलें तशी फराळाची तयारी होऊं लागली. पानें वाढलीं गेलीं. पाट टाकले गेले. सर्व मंडळी फराळाला बसली. अवि चकलीचा एकच तुकडा तोडत होता तोंच बाहेरून पोष्टमनची हांक ऐकूं आली. 'अविनाश वसंतराव देशपांडे, आपली तार आहे.' तार शब्द ऐकतांच सर्वच मंडळी बाहेर धांवत आली. अवीने तार वाचली. 'ताबडतोब कामगिरीवर हजर व्हा' अशा अर्थाची उभयतांना ती तार आलेली होती. अवीला फार वाईट वाटलें. असें बोलावणें आपल्याला यापूर्वीच येईल ही त्याची अटकळ होती. सुधाच्या डोळ्यांत तर अश्रूच उभे राहिले. माई–नानांना फार दुःख झालें.

परंतु त्या वाईट वाटण्याचा काय उपयोग? लष्करी नोकरी ती. जेव्हा वरिष्ठाकडून बोलावणं येईल तेव्हा चालू काम सोडून धांवत जाणें भाग आहे. सुधा-अवीची दिवाळी ठिकाणावरच राहिली

परंतु देशांत एक अभूतपूर्व अशी जागृति निर्माण झाली होती. चिन्यांचें पाशवी आक्रमण परतून लावण्यासाठी अवघा भारत पं. नेहरूंच्या पाठीशी एकजुटीने उभा राहिला. घराघरांतून चैतन्याचं वारं खेळूं लागलं. दिवाळीचा आनंद चिन्याचं निर्दालन करूनच साजरा करूं असा बुलन्द आवाज घुमत होता.

चीनच्या सैनकांनी आपल्या देशावर चढाई केली होती. त्यांनी कित्येक मैलांचा परिसर आपल्या ताब्यांत घेतला होता. शत्रू अजगराच्या गतीने पुढे येत होता. त्याला अडविणं भाग होतं. म्हणूनच सर्व लष्करी जवानांना ठाण्यावर बोलावण्यांत आलें होतें. अवीचाहि त्यांत नंबर होता. सुधा नर्स असल्यामुळे तिलाहि यावें लागलें.

सुधा नि अवीनी साश्रूपूर्ण नयनांनी माई–नानांचा निरोप घेतला.

अंबाल्याला पोहोचल्यावर ताबडतोब त्यांना लष्करी छावणीवर जावें लागलें. शेंकडों लष्करी



जवान तेथे जमले होते. त्यांना शत्रू–सैनिकांच्या हालचालीबद्दल सविस्तर माहिती सांगण्यांत आली. त्यावर काय उपाय योजना करावी, शत्रूला कशा-रितीने तोंड द्यावें तेंहि त्यांना तपशीलवार सांगण्यांत आले. प्रत्येक सैनिक आपल्या लष्कर–प्रमुखाचें ओजस्वी भाषण जीवाचा कान करून ऐकूं लागला,

" देखो भाईयो, आज अपने देशपर शत्रूने यकायक हमला किया है। अपना विश्वासघात किया है। शत्रु अपने देशमें घुस रहे है। अपनी पावन भूमिपर कदम रखकर उन्होंने उसे कलंकित किया है। लेकिन हम यह अपमान, यह कलंक कभी सह नहीं सकते। हम लोगोंमें बल है, शक्ति है। याद करो उस शिवशक्तिको जिसने लाखों मुगलोंका मुकाबला किया था। यह भूमि कर्मवीर लो. टिलकजीकी है म. गांधीजीकी यह पवित्र भूमि है। वह यह अपमान कभी बरदाश्त नहीं कर सकती। मेरे भाईयो, आज तुम्हारे सिरपर बहुत बडी जिम्मेदारी है। अपने देशकेलिये जान हथेलीपर लेकर तुम्हें लडना होगा। शत्रूको पीछे हटाना होगा। आखीर जीत अपनीही है। "

अविनाश आपल्या तुकडीनिशी वालाँगच्या वायव्येस १५ मैलावर असलेल्या ठाण्याकडे रवाना झाला. ठाण्याभोवती सैनिक पहाऱ्यासाठी उभे राहिले. शत्रूची चाहूल घेऊं लागले. थोड्याच वेळांत शत्रू पक्षाकडून ठाण्यावर तोफखाना व कुलपी गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. आपले शूर सैनिक भराभर गोळ्यांच्या भक्ष्यस्थानीं पडूं लागले अविनाश आपल्या कांही निवडक सैनिकांनिशी खंदका-मध्यें जाऊन लपला. इतक्यांत चिन्यांची एक नवीनच ताजीतवानी लष्करी कुमक येतांना दिसली. ते जवळ येतांबरोबर खंदकामध्यें लपून बसलेले भारतीय जवान भराभर बाहेर पडले अन् शत्रु सैन्यावर तुटून पडले. भयंकर रणसंग्राम माजला. भारतीय जवानांनी मोठ्या शर्थीने लढून चिन्यांचा तो हल्ला परतवून लावला. एकट्या अवीने दहाबारा चिन्यांना गारद केले होते.



परंतु अरेरे! एक गोळी सूं सूं करीत आली अन् नेमकी अवीच्या छातींत जाऊन रुतली. अवि एकदम् खालीं पडला. त्याच्याबरोबर असलेल्या जवानाने त्याला एका झुडपाआड नेले. आणि त्याचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें. त्या जवानाला अवि म्हणाला, " हे बघ मित्रा! माझ्या पत्नीला– सुधाला– जाऊन सांग कीं तुझा अवि देशासाठी लढतां लढतां मेला. हंसतमुखाने त्याने मृत्यूला कवटाळलें. तूं आपल्या मनावर कसल्याहि प्रकारचा परिणाम होऊं देऊं नकोस. 'ज्या जगांत अवि नाही त्या जगांत राहून मी काय करूं' असं म्हणून तूं आपल्या जीवाचें कांही बरं वाईट करून घेऊं नकोस. तूं नर्स आहेस. जखमी जवानांची तुला सेवा केली पाहिजे. कालांतराने तूं एका शूर बालकाला जन्म देणार आहेस. आपल्या त्या बाळासाठी तुला जगलं पाहिजे. त्याला वाढव. लहानाचा मोठा कर. तूं आत्महत्येचे चुकूनहि विचार मनांत आणूं नकोस. तुला देशासाठी जगलं पाहिजे सुधा! सुधा! मी जातों ग! "

त्या जवानाच्या डोळ्याला धारा लागल्या. त्याने तो निरोप सुधाला सांगितला.

निरोप ऐकतांच सुधाला भयंकर धक्का बसला. तिचा त्या बातमीवर विश्वासच बसत नव्हता. परंतु ती बातमी सत्य होती. तिचा अवि तिला एकटीला टाकून गेला होता. देशासाठी त्याने आपलं बलिदान केलं होतं. तो हुतात्मा झाला होता. सुधा हमसाहमशी रडूं लागली. तिला त्याचा निरोप आठवूं लागला " सुधा, तूं आपल्या जीवाचें कांही बरें वाईट करून घेऊं नकोस. आपल्या बाळासाठी तुला जगलं पाहिजे. आपल्या देशासाठी तुला जगलं पाहिजे "

सुधा रडत होती अन् अवीचे अखेरचे एकेक शद्ब आठवीत होती. ती रडत होती अन् म्हणत होती, " अवि, मी माझ्या जिवाचें कांही बरें वाईट करणार नाहीं. मला आपल्या बाळसाठी जगलं पाहिजे. आपल्या देशासाठी मला जगलं पाहिजे. मला जगलं पाहिजे. ! !

# वर्ष असें जातें....

ले.– सुरेश कृ. कुळकर्णी
एम्. ए. ज्युनिअर

अखेर बीस जूनचा दिवस उजाडतो. आणि चार महिने रखरखीत उन्हांत पोळणाऱ्या माळरानावरच्या इमारतींत नवीन जीवन येतें. लांबच लांब पसरलेल्या काळ्या सडकेवरून बसेस पळूं लागतात. सायकली धावूं लागतात. पायी जाणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर बारीक खडे ठोकरले जातात. तब्बल चार महिन्यांच्या दीर्घ मुदतीनंतर आज कॉलेजला नवीन कळा येते.

बुजलेले, बावचळलेले बरेच नवीन चेहरे कॉलेजमध्यें दिसूं लागतात. कॉलेज काय चीज आहे हें माहित नसलेले कॉलेजच्या ऑफिसजवळच (फी भरल्यामुळे तेव्हढेच माहित असतें.) बऱ्याच वह्या पुस्तकें घेऊन उभे असतात. व्हरांडा निरनिराळ्या रंगाने भरून जातो. कोणाचा कोणाला पत्ता नसतो. त्यामुळे अशा गर्दींत आपला एकुलता एक दोस्त पी. टी. [ P. T. ] हरवून जाईल म्हणून त्याचा हात घट्ट पकडून ठेवलेला असतो. येणाऱ्या जाणाऱ्या बरोबर तो हातहि ओढला जातो. कांही विद्यार्थ्यांचा एस्. एस्. सी. परिक्षेच्या वेळीं संबंध आलेला असतो. त्यामुळे इतरांना ते थोडे सिनीयर असतात. म्हणून पाहुण्यांना स्वतःचें घर दाखवावें अशा थाटांत कॉलेजची इमारत, कँटीन दाखवत ते फिरत असतात. एक दोन वर्षांचे अनुभव-वृद्ध विद्यार्थी त्यांच्या बोलण्यावरून आपली करमणूक करून घेत असतात. जुन्याच नोटीसा वाचत नवीन बदल लक्षांत घेत आणि वर्षाचें उद्दीष्ट ( Target ) निश्चित करीत कांहीजण रेंगाळत असतात.

हळूं हळूं पावसाच्या सरींबरोबर ओसाड माळरान हिरवें होवूं लागतें. कॉलेजच्या भिंती ओलावतात. नवीन विद्यार्थ्यांचा बुजरेपणा पुसला जातो. बराच आपलेपणा निर्माण होवूं लागतो. ऑफ, दांडी, पार्टनर, आणि बोअर सारखे शब्द तोंडांत खेळूं लागतात. आणि त्याबरोबरोबरच कांही संवयीमुळे ओठ काळे पडतात. निवडणूकांचा हंगाम सुरूं होतो. हिरव्या लाल कार्डांचा खच वर्गांतून, व्हरांड्यातून पडूं लागतो. नवीन लोकांना पहिल्यांदा त्याचें आकर्षण वाटतें आणि ते तो कचरा आपल्या खिशांत जमा करतात. ओलावलेल्या भिंती निवडणूकांच्या जाहिरातींनी भरून जातात. मतदानासाठी Identity Cards वर लावण्यासाठी सतत फोटो काढण्यासारखे चेहरे असलेले फोटो काढून घेतात. उमेदवार त्यांना यथाशक्ति मदत देण्याचें आश्वासन देतात. मतदान होतें. निवडणूकांचा फड संपतो. भिंतीवर, रस्त्यावर, शिमग्यानंतरचें कवित्व शिल्लक रहातें.

सरत्या पावसाळ्यांत तुरळक सभा, व्याख्यानं सुरूं होतात. निरनिराळ्या मंडळातर्फे विद्वान वक्त्यांना आमंत्रणें दिलीं जातात. परंतु बाहेर गांवच्या आमंत्रित पाहुण्यावर कधीच विश्वास टाकला जात नाही. ज्यांना आमत्रणें दिलेली असतात त्यांचीं उत्तरें ठराविक असतात, "वेळ नाही." 'वर्षाचे कार्यक्रम अगोदरच 'बुक' झालेले आहेत, 'कार्यबाहुल्यामुळे सध्या शक्य नाही. क्षमस्व. वगैरे वगैरे.' ज्या थोर व्यक्तींनी 'वेळांत वेळ काढून' येण्याचें कबूल केलेलें असत त्यांपैकी कांही आपलें भाषण ऐकवून जातात.

वादविवाद स्पर्धांसाठी विद्यार्थी निवडणें ही त्या मंडळाच्या प्राध्यापकाची वार्षिक डोकेदुखी असते. दोन महिने अगोदर ही डोकेदुखी सुरूं करावी लागते. नोटीसा वाचून कोणी आपलें नाव देणें हा अपमान समजतो. नोटीसांची अशी विल्हेवाट लागल्यावर गेल्या वर्षाच्या स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी पहावी लागते. त्यांतील कोणी कॉलेज सोडून गेलेले असतील तर डोकेदुखी अधिक. शिल्लक असलेल्या विद्यार्थ्यांवर भर देण्यांत येतो. भाषणें लिहून दिली जातात. निवड ठरल्याप्रमाणे होते. विद्यार्थी स्पर्धेला जातात.

याच सुमारास हिरव्या मैदानावर पांढऱ्या रेघा उठूं लागतात. निरनिराळ्या खेळांची प्रॅक्टीस सुरूं होते. बऱ्याच खेळांत नवीन होतकरू विद्यार्थी आत्मियतेने भाग घेतात परंतु त्यांना हमालीच करावी लागते. क्रिकेटच्या प्रॅक्टीसला त्यांना फिल्डींगच्या वेळीं चेंडूचा स्पर्श होतो. बॅट दुरूनच पहाण्याची संधि मिळते. त्यामुळे ते समजूतदारपणाने निवृत्त होतात. इतर राहिलेल्या विद्यार्थ्यांमधून संघ निवडले जातात. खेळाडूंची संख्या आणखीच मर्यादित होते. ज्यांची निवड होत नाही त्यांचा फार मानभंग होतो. निवडलेल्या खेळाडूंची नियमित (?) प्रॅक्टीस सुरूं होते. प्राण गेला तरी जिंकणार नाही या निश्चयाने सामने खेळले जातात. आणि खेळाडू आपला नैतिक विजय झाल्याचा मानतात. आता प्रॅक्टीसची जरुरी राहिलेली नसते. आणि म्हणून आंखलेलें मैदान पुन्हा हिरवें पडूं लागतें.

सहामाही परिक्षेच्या नोटीसा लागतात आणि मग विद्यार्थ्यांना आपण डिग्री मिळविण्यासाठी आलों आहोंत याची जाणीव होते. रिडींग रूमची संख्या वाढते. परंतु बऱ्याचजणांना तेथे 'फेसरिडींग' खेरीज दुसरें वाचनीय साहित्य (?) मिळत नसल्याने पुन्हा संख्या रोडावते. परिक्षा सुरूं होते. नवीन विद्यार्थी अगदी मान मोडून पेपर लिहितात. जुने विद्यार्थी फक्त माना मुरडतात !

परिक्षेचे श्रम हलके करण्याचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे 'पिक्चर !' एकदा एखाद्या पिक्चरला जायचें ठरल्यावर तो कोणताहि असो, कितीहि वेळा पाहिलेला असो ( कमींत कमी दोन वेळा पहाण्याचा प्रघात ) विद्यार्थी तो पाहिल्याखेरीज रहात नाही.

दिवाळीची सुटी लागते. बाहेरगांवचे विद्यार्थी आपापल्या घरी पांगतात. कॉलेज ओस पडतें. बागेंत कधी न दिसणारीं फुलें आता कोणी तोडायला नसल्याने झाडावर डोलूं लागतात. चार महिने वाढलेली मेंदी आकार घेते.

दिवाळीची दीर्घ सुटी संपून दुसऱ्या टर्मला सुरुवात होते. ह्या टर्मचें मुख्य आकर्षण म्हणजे 'गॅदरिंग !' नवीन लोकांना गॅदरिंग हा अजून ऐकीव इतिहास असतो. फक्त कांही दंतकथा त्यांच्या कानापर्यंत आलेल्या असतात. आता प्रत्यक्ष इतिहास कसा घडतो हें पहाण्याची संधि त्यांना सुदैवाने आलेली असते. त्यामुळे नवीन उत्साह त्यांच्यात संचारतो सालाबादाप्रमाणे ठराविक कार्यक्रम आंखले जातात. अधिकारसूत्रें जाणत्या लोकांच्या हातीं सोपवलीं जातात. दोन तीन दिवस हें 'ज्ञानसत्र' चालूं असतें. बरेच नवीन धडे विद्यार्थ्यांना ह्या ज्ञानसत्रांत दिले जातात. त्याचे विद्यार्थ्यांवर झालेले संमिश्र परिणाम ऐकणें मनोरंजक असतें.

गॅदरिंग संपल्यावर विद्यार्थ्यांची स्थिति हवा गेलेल्या फुग्यासारखी होते. सगळा उत्साह खलास होतो. आणि एक्स्ट्रा पिरियडस् सुरूं झाल्याने परीक्षेची जाणीव होते. स्कॉलर्स आपल्या जिवलग मित्रांनासुद्धा टाळूं लागतात कारण त्यांच्या नोटस् केव्हा, कोण मागेल याचा कांही भरवसा नसतो. जास्तींत जास्त गांभीर्य चेहऱ्यावर आणून लायब्ररींतला कोपरा तें गांठतात किंवा आपल्याच 'रूम' ला बाहेरून कुलूप लावून घेऊन भूमिगत होतात !

वातावरणांतला हिरवा रंग पालटतो. प्रसन्न हिरवें माळरान आता पिंगट आणि पिवळें पडूं लागतें. तुरळक दिसणारीं फुलें नाहिशीं होतात. झाडांचीं पानें गळूं लागतात. मोकळ्या मैदानावरून येणाऱ्या वाऱ्याबरोबर रस्त्याला लागतात. कापलेल्या मेंदीवर धूळीचीं पुटें चढतात. कॉलेजच्या आवारांत टोळक्या टोळक्यांनी बसलेले विद्यार्थी हळूं हळूं वर्गांत किंवा लायब्ररींत पांगतात आणि पेंगतात.

जवळ येणाऱ्या परिक्षेचें गांभीर्य विद्यार्थ्यांपेक्षा प्राध्यापकांच्या चेहऱ्यावर आणि शिकवण्यावर पसरतें. नोटस् देणें, पेपर्स सोडवून घेणें वगैरे कार्यक्रम सुरूं होतात. ज्यांचा शिकवायचा भाग बराच राहिलेला असतो ते घौडदौड सुरूं करतात. त्यांच्याबरोबर धांवण्याची दगदग कोणी फारशी घेत नाही. विद्यार्थी सरळ योग्य व थोड्या वेळांत मार्गदर्शन करणाऱ्या पुस्तकांचा आश्रय घेतात. निरनिराळ्या गाईडस्च्या सरस निरसतेची चर्चा होवून त्यांची घाऊक खरेदी होते. निरनिराळ्या विषयांचा अभ्यास कसा आणि किती करायचा याचें वेळापत्रक केलें जातें. तें सर्व वडील मंडळींना दाखवायला फक्त उपयोगी पडतें !

पोर्शन संपतात आणि शंका समाधानाचा उत्तररंग सुरूं होतो. या शंकामध्यें सर्व तऱ्हेचे प्रश्न संभवतात. अभ्यासाच्या, अभ्यास करण्याच्या प्रश्नापासून अपेक्षित उत्तरें, वगैरे जिव्हाळ्याच्या शंका आस्थेने विचारल्या जातात. एक्स्ट्रा पिरियडस बंद पडतात. आता नोटस्

काढणें म्हणजे वराती मागून घोड्यासारखें होणार म्हणून त्यांना फाटा दिला जातो. गाईड हीच गीता बनते.

परिक्षांचें वेळापत्रक लागतें. तिथि, मुहूर्त निश्चित होतो. विद्यार्थी दिवस, घटका, पळें मोजुं लागतात. अखेरच्या हल्ल्याची तयारी सुरूं होते. ज्यांचें पहिलें वर्ष असतें, त्यांचे हाल दयनीय असतात. परिक्षा सुरूं होते. हॉलमध्यें शिरल्यावर कांहींना पाठ केलेलें सर्व विसरल्यासारखें वाटतें, कांहींना इतका वेळ न आठवलेलें स्वच्छ आठवूं लागतें ! कोणाला तर सरांचे लेक्चर्स सुद्धा आठवतात. परंतु स्वतःचा सीट नंबर मात्र आठवत नाही ( कोणाला आपले वडील आठवतात ! )

प्रश्नपत्रिकेंत कांहींना न झालेल्या पोर्शनवर प्रश्न टाकले असल्याचा संशय येतो. काहींना तेच प्रश्न गेल्या वर्षीच्या अभ्यासक्रमावरचेच वाटतात. कांहींना त्या विषयाचा पेपरच त्या दिवशीं नसल्याचें वाटतें. परंतु या गोष्टींवर विचार करायला वेळ नसतो. ज्यांना वेळ नसतो ते पहिल्या १०–१५ मिनिटांतच पेपर्स टाकून आपला वेळ सत्कारणीं लावण्यासाठी निघून गेलेले असतात. इतरांना वेळ अपुरा पडतो.

अशातऱ्हेने शेवटच्या पेपरपर्यंत आजारी न पडतां फार मोठें कार्य पार पाडल्याच्या आनंदांत विद्यार्थी मोकळे होतात. निकालाच्या बाबत सर्वजण निष्काम कर्म केल्याच्या मनःस्थितींत असतात. स्कॉलर्सना अपेक्षेपेक्षा कठीण पेपर्स गेलेले असतात. कांही जणांना क्लासबद्दल निश्चिति वाटत नसते. त्यावर आता कोणी फारसा विचार करीत नाही. शेवटच्या वर्षाचे विद्यार्थी एकमेकांचे प्रेमाने निरोप घेतात. वर्षभर ज्यांच्याशी भाषणसुद्धा केलेलें नसतें त्यांना वारंवार भेटण्याच्या सूचना केल्या जातात. रुम पार्टनरचे पत्ते तीन तीनदा टिपून घेतले जातात. परंतु आगगाडींत सहप्रवाशाच्या टिपून घेतलेल्या पत्त्याप्रमाणेच हे पत्ते विसरले जातात. कांही भावनाप्रधान विद्यार्थ्यांना वर्षान् वर्षं सहशिक्षण घेऊन सुद्धा ' कोरडेच ' राहिल्याचा पश्चात्ताप होत असतो ! ज्यांना कॉलेजांत अजून १–२ वर्षे काढायची इच्छा असते ते पुढच्या वर्षी लवकर या म्हणून एकमेकाचें निरोप घेतात !

सुट्या लागतात. नियमाने पळणाऱ्या बसेसची वहातूक मंदावते. सायकली अगदीच तुरळक दिसून येतात. उजाड माळरानावर मोकळा वारा पाचोळ्याचा भोवरा फिरवूं लागतो. एवढी मोठी इमारत आता उजाड होते. नेहमीचा गोंगाट, गडबड, किणकिण थांबते. निरव शांततेंत पिवळें माळरान उन खात उभें असतें. आणि लांबच लांब पसरलेला काळा रस्ता अजगरासारखा सुस्त पडून पळणाऱ्या झळांकडे पहात पुन्हा येणाऱ्या वीस जूनची वाट पहात असतो !!

———

मजबूत व खात्रीलायक लोखंडी सामान मिळण्याचें
—: जळगांवांतील एकच ठिकाण :—
तुकाराम श्रीपत चौधरी
लोखंडी सामानाचें दुकान, पोलन पेठ, जळगांव
आमचेकडे सर्व प्रकारचें लोखंडी सामान, पलंग, पाळणे, रंगीत ट्रंक्स, खुर्च्या, शेल्फ, जाळीचीं लोखंडी फोल्डींग कपाटें कोठ्या, बादल्या पोळपाट, तवे इत्यादी माल किफायतशीर भावांत मिळेल.
* गिऱ्हाइकांचा संतोष हेंच आमचें ध्येय *
एकवेळ अनुभव घेऊन खात्री करा....!



# आमचं आहे कां ?....

लें.– प्रा. म. मो. केळकर

सकाळीं जाग्या झालेल्या गांवाला ८ वाजे पर्यंत बरीच गति आलेली असते. उन्हं पडलीं कीं म्हातारे लोक फिरायला बाहेर पडतात आणि आमच्या आसपासचीं तरूण मुलं कोपऱ्यावर उभे राहण्यासाठी बाहेर पडतात. कोपऱ्याकोपऱ्यावर सायकलच्या सीटवर दोन्ही कोपरं टेकून जिभल्या चाटीत उभे राहणें हें आजच्या तरूण पिढीचें व्यवच्छेदक लक्षणच आहे.

पण आमच्या आसपासचीं मुलं सकाळीं पलिकडच्या कोपऱ्यावर जाऊन उभी राहतात तीं ' त्या ' हेतूनं नव्हे. त्यासाठी उभं राहण्याची वेळ सकाळची नाही. ही मंडळी निघतात ती टपाल पाहायला. ज्यांच्या पुढच्या परीक्षेला अवकाश आहे किंवा सर्व परीक्षा संपून जे नोकरीच्या शोधांत आहेत हा अशांचा एक आवडता छंद आणि वेळ घालवण्याचं साधन आहे.

पलिकडच्या हमरस्त्याच्या कोपऱ्यापासून आमच्या भागाच्या पोस्टमनचा बीट सुरूं होतो. सकाळीं तेथल्या हॉटेलसमोरच्या कोपऱ्यावर टपालशोधकांचा असा घोळका तुम्हाला नेहमीच दिसेल. संध्याकाळीं तरुणांच्या घोळक्यांनी फुलणारे अनेक चौक आहेत पण सकाळी फुलणारा हा एवढाच चौक असावा. संध्याकाळीं फुलण्याचं भाग्य त्याला नाही. एका बाजूला कांदेबटाटे आणि दुसऱ्या बाजूला आगीचे बंब यांत कोपऱ्यावरून उभं राहून पाहण्यासारखं काय असणार ?

हे लोक उभे असतात ते पोस्टमनची वाट पाहत. पुण्याच्या स्टेशनवरचे हमाल दुरून येणारं वाहन हेरत असतात तशी ही मंडळी पोस्टमनची वाट पाहत असतात. तो समोरच्या गल्लींतून येतांना दिसला की सिनेमाच्या चिठ्या वाटणाऱ्या पोऱ्याभोवती मुलं गोळा होतात तसेंच हे सर्वजण त्याला वेढतात. लोकलब्जेस्तव फक्त उड्या मारण्याचं शिल्लक राहतं. आणि मग संवाद सुरू होतात...

' का हो, रानडे आहे का ? '

' पाटील आहे का हो ? '

' जरा सारस्वत बघा बरं. '

अगदी शेवटीं आलेला माणूस टांचा वर करून विचारतो,

' आमचं आहे का हो ? '

' जरा चौधरी पहा बरं. प्लीज. मला गाडीनं जायचंय. '

' कोणते चौधरी ? ' पोस्टमन विचारतो.

' एम्. ओ. '

' एम्. ओ. नाही. पण व्ही. पी. आहे. ' पोस्टमन सांगतो. हे व्ही. पी. मागच्या बाजूला उभे आहेत. ' आलो हं ' म्हणून ते गर्दी सारीत पुढे होतात. एम्. ओ. बिचारे खट्टू होतात. पोष्टमन व्ही. पीं. च्या हातांत एक पत्र देतात. ती विम्याच्या हप्त्याची नोटीस असते. एम्. ओ. ना क्षणभर असुरी आनंद होतो.

मधे पोस्टमन आणि भोवती घोळका अशी ही यात्रा पुढे सरकते. तातडीनं हवीं असलेलीं किंवा घरीं दिलीं जाऊं नयेत अशीं पत्रें येथेच घेतली जातात. पोस्टमनवर चौकशीच्या प्रश्नांची सरबत्ती होत असते, आणि चौफेर लाठी फिरवणाऱ्या वीराप्रमाणं तो तडातड हो किंवा नाही म्हणून उत्तरं देत असतो. ही सारी गर्दी हळूहळू कमी होते.

पोस्टमन आणखी पुढे गेला कीं बरीचशी बालचमू त्याच्या भोवती गोळा होते. हीं मुलं तर त्याला अक्षरशः लोबकळतात. मग कुणाला तो सांगतो, ' उद्या आणीन '; कुणाला ' बाबां जवळ दिलं ' म्हणून वाटेला लावतो आणि पुढे निसटतो.

पोस्टमनच्या स्मृतीचं मला नेहमीच कोतुक वाटतं. अमक्याचं पत्र आहे की नाही हें पत्रं न चाळताहि, बिनचूक सांगणारा पोस्टमन बृहस्पतीच असावा.

कोठे तरी कॉलेजचा विद्यार्थी भेटतो. तो नमस्कार करतो. पण मग प्रश्न पडतो, हा लखोटे का चिरमाडे ? वर्ग कोणता ? कांही स्मरत नाही. मग मी नमस्कार करतो, अभ्यासाबद्दल विचारतो. तो म्हणतो ' मी डी. एच्. ओ. च्या ऑफिसमधे आहे. मागच्याच वर्षी बी.

एस्सी झालों.' हा माझा नेहमीचा अनुभव. त्यामुळे मला तर पोस्टमनबद्दल नितांत आदर आहे.

कितीतरी लोकांचीं सुखदुःखं त्याच्या हातांत असतात. नोटिसा चुकवणारीं अशीलं सोडलीं तर सारे लोक त्याची त्याची वाट पाहत असतात. कुणाला पत्र न लिहिणारेसुद्धा. मीहि त्यांतलाच एक आहे. प्रेमपत्र सोडाच पण वर्तमानपत्रांहि लिहिणं मला जमलं नाही. आणि कधी लिहिलंच तर ५ नवे पैसेहि वसूल करून घेता येत नाहीत!

परवा सकाळीं बाहेर पडलों अन् समोरून पोस्टमन येतांना दिसला. आता कुणाचंहि पत्र येण्यासारखं नव्हतं. तेव्हा मी मनाशी ठरवलं, 'काय अर्थ आहे विचारण्यांत? सरळ पुढं जावं. आपलं असलं तर देईलच तो.' आणि मुद्दाम पोस्टमनच्या विरुद्ध कडेनं रस्त्यानं निघालों. पोस्टमननं दुरून नमस्कार केला; आणि अभावितपणं मी बोलून गेलों, 'आमचं आहे का? तो म्हणाला, 'नाही सर'.

हें असं आहे पहा. खरं म्हणजे तो मला ओळखतो. माझ्या पत्राच्या पत्त्यांत नुसतं नांव अन् गांव लिहिलं असलं तरी तो पत्र आणील इतका ओळखतो. आणि मलाहि त्यांत थोडं बरं वाटतं. आपण बरेच मोठे असल्याचं जरा समाधान लाभतं. नुसत्या नांवावरून पत्र पोहोचायचं म्हणजे काय!

प्रत्येकाला आपण मोठे आहोंत, प्रसिद्ध आहोंत असंच वाटत असतं. परगांवच्या गृहस्थाला जेव्हा आपण लिहितों, 'स्टेशनवर उतरा, माझें नांव सांगा; टांगेवाला आणून पोचवील' किंवा तुमच्या स्नेह्याला तुम्ही पत्ता सांगता, 'त्या हॉटेलजवळ या, कोणालाहि विचारा, तो माझं घर दाखवील' – तेव्हाहि मनांत हीच मोठेपणाची खोटी भावना असते.

'आमचं आहे का?' असं पोस्टमनला विचारायचा मोह आवरणं फार थोड्यांना जमत असेल. निदान मला तें जमलेलं नाही. प्रत्यक्ष विचारायचा कांहीवेळा मला संकोच वाटतो पण तरीहि घरांतून पोस्टमन दिसला की नकळत मी खिडकीजवळ जातोंच. 'आमचं आहे का?' हें विचारतांना आपलं पत्र असावं. अशी फार मोठी अपेक्षा असते. आणि मग पोस्टमननं नाही म्हटलं की निराशा होते.

सहामाही परीक्षा झाल्यावर मी प्रथमच वर्गांत शिरत होतों. विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका परत मिळण्याची किती उत्सुकता असते हें मला माहीत आहे. पण त्या तपासून झाल्या नव्हत्या. आंत गेलों तोंच कुणीतरी विचारलं, 'पेपर तपासून झाले का?' आता, तपासून झाले असते तर मी आणले नसते का? पण तरीहि त्या विद्यार्थ्यानं विचारलंच ना? त्याला वाटलं असेल 'न जाणो, आणायचं तर विसरले नसतील?' एखाद्या दिवशीं पोस्टमन बदलून आला म्हणजे आपल्याला हेंच वाटतं ना की 'न जाणो, नवीन आहे; आपलं घर तर चुकलं नसेल ना?'

हीच तर मौज आहे. प्रत्येक गोष्टीकडे मनुष्य फार मोठ्या अपेक्षेनं आणि अधीरतेनं पाहत असतो अन् मग पदरीं निराशा येते. अपेक्षाच थोड्या ठेवल्या म्हणजे अपेक्षाभंग हि थोडाच होणार नाही का? आणि थोडा धीर धरला तर तोहि टळणार नाही कां? मूळ अपेक्षाच शून्य ठेवल्या म्हणजे कशानेहि छेद दिला तरी उत्तरांत फरक पडणार नाही.

जेवणापासून राजकारणापर्यंत प्रत्येक ठिकाणीं माणूस या आपल्या दोषानं अकारण दुःख ओढवून घेत असतो आपल्या मर्यादा ओळखून अपेक्षा ठेवल्या तर हा प्रसंग येणार नाही.

चित्रपट पाहून परत आलेला विद्यार्थी उगाचच बेचैन होऊन रात्र घालवतो. चित्रपटांतलं सगळं सत्यसृष्टींत अवतरलं असतं तर कितीतरी आत्महत्या टळल्या असत्या.

चित्रपटांतले प्रेमप्रसंग डोळ्यापुढे तरळत असतांनाच पुढे विद्यार्थिनींचा घोळका जात असलेला त्याला दिसतो. त्यांचा संवाद त्याला ऐकूं येतो—

'त्या × × × ची पर्सॅनॅलिटी काय छान आहे नाही? आणि त्या × × × चा मॅनीला काय टॉप आहे!'

हा विद्यार्थी मग उगाचच आपल्या मॅनीलाकडे बघतो अन् त्याच्या मनांत विचार येतो, 'हा उल्लेख माझा तर नाहीना?' आणि तो जरा सावकाश चालूं लागतो.

———



भारतीय तत्त्वज्ञानाचे प्रभावी उद्गाते
व प्रचारक स्वामी विवेकानंद
यांची जन्मशताब्दि यावर्षी
भारतभर साजरी
होत आहे!
त्यांच्या स्मृतीला आमचें
सादर अभिवादन!

❖



## OUR ROLL OF HONOUR

### B. Sc. 1st Classes April 1962


Nehate L. D.


Bhandarkar P. G.


Patil Y. N.


Mali R. L.


Keskar M. S.


Patil S. K.


Patil P. B.


Talele M. M.


Kothari R. M.

## OUR ROLL OF HONOUR


Kolhe G. R.

B. Sc. 1st Class
April 1962


Chaudhari V. R.

## ON TO DEFEND THE HIMALAYAS


**Shri More B. M.**
Selected for
Officers' Training Unit


**Shaikh L. M.**
Selected for
Commission in the army


**Teli M. K.**
Winner- Light Weight Class wrestling
Inter-Collegiate Sports.

रोटरी क्लब औरंगाबाद, डिबेटिंग शील्ड [ १९६२-६३ ]



श्री. वाणी (सेके.); प्रा. जोशी (चेअ.); प्रि. महाजन, श्री. भोळे एल्. एम्.; कु. मीनाक्षी पळसुले (विजेता-संघ)



कु. कुमुदिनी कानडे
प्रथम पारितोषिक
कै. डॉ. हिवाळे आंतरमहाविद्यालयीन वादविवादस्पर्धा, नगर.
कु. कानडे व श्री. जोशी यांच्या संघाचा द्वितीय क्रमांक.



श्री. प्र. ल. जोशी



कु. छाया केळकर
प्रथम पारितोषिक
आंतर-महाविद्यालयीन वादविवाद-स्पर्धा पुणें.
श्री. प्र. ल. जोशी व कु. छाया केळकर यांची—
पुणें विद्यापीठातर्फे आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी ( दिल्ली ) निवड.



कु. मीनाक्षी पळसुले
द्वितीय पारितोषिक
स्वामी विवेकानंद जन्मशताब्दि महोत्सव वादस्पर्धा, पुणें विद्यापीठ, पुणें.



# लावणी वाङ्मयांतील हास्यरस....

ले.– प्रा. म. ना. अदवंत

एके काळीं उपेक्षित असलेल्या लावणीवाङ्मयाकडे मराठी रसिकांचें आज पुन्हा लक्ष जाऊ लागलेलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. लावणी वाङ्मयाचें खरें स्वरूप समजावून न घेतांच 'अशिष्ट' व 'अश्लील' या सदराखालीं त्या वाङ्मयाची बोळवण करण्याची आजपर्यंत प्रथा होती. दखल घेतलीच तर ती 'भलाजन्म हा तुला लाधला' अशासारख्या रामजोशीच्या उपदेशपर लावण्यांची, अनंतफंदीच्या फटक्यांची किंवा होनाजीच्या 'घनःशाम सुंदरा' अशासारख्या भूपाळ्यांची तेवढी घेतली जात असे. इतर लावणीवाङ्मय शृंगारिक, अश्लील व ग्राम्य म्हणून त्याकडे दुर्लक्ष करण्याची सुशिक्षितांची वृत्ति होती. त्यामुळे त्यांतील केवढ्या मोठ्या काव्याला आपण मुकत आहोंत, याची त्यांना कल्पनाहि नव्हती. सुदैवाने आज रसिकांचें लक्ष या वाङ्मयप्रकाराकडे अधिकाधिक जात आहे. रेडिओवर लावणीवाङ्मयाचें विविध स्वरूप दाखविण्याच्या दृष्टीने प्रचार चालू आहे. शाहिरांच्या प्रतिभेचे विविध पैलू दाखविणारे शाहिरी-वाङ्मयाचे प्रातिनिधिक संग्रह प्रसिद्ध होत आहेत आणि अनेक श्रेष्ठ शाहिरांचे स्मृतिदिनहि साजरे करण्यात येत आहेत. लावणी वाङ्मयासंबंधींची ही होत असलेली जागृति स्पृहणीय आहे.

लावणीवाङ्मयांत फक्त शृंगाररसच आहे अशी सामान्यतः सर्व लोकांची एक दृढ समजूत झालेली दृष्टीस पडते. 'शृंगार' हा रस-राज आहे आणि लावणी वाङ्मयांत तो प्रामुख्याने दिसतो, हें खरें आहे. पण त्या रसाच्या अनुषंगाने इतरहि रस लावणीवाङ्मयांत येतात व त्यांचेंहि स्वरूप तितकेंच विलोभनीय आहे, हें विसरून चालावयाचें नाही. मुंबई साहित्य संघांत 'वामन मल्हार जोशी' स्मृतिदिनानिमित्त लावणी वाङ्मयावर भाषण करतांना लावणीवाङ्मयांत अध्यात्म असल्याचें श्री. म. ना. सहस्रबुद्धे यांनी सोदाहरण पटवून दिलें. अध्यात्माबरोबर व भक्तिरसाबरोबर त्यांत करुणरस आहे, वत्सलरस आहे आणि हास्यरसहि पण आहे. त्यांतील हास्यरसाचें लावणीवाङ्मयांतील स्वरूप आपण या लेखांत पहाणार आहोंत. हें स्वरूप स्पष्ट करतांना मुख्यतः पेशवेकाळाच्या अखेरीच्या प्रमुख शाहिरांच्याच लावण्यांचा विचार या लेखांत केला जाईल.

हास्य हें बहुधा जीवनांतील विसंगति व असंबद्धता यांच्या जाणिवेंतून निर्माण होत असतें. सामाजिक जीवनांत ज्यावेळीं जीवनमूल्यांशी विसंगत अशीं दृश्यें दिसूं लागतात, सत्य व वर्तन यांचा मेळ दिसून येत नाही, जिकडे तिकडे अराजक माजलेलें असतें, अशा वेळीं कवीची प्रतिभा त्या विसंगतीचें मोठ्या प्रखरपणे दर्शन घडविते. अनेकदा या दर्शनांत उपरोधाची तीव्र धार असते. क्वचित् कवि त्या विसंगतीच्या मुळाशीं असलेल्या जीवनांत शिरला तर मात्र हास्याच्याऐवजीं त्यांतून कारुण्यहि निर्माण होतें. हास्य व शोक यांच्या सीमारेषा अशा अगदी जवळ जवळ आहेत. कवि ज्यावेळीं वरवरच्या विसंगतीकडे लक्ष देतो, त्यांतील असंबद्धता सहानुभूतीने, खिलाडूवृत्तीने आणि सुजाणपणें रसिकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळीं त्यांतून निर्माण होणारें हास्य मोठ्या उच्च दर्जाचें असतें. स्वभावनिष्ठ आणि विशेषतः प्रसंगनिष्ठ विनोदाची निर्मिति अशा विसंगतींतून होत असते. कल्पनानिष्ठ विनोद व शब्दनिष्ठ विनोद यांचें स्वरुप भिन्न असतें. जीवनान्तर्गत औचित्यविसंगतिपेक्षा यांत कल्पनेवर व शब्दांच्या विशिष्ट न्यासावर विशेष भर असतो. शाहिरी काव्यांत कल्पनानिष्ठ किंवा शब्दनिष्ट विनोद फारसा आढळणार नाही. पण, सामाजिक जीवनांतील विसंगतीवर त्यांनीं–विशषतः परशरामाने, पुष्कळच लावण्या लिहिल्या आहेत.

हीं सामाजिक उपहासपर काव्यें ज्या एक विशिष्ट परिस्थितींतून निघाली, ती परिस्थितीहि विचारांत घेतली पाहिजे. हीं काव्यें बहुधा रावबाजीच्या अखेरच्या काळांत आणि इंग्रजी राजवटीच्या सुरवातीच्या काळांत निर्माण झालीं आहेत. राजकीय दृष्ट्या हा काळ मोठा अंदाधुंदीचा होता. १८००

नंतर महाराष्ट्र हें अंतर्गत यादवीचें स्थान होऊन बसलें होतें. शिंदे होळकर यांची परस्परांतील यादवी, होळकर व दुसरा बाजीराव यामधील यादवी आणि मराठी राज्यांतील एकंदर निर्नायकी यांचा परिणाम सर्व महाराष्ट्रांत अंदाधुंदी व अराजक माजण्यांत झाला. विशेषतः यशवंतराव होळकरांची पुण्यावर स्वारी, बाजीरावाचें पलायन आणि यशवंतरावांनी पुण्यांत माजविलेला कहर यामुळे सर्व जनता त्रस्त होऊन गेली, आणि पुणें प्रांतांत पहिला दुष्काळ पडला. याशिवाय १७९७ पासून लहानसहान बंडाळ्या सुरूं होत्याच. १८०२ पासून पेंढाऱ्याच्या टोळ्याहि उठल्या व सर्व प्रजेस लुटूं लागल्या. त्यामुळे पडलेल्या दुष्काळांत जिकडे तिकडे बेबंदशाही माजली. कुणी कुणाला विचारेना. नैतिक व सामाजिक मूल्यें पार पायदळीं चिरडली जाऊं लागलीं. रामजोशींनी याचें वर्णन खालील ओळींत कसें केलें आहे तें पहा–

‘ कुणा न कुणि धनि मना येईल तसें जनासि जन वंचिती
धनानिमित्तें मरती किती गरति धरून यवन अन्न चारिती
आठ दिसांमधि पठाण तिंदा लूटावया धांवती
उठावयाला तकवा नाही बकवा सारा धणि चाकर झुंजती
दारवित्त घरदार दिलं तरी मार चुकेना अती
फार वदूं मी काई वधिल्या ही गाई बाटविल्या द्विजसती ’

अशा अंदाधुदींत कुणी कुणावर किती खंड बसवावा; कुणी कुणाकडून खंड घ्यावा याला ताळतंत्रच राहिला नाही. बंड करणारे लोक जनतेचे अमानूष हाल करावयासहि चुकत नसत. त्यामुळे कितीतरी लोक देश सोडून गेले, कितीक घराण्यांची वाताहत झाली व किती अजीबात नष्ट झाले, याचा पत्ताच नव्हता. या साऱ्यांचा नैतिक जीवनावरहि कसा परिणाम झाला झाला होता. याचें अनंतफंदींनी मोठें परिणामकारक वर्णन केलें आहे.

खालील उतारा पहा—

‘ जमाना आला उफराटा । सुन सासूला लावी बट्टा ॥
लेक बापाशीं लावी अवभाषीं । शिष्य गांजती गुरूशी ॥
जावई सासूला म्हणतो तूं काशी । लवडून देतो मातेशी ॥
मेहुणीचा चालवी लाड । बहिणीला म्हणे तूं रांड ॥
निघ घरांतून व्दाड । तुझी नाही ग मजला चाड ॥
माझी बायकोच मजला गोड । नाही सासऱ्याची ठेविली भीड
बेटा लबाड पाहून बापाला लटका धरि ताठा ॥ ’

सामाजिक जीवनांतील हा अनाचार अनेक शाहिरांनी वर्णन केला आहे. कुटुंबव्यवस्था तर खिळखिळी झाली, पण नैतिक बंधहि शिथल झाले. भोंदू साधूंचीं पथकें निघालीं. वेदशास्त्र –संपन्न ब्राम्हणांचा बाहेरख्यालीपणा वाढला, कथाकीर्तनाची आवड नाहीशी झाली व समाजांत कुणीच कुणाला पुसेना–अशी अवस्था झाली. अनंतफंदींनी म्हटल्याप्रमाणे ‘ बंड आणि महर्गततेचा संयोग । या उभयतांचा घडतां योग । प्रळय झाला यथासांग । रुसावयास जागा न ठेवली । ’ अशी सर्व महाराष्ट्रांत अवस्था झाली.

१८१८ नंतर तर सर्व राजवटच बदलली. या राज्यक्रांतीचीं सुरवातीचीं वर्षें तर अंदाधुंदींचींच होतीं. इंग्रजी राजवट सुव्यवस्थित बसेपर्यंतचा काळ जनतेच्या दृष्टीने गोंधळाचाच होता. नवे कायदेकानू, नवी राज्यव्यवस्था यामुळे लोक स्तिमित झाले. पेशव्यांच्या काळांतील मोठमोठे सरदार ‘ झिरपून गेले ’ पराक्रमाला वाव राहिला नाही. परशराम या अव्वल इंग्रजीच्या काळांतील वर्णन करतांना म्हणतो.

‘ तेजहीन अवध्यांचे झाले ना आले जननी उदरां
शूरत्वाशी डाग लागला यास्तव दैवी आल्या भद्रा.’

त्यामुळे रथगाड्या, अंबाऱ्या, पालख्या आढ्याला टांगून ठेवाव्या लागल्या. भाले, बर्च्या, ढाल–तलवारी यांना कवडी किंमत येईना. राजधान्या बुडाल्या, राजाचे फर्जी झाले. विशेषतः इंग्रजी अंमलाचे वर्णन करतांना परशराम म्हणतो–

‘नाही विलायत कोणी पाहिली या मुलूखावर जरब कशी ?
एक चपराशी चकती पाहून रयत थरथरी बकरी जशी ।
कला कुशलताही कमती जाणतो ईश्वर कळना कळ ऐशी ।
दहा हस्तीशी काम ढळेना एक माणूस हलवी त्याशीं ॥
न्यायनीति बालाहून बारीक मुसळाहुन ठोसर लईशी । ”

अशा बजबजपुरींत समाजांत स्थैर्य असणें अशक्यच होतें. जुनीं मूल्यें बदललीं आणि नवी मूल्यें पूर्ण अपरिचित. अशा स्थित्यंतराच्या काळांत सामाजिक व राजकीय जीवनांत जें अराजक माजले होतें त्यांत हे शाहीर वावरत होते. आणि म्हणून या अराजकाचं वर्णन करतांना रामजोशी व अनंत फंदी यांच्या कवनांत कडवटपणा व कारुण्य हेंच अधिक आलें. रामजोशींची ‘ दुष्काळ ’



ही लावणी किंवा अनंतफंदीच्या श्रीमाधव ग्रंथांतील सहावा अध्याय व त्याच्या दुसऱ्या बाजीरावाची कारकीर्द वर्णन करणाऱ्या लावण्या वाचल्या म्हणजे करुणरसाचा प्रत्यय अधिक येतो.

परशरामाच्या लावण्यांतून त्या मानाने उपरोध अधिक आहे. देशस्थितीपर लिहिलेल्या पोवाड्यांत व लावण्यांत बदलत्या काळाचें परशरामाने मोठें उपरोधपूर्ण वर्णन केलें आहे. तो एका लावणींत म्हणतो —

“ जुने कायदे अगदीं मोडले जधीपुन आली इंग्रजी ।
कांदा भाजी एक्या मोलें तुप साखर मैदा मोजो ॥ ”

असें सांगून तो त्या राजसत्तेचें पुढे वर्णन करतो—

‘ रुसुम मिलाने घ्यावें पोत्यांतुन हुकुम कुणावर नाही जोरा
पाटील कुळकर्णी नांव उगीच घालून दमले येरझारा ।
सत्ता साहेबी अगदीं बुडाली महाराचा त्याहूनि तोरा ।
शहाणे पुरखे अकलवंत हेवट म्हातारे बिनकाजी ।
कवळे कोम वय तरणे काररभारी त्यावर बहाल खुषमर्जी ॥”

आणि त्यामुळेच—

‘ रथगाड्या अंबाऱ्या पालख्या टांगून ठेविल्या आढ्याला ।
धमण्या छकडे म्याने बसाया दुखणाइत जित मढ्याला !
ठुसके ठेंगणे शिपाई पाहून एकसारखी एक मर्जी
टोपी डगले तंग विजारी खडी चवकी हुजुरजी ॥ ’

असें चित्र सगळीकडे दिसूं लागलें. ‘ अंधार नगरी बेबंद राजा न्याय निति कैची । ठाके ठोके टेगाई करून पाहील पत त्याची । ’ अशी राज्यांत जिकडे तिकडे अवस्था झाली, कारण धर्म बुडाला, सत्कर्म लोपलें, स्वाभिमान नष्ट झाला, हत्ती उंट भुसार माल वाहूं लागले; हें सर्व पाहून परशराम म्हणतो, फिरावे काठीस बांधून सोनें । पुसेना कोणी थोर सोने । नवी मुद्रा यांत काय उणें ? ’ इंग्रजी राज्यांत काठीला सोनें बांधून फिरण्याइतका सुरक्षितपणा आला. पण समाधान झालें नाही. नैतिक अधःपात अधिकच वाढला. राज्यकर्त्यांच्या नव्या राजवटीशीं जनतेला समरस होता आलें नाही. त्यामुळे परशराम अंगतिक होऊन एक ठिकाणीं म्हणतो–

‘ शक जबरा केवढा चळ पडला अवध्याच्या बुद्धींत
शहाण्याचें शहाणपण न चाले या संधींत
ज्या नामी नामी वस्ता गांजिल्या रद्दींत
चाल सख्या पाय फुंकून मार्ग नीट शोधांत
यापुढें कठिण काळ थोडक्या अवधींत ॥ ’

सामाजिक जीवनाच्या या बजबजपुरीचें जें चित्रण शाहिरांनी केलं आहे त्यांत उपरोधाचा भागच अधिक आहे. हास्य असलें तर तें कडवट आहे. अगतिकतेंतून व विषण्ण वृत्तींतून तें निर्माण झालें आहे. उपरोधाला कटुतेची धार अधिक आहे. पेशवाईच्या आश्रयाखालीं जगणाऱ्या या शाहिरांना पेशवाई नष्ट झाल्याचें दुःख अधिक व्हावें यांत नवल तें काय ?

या कवनांकडून परशरामाच्या सामाजिक उपहासापर कवनाकडे आपण वळलों म्हणजे अधिक प्रसन्न वातावरणांत आपण प्रवेश करतों. त्यांत दोन बायकांच्या दादल्याची कथा आहे. ऐतखाऊ नवऱ्याची कथा आहे. नवऱ्याला वेगळे होऊन संसार करायला सांगणाऱ्या दुघड नारीची कथा आहे. सती बनूं पाहाणाऱ्या ढालगज बाईची कथा–समाजांतील अशीं अनेक गंमतीचीं व विसंगत दृश्यें परशरामाने आपल्या प्रतिभेने रंगविलीं आहेत. या सर्व लावण्या त्याच्या सूक्ष्म अवलोकनाची व विनोद दृष्टीची चांगली साक्ष देतात.

सवतीसवतीचें भांडण हा परशरामाच्या लावणीचा एक आवडता विषय दिसतो. त्याच्या तीनचार लावण्या या विषयावर आहेत व त्या सर्व लावण्यांतून दोन बायकांनी जेरीस आणलेल्या नवऱ्याचें चित्र चांगलें रेखाटलें आहे. एकींत थोरली व धाकटी नवऱ्यावरचा आपला हक्क प्रस्थापित करण्याचा मोठा अट्टाहासाने प्रयत्न करतात. त्यांतील थोरली म्हणते—

‘ म्हणे थोरली मी लग्नाची देवी धर्मी रुजू
कोरा नवरा आधीं म्यां वरला येती मला जन पुजू
जेठी सून मी वडील घरामधि जशी ढगामधि बिजू

त्यावर धाकटी सरसावून तिला उत्तर देते—

‘ म्हणे धाकटी वडीलपणाचा नकी लावूं तोरा
खुप मर्जी पतीची असली तुझा काय तोरा
कानीं कवाडी येऊन लागशील अवघा वेळ सारा
दिड तांदुळ शिजवून सांगशी गोष्टी तीन तेरा
वय नूतन माझ्या भरजानीचा जणूं गगनीं तारा
म्हणून भाळले पति रूपाला तुज सोडून गारा. ’

शेवटीं दोघींचें भांडण विकोपाला गेल्यावर पति येऊन दोघींची समजूत करतो. पण दुसऱ्या लावणींतला पति अधिक दुर्दैवी आहे. त्याच्या दोन बायकांनी तर

विभागणीच करून घेतली होती. त्यामुळे त्याचा परिणाम काय झाला पहा–

‘ शरीर घेतले पतिचें वांटून दोघी निजल्या शेजारीं
झोपीमध्यें दिली कलथी पतीनें इचा पाय नेला तिच्यावरी
रागें रागें उठली थोरली घेऊन वरंटा काय करी
‘ उठ सवती जागी राहाय ।
तुझ्या वांटणीचा पाय !
माझ्याकडे आला हा पहाय ।
पायावरती हणला वरंटा पतो कांपतो थरथरां ।
रागें रागें उठली धाकटी तिनें मोडला तो दुसरा ।
त्यामुळे—
खर्चून पैका दोघी बायका केल्या सुखासाठीं ।
सुख नाही पर दुःख लागलें नित्य आमच्या पाठीं ॥’

अशी या सर्व दोन बायकांच्या दादल्यांची अवस्था झाली तर नवल नाही. दोन बायकांच्या नवऱ्याचें चित्र आज अपवादात्मक असलें तरी दहा बारा वर्षांपूर्वीपर्यंत हें चित्र समाजांत अगदी प्रातिनिधिक होतें. आणि ‘ सवतीसवतीचें भांडण ’ हा प्रकारहि सर्वत्र दिसणारा असाच होता. त्यामुळे या कवनांतील चित्रांत थोडी अतिशयोक्ति असली तरी अवास्तवता खास नाही. सवतीसवतीचें भांडण लावून देऊन आपण गंमत पहाणारा सगनचा नायक त्यामानाने चतुर दिसतो.

सवति सवतीचा काजिया लावून तुम्ही देतां स्वामीराया
लाउनि पदर मुखीं आडवा हांसता नाही तुम्हां तिळभर
माया ”

अशी लाडकी तक्रार करून सवतीसवती एक–मेकींचीं गाऱ्हाणीं पतीजवळ सांगतात आणि पति त्यांची समजूत करतो. हें चित्र बरेंचसें प्रसन्न आहे. सगनने या लावणीच्या शेवटीं केलेला उपदेशहि मोठा मार्मिक आहे. तो म्हणतो—

“ सगनभाऊ म्हणे निवडीला न्याय दोघींचा जाणा
एकमेकींची चहाडी सांगतील आपण आणूं नये मना ”

ऐतखाऊ नवऱ्याचें चित्रहि परशरामाने मोठ्या विनोदी रीतीनें केलें आहे. एका लावणींत—

“ धट्टा कट्टा तरणाताठा कांही करीना चाकरी ।
कुटुंबघातकी तीन शेराच्या नित उडवी भाकरी ॥

अशा ऐतखाऊ नवऱ्याविरुद्ध गांवच्या पाटलाकडे त्याची बायको तक्रार नेते नवराहि आपली बाजू मांडतो. ती म्हणते—

गांवाबाहेर आंत कोसावर गोमाव्याची मढी ।
जन्म आखाडा आक्षई केला नित ओढितो गुरगुडी ॥
लाल डोळे करी हिरवे पिवळे घरीं येऊन बडबडी ।
खायापुरता गोड बोलतो मजभवतीं लुडबुडी ॥

अशी तिची तक्रार ऐकल्यावर नवराहि उसळून आपली बाजू मांडतो —

“ रांड-भांड ही सवरी झाली गवरी धुपें सदां ।
नित्य पारावर कुरकुर ऐकून जन हांसती गदगदा ।
उठून चावडी धांवून येते अवघा वेळ हा हुद्दा ।
नांव गांव वडिलांचा लौकिक उंच अब्रुच्या पदा ।
बळें चौघांनीं पदरीं बांधली नेऊन पहा एकदां ॥ ”
असें सांगून शेवटीं तो धमकी देतो–
‘ करून राहूं दुसरी, इचें नांव न घेऊं कदा ।
दर महिना देऊं चांदी मोजून इचा आमुचा हा मुद्दा ॥ ”

शेवटीं त्या दोघांची समजूत करून पाटील त्यांना घरीं पाठवितो. तो तरी दुसरें काय करणार ? नवरा-बायकोचें असेंच भांडण रंगवतांना एका कवनांत बायकोने आपल्या नवऱ्याविरुद्ध कशी तक्रार केली आहे पहा–

‘ फक्त हाळदीचा डाग लाविला केल्या दिवसापासून ।
चोळी लुगडे काय घेऊन शिणला खरें खोटें घ्या पुसून ।
सांड गांवामधीं फिरतो भांड रिकामटेकडा असून ।
इकडील काडी तिकडे करीना घर कसें चालेल बसून ।
हातांत भाला म्हणे जेऊं घाला उलटाच मजवर रुसून ।
तीन तुकड्यांचें एक मुंडासें तिनदा बांधी कसून ।
डावें कानावर ठेवून पागोटे वर तीन पान खोचून ॥ ”

याहि कवनांत नवरा शेवटीं दुसरी तिसरी बायको करण्याची स्पष्ट धमकी देतो. पेशवाईअखेरच्या पोकळ दिमाखाचें व ऐतखाऊ वृत्तीचें गांवभर रिकाम्या सांडासारखे फिरावयाच्या वृत्तीचें हें चित्रसुद्धा मोठें मनोरंजक व तत्कालीन सुखासीन ऐदी वृत्तीची जाणीव करून देणारें आहे.

पोकळ गप्पा मारून आपल्या बायकोला बनविणाऱ्या एका पळपुट्या शिपायाचें परशरामाने काढलेलें चित्र मोठें विनोदी आहे.



‘ लष्करचें काय सुख सांगू ग तुज नारी ।
तुझे प्रीतिस्तव तें सोडून राहिलों घरीं ॥ ”

असें सांगून आपल्या पराक्रमाचें तो खोटेंच रसभरित वर्णन करतो. ‘ दौलत मिळविली भर उंच दोन चार ’ असें सांगून ‘ केली गर्दी भिलानें नेली लुटून सारी ’ अशाहि थापा देतो. बिचाऱ्या बायकोला तें खरें वाटतें. ती त्याचें मोठें कौतुक करते– उटणें, तेल वगैरे लावून त्याला आंघोळ घालते. त्यावेळीं त्याच्या माथ्याला टक्कल, दोन्ही खांद्याला घट्टे, हात वाकडा पाहून तिने साहजिकच चौकशी केली. त्यावर पराक्रमाचें खोटेंच वर्णन करून खांद्यावर बंदुका धरून खांद्याला कसे घट्टे पडले, गोळ्यांच्या पावसांत पराक्रमाची शर्थ केली, इत्यादि गोष्टी त्याने तिला ऐकविल्या, त्यामुळे नार मनामध्यें खूपच हर्षित झाली. पण तेवढ्यांत त्याच लष्करामधला त्याला जामीन राहिलेला एक शिपाई त्याला शोधीत आला. त्याने मुळापासून सर्व वार्ता तिला सांगितली. तो म्हणाला—

‘ माथ्याला टक्कल पडलें मोळी वहातां ।
खांद्याला पडले घट्टे बादलें वाहतां ।
बादल्याची मोडली काटी याचें हाता ।
याला सकाळीं उठून मारती लाता ।’

हें सर्व वर्णन ऐकल्यावर त्या नारीची स्थिति कशी झाली असेल, याची कल्पनाच करणें बरें.

‘ सतीच्या कथें ’ त सतीची नक्कल करूं पाहणाऱ्या एका चवचाल स्त्रीला कशी अद्दल घडली याचें मोठें सुरेख चित्र रंगविलें आहे. सद्भावाने पतीची सेवा करणाऱ्या एका स्त्रीचें चित्र प्रथम रंगविलें आहे. ती तांदूळ कांडत असतां तिच्या, नवऱ्याने पाणी मागितलें. त्याबरोबर वर उचललेलें मुसळ तसेंच सोडून देऊन ती उठली, आणि आश्चर्य म्हणजे तें मुसळ जसेंच्या तसें अधांत्री राहिलें ! एका शेजारणीने तें पाहिलें व त्या चमत्काराचें गुह्य तिला विचारलें. ‘ पतिव्रतापण केलास तर तूंहि अशी होशील ’ हें तिचें उत्तर ऐकून शेजारीण घरी गेली. आणि आज–पासून मी पतिव्रता झालें असें तिने पतीजवळ जाहीर केले. एक महिन्यांनंतर ‘ मी आतां कांडायला बसतें. तुम्ही माझ्याजवळ पाणी मागा ’ असे तिने नवऱ्याला सांगीतले. नवऱ्याने तसें करतांच तिने मुसळ अधांत्री सोडून दिलें. पण तें अधांत्री राहण्याऐवजी तिच्या कपाळावर येऊन आदळलें व कपाळाला चांगलीच खोच पडली. त्यावर “ तुजसारख्या बाष्कळ म्हणूनी मुसळानें ताडीलें ” असा नवऱ्यानें दिलेला शेरा वाचकांनासुद्धा तितकाच पटण्यासारखा आहे.

अशा दुधड नारीचें आणखीहि एक चित्र परशरामाने मोठें चांगले रंगविले आहे. नवऱ्याला वेगळे निघा म्हणून शिकवणारी ही दुघड नार नवऱ्याच्या मनांत भावांविषयी नाही नाही तें भरवतें व भावाजवळ वाटणी मागून वेगळे निघण्याचा आग्रह धरते. तिच्या हट्टाने वेगळे निघालेल्या त्या नवऱ्याच्या संसाराचें चित्र परशरामाने अतिशय परिणामकारक रंगविले आहे. शेवटीं कवीने काढलेला—

‘ बायकोच्या अकलेने झाली थोरथोरांची दशा
ढोर वेगळे सोडुनी निघती मायबापाची आशा ॥

हा निष्कर्ष आजहि फारसा खोटा ठरलेला नाही. नवऱ्याला वेगळे निघावयास शिकविणाऱ्या दुघड नारीचीं चित्रें आजहि कांही कमी दिसतात, असें नाही.

‘ तूं मरशीलतर तर मी सती निघेन ’ म्हणून बायकोला अगदी निश्चयाने सांगणारा पत्नीनिष्ठ नवराहि परशरामाने एका कवनांत रंगविला आहे. मात्र या कवनांतील त्याची नायिका ही अधिक चतुर असते. नवऱ्याची परीक्षा पहाण्यासाठी ती मेल्याचें सोंग घेते, आणि ‘ सती ’ जाण्याऐवजी नवऱ्याने भलतेच चाळे सुरूं केलेले पाहून त्याची चांगलीच कानउघाडणी करते.

परशरामाच्या या सर्व कवनांत तत्कालीन सामाजिक जीवनांतील विसंगतीचें चित्रण अतिशय विनोदी रीतीने केलेलें आढळले. तत्कालीन जीवनाचें यथार्थ दर्शन हीं चित्रें घडवितात. सूक्ष्म अवलोकन, विनोद दृष्टि आणि सहानभूति यामुळे हीं सर्व कवनें मोठी रम्य झालीं आहेत.

शाहिरांच्या कांही पौराणिक कवनांतून उच्च प्रतीचा विनोद आढळतो. प्रभाकरच्या ‘ लक्ष्मी–पार्वती ’ संवादांतील विनोद मोठा मार्मिक आहे. दोन

बायकांनी आपल्या नवऱ्याचा श्रेष्ठपणा प्रस्थापित करण्यासाठी दुसरीच्या नवऱ्याचें उणें काढावें, असा प्रकार या कवनांत आहे. दोघींचेहि पति श्रेष्ठ, पण शंकराचें वर्णन करतांना लक्ष्मी 'शंकर भणंग भिकारी जिवंत पहातां भूत' असें म्हणते तर पार्वती विष्णूची 'वक्रदन्त शिशुपाल कीटका कपटे मर्दुन बका। प्रताप मुखे वर्णितां कशा भाळल्यात गोरक्षका' अशी संभावना करते. अर्थात् शेवटीं एकस्वरुप 'शिव–विष्णू, लक्ष्मी–गौरी एक स्मरा' अशी तडजोड करण्यांत येते. पण, लक्ष्मी–पार्वतीचें हें भांडण एकमेकीच्या उखाळ्यापाखाळ्या काढणाऱ्या शेजारणीच्या भांडण्याप्रमाणे प्रभाकरने रंगविले आहे, यांत शंका नाही. होनाजीच्या 'भाळलोचना नागभूषणा' या लावणींत असाच विनोद आहे. शंकराच्या जटेंत असणाऱ्या गंगेविषयी पार्वतीला असूया निर्माण झाली आहे व ती त्याला तिच्याबद्दल विचारित आहे व शंकर कांहीतरी उत्तर देऊन तिला लपविण्याचा प्रयत्न करीत आहे. यामधील संवादांत–पार्वतीच्या शंका व शंकराची उत्तर देतांना उडालेली तारांबळ होनाजीने चांगली वर्णन केली आहे. प्रासंगिक विनोदाचा नमुना म्हणून होनाजीच्या श्रीकृष्णतुला, या लावणीकडे बोट दाखविता येईल. सत्यभामेने श्रीकृष्णाचें नारदाला दान केले व नारद कृष्णाला आपल्याबरोबर घेऊन चालला. त्यावेळीं कृष्णाच्या अष्टनायिकांमधे उडालेली तारांबळ, श्रीकृष्णाची सुवर्णतुला करण्याचा प्रसंग, त्याप्रसंगीं सत्यभामेचें झालेलें गर्वहरण या सर्वांचें चित्रण होनाजीने चांगलें केले आहे. अनंतफंदीची 'चंद्रावळ' ही लावणी अशी प्रासंगिक विनोदाच्या स्वरूपाची आहे. राहीचें स्वरूप घेऊन श्रीकृष्णाने चंद्रावळीला फसविल्याची कथा अनंतफंदीने अतिशय मनोरंजक रीतीने सांगीतली आहे. रामजोशीच्या होरीच्या वर्णनांतहि अशीच फसवणूक आहे. त्यांत राधेने कृष्णाचें स्वरूप घेतलें आहे व कृष्णाने राधेचें स्वरूप घेतलें आहे, आणि सर्व गोपी राधेलाच कृष्ण समजून क्रीडा करीत आहेत. श्रीकृष्णाविरुद्ध गोपींच्या लाडिक तक्रारी रंगविण्यांत रामजोशींनी अनेक ठिकाणीं प्रासंगिक विनोद निर्माण केला आहे.

कल्पनानिष्ठ आणि शब्दनिष्ठ विनोद मात्र शाहिरी वाङ्मयांत फार थोडा आढळतो. कलगीतुरा, या काव्यप्रकारांत शाहिरांचा कल्पनाविलास आढळतो–पण त्यांत विनोदापेक्षा अध्यात्माचा भागच जास्त आहे. त्यामध्यें प्रतिपक्षाला कूटप्रश्न टाकून निरूत्तर करण्यांत शाहिरांच्या प्रतिभेचें कौशल्य दिसतें. श्लिष्ट शब्दरचनेची योजना करून चमत्कृति व विनोद निर्माण करण्यांत 'छेकापन्हुतींत' रामजोशींनी बरेंच यश मिळविलें आहे. यांत प्रथम राधिका व तिची सखी यांचा संवाद आहे. द्व्यर्थी शब्द वापरून ती आपल्या कृष्णावरील प्रेमाच्या खुणा आपल्या सखीला सांगत आहे व सखीने तो 'नंदाचा मूल काय गे सांग कन्हया हरी', असा प्रश्न विचारल्यावर ती मिष्किलपणे हुलकावणी देत आहे. उदाहरणार्थ खालील ओळी पहा !

'गुणवंत कुचावरी लोळे अति शोभला।'
'तो कृष्ण काय ?' नव्हे गे हार कळेना तुला।'
'बाई आंगमर्दनी अति सुखकर वाटला।'
'तो कृष्ण काय ? नव्हे ग कर दूतीचा भला।'
'मज शीतळ करितो श्रमी होऊनिया भला।'
'तो कृष्ण काय ?' 'नव्हे गे व्यसन सुवंशातील॥'
यापरी निजसंतोष वर्णिती पुसता यदुनायका।
लोपवी मुरलीच्या गायका॥

श्रीकृष्णहि आपल्या मित्राला राधेवरील प्रेमाच्या खुणा सांगत अशीच हुलकावणी देत आहे. उदाहरणार्थ खालील संवाद पहा–

'कंठी लपटुनि सदा असावी सुभगा गुणशालिनी।
वाटते पुष्पवटी शोभिनी।'
'वृषभानूची सुता काय ती राधा लिकुचस्तमी ?'
'नव्हे रे माळ आटवली मनीं।'
'अधर चुंबुनी वंशसंभवा लालस मधुरस्वनी
असावी मुखासी मुख लावुनी।'
'वृषभानूची सुता काय ती राधा लिकुचस्तनी ?'
नव्हे रे मुरली जगमोहिनी॥

चमत्कृतीच्या दृष्टीने ही लावणी चांगली आहे, शब्दनिष्ठ व कल्पनानिष्ठ विनोदाचें हें एक उदाहरण म्हणून दाखविता येईल. कल्पनानिष्ठ विनोदाचें आणखी एक उदाहरण द्यावयाचें झाल्यस परशरामाच्या



'काळी–गोरीचें भांडण' या लावणीकडे बोट दाखविता येईल. काळी आणि गोरी दोघीहि आपला श्रेष्ठपणा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात व त्यासाठी निरनिराळे श्रेष्ठपणाचे पुरावे देतात. या दोघींचें भांडण शेवटीं सांवळी सोडविते. यांतहि कल्पनाचमत्कृति आहे.

'चंद्राचें चांदणे शीतल का उष्ण' असें विचारणाऱ्या सगनच्या नायिकेचें चातुर्यहि त्याच्या कल्पनाविलासाची साक्ष देते.

शृंगाररसपर लावण्यांतहि क्वचित् विनोदाचा शिडकाव दिलेला आढळतो. विशेषतः ज्या ठिकाणीं सजण व साजणी यांचे चतुर संवाद आहेत, अशा ठिकाणीं शाहीरांची विनोदबुद्धी क्वचित् जागृत झालेली आढळते. त्याचप्रमाणे कांही कांही लावण्यांतून ज्या चमत्कृतिपूर्ण कथा वर्णन केल्या आहेत. त्यांतहि विनोदाची बैठक आढळते, सवतीसवतीचा कज्जा लावून गमंत पहाणारा पति किंवा 'नावडतीचें मीठ आळणी' म्हणून नायिकेने दुसरीकडे रात्र क्रमणाऱ्या साजणाची केलेली कानउघाडणी किंवा मुशाफिराचे आणि त्याच्यावर प्रेम बसलेल्या साजणीचे होणारे चतुर व सांकेतिक संवाद अशासारख्या ठिकाणीं आढळणारा विनोदहि उल्लेखनीय आहे.

लावणीवाङ्मयामधील हास्यरसाचें स्वरूप हें असें आहे. अर्थात् हास्यरस हा लावणीवाङ्मयांतील मुख्य रस नाही, हें लक्षांत घेतले पाहिजे. मुख्य रस शृंगारच ! पण, त्याला पूरक असे किंवा स्वतंत्ररीत्या अनेक रस लावणीवाङ्मयांत येतात. त्यापैकी हास्यरस हा एक आहे. लावणीवाङ्मयांतील हास्यरस बराचसा सामाजिक विसंगतीवर आधारलेला आहे. त्यामुळे जेथे तो आढळतो तेथे शाहिरांची सूक्ष्म अवलोकनशक्ति आणि विनोददृष्टी प्रत्ययाला येते. उत्कट प्रणयभावना हाच लावणीवाङ्मयाचा आत्मा असल्याने वरवरच्या विसंगतीवर आधारलेला विनोद त्यांच्या कवनांत कमी प्रमाणांत सांपडावा हें स्वाभाविक आहे. पण जेथे तो आढळतो तेथे तो आपल्या मनाला आकृष्ट करतो, यांत मात्र शंका नाही.

———

विद्यार्थ्यांचें सर्वांत आवडतें ठिकाण—
मेसर्स विजय बुक डेपो, जळगांव
आमचेकडे :– कॉलेजचीं व शालेय क्रमिक पुस्तकें आणि गाईडस् व इतर सर्व प्रकारचीं पुस्तकें.
—तसेंच—
पॉलीटेक्नीक हायस्कूल व कॉलेज यांना लागणारी सर्व प्रकारची स्टेशनरी किफायत भावांत मिळेल.
विजय प्रकाशन
एस्. एस्. सी. इंग्लिश गाईड प्रकाशित झालें.
आगामी प्रकाशनें—
बी. ए. बी ; एस्सी. जनरल इंग्लीशचें गाईड व इतर
मेसर्स विजय बुक डेपो, जळगांव.

# कॉलेजकन्या....!

ले.– प्रमोद पाटणकर
एस्. वाय्. बी. एस्सी.

[ वेळ– सकाळचे ११ वाजले आहेत. कॉलेजचे बहुतेक वर्ग सुरूं झाले आहेत. स्थळ– लेडीज रुम. दोन मुली टेबल टेनिस खेळत आहेत. ]

पहिली– अग मंदे, लोंढेने म्हणे यंदा इंटर–कॉलेजिएट् फारच गाजवलं. साऱ्या अमळनेरने तिचा उदोउदो केला. उद्या तिचा सत्कार होणार आहे.

मंदा– हूः ! मोरे शान करते. मागल्या वर्षी आमच्या ताईने तर तिला चांगलाच डिफिट् दिला. लागोपाठ तीन गेम्स् दिल्या. मग बसली एवढंस तोंड करून ! पुढल्या वर्षी मीच जिरवीन बघ तिची. यंदा मी विशेष लक्षच दिलं नाहीं. नाही तर काय शामत होती तिची जिंकण्याची ? ( बॅट बाजूला ठेवत– ) चल बाई, सॉलिड् भूक लागली आहे. येतेस कॅन्टीनला ?

[ दोघी जातात ]

× × × ×

[ कांही मुली येतात. प्रत्येकीच्या हातांत प्रॅक्टीकल्सचें जर्नल् आहे. सगळ्याजणी कसल्या तरी काळजींत आहेत. ] .

एक मुलगी– काय विमल, किती ॲन्सर आलं ? ग्राफ आला का ? मी बाई कांहीच केलं नाहीं. अग काल किनई आमच्याकडे सानेबाई आल्या होत्या बसायला. म्हणून सगळंच राहिलं !

विमल– ( चष्मा सांवरत कण्हलेल्या स्वरांत ) मी पण बाई कांहीच केलं नाहीं. अग कालपासून सारखं डोकं दुखतय् माझं ! मग कसं करणार जर्नल् पूर्ण ?

( मध्येंच एका मुलीकडे कुतुहलाने पाहत– ) काय ग जया, साडी नवीन घेतली का ? छान आहे हं ! आमच्या मामींची पण अशीच आहे. पण कांही म्हण बाई, तुझ्यापेक्षा त्यांनाच जास्त शोभते. कारण त्या किनई तुझ्यापेक्षा जरा उजळ आहेत; शिवाय—

तिसरी मुलगी– ( रागानं खड्डयांत गेलं तुझं पुराण ! आधी जर्नल् पूर्ण करूं या. नाहो तर तो डेमॉन्स्ट्रेटर सरळ बाहेर हाकलेल. कांही म्हणा बाई, आमच्या रुईयाला नव्हता एवढा स्ट्रिक्टपणा. असं वाटतं उगीच आलें बॉम्बे सोडून इथल्या कॉलेजला !

पहिली मुलगी– ( चिडून ) मारे फुशारकी मारते बॉम्बेची. एवढं होतं तर कशाला इकडे तडफडलीस ? खरं म्हणजे बॉम्बेपेक्षा आमच्या पुण्याचंच स्टॅण्डर्ड हाय आहे ! हो किनई ग ? ( इतर मुली मानेनेच होकार देतात. )

जया– अहो बाईसाहेब, This is Poona University ! बॉम्बे नाही ! समजलं ? ( ती मुलगी पाय आपटीत निघून जाते ) ए प्रधान, तुझं दे बघूं जर्नल्. पूर्ण आहे नं ?

प्रधान– माझं बाई नेहमीच पूर्ण असतं ! विद्यार्थीनींनी नेहमी अगदी रेग्युलर असावं आणि . . . .

जया– ए, उगीच उपदेश करूं नकोस हं ! अग किनई, त्या प्रकाश नाडकर्णींचं जुनं जर्नल् आणलं आहे. अगदी त्याचीच कॉपी करते. काय ग, खरं की नाही ? ( सगळ्या मुली हंसतात )

पहिली मुलगी– अग जाऊं द्या, जर्नल् कोणाचंहि असलं तरी काय ? आपल्याला कामाशी मतलब !

[ सगळ्या आपापलें जर्नल पूर्ण करूं लागतात. तेवढ्यांत पहिला तास संपतो. सगळ्या घाईघाईने पुस्तकें आवरून वर्गांकडे जातात. ]

× × × ×

[ रुमालाने घाम पुसत पुसत एक पंजाबी आणि दोन महाराष्ट्रीयन मुली येतात. चेहऱ्यावर समाधान नाही. ]

पंजाबी मुलगी– क्यो लिला कैसा था लेक्चर ?

लिला– O hell ! It was so boring—— काय कुंदा, तुला कसं वाटलं ?

कुंदा– छे बाई, वैताग आला नुसता ! यंदा मी ड्रॉप घ्यायचं ठरवलं आहे. अग मागचे सगळे विषय पाठीशी आहेत आणि आता हें ऑनर्सचं इंग्लिश ! डोकं फिरायला लागलय बघ नुसतं !

लिला– कमाल आहे बाई तुझी ! सगळे विषय राहिलेत ? आमचं नाही बाई तसं– क्यों सिन्हा ? ( पंजाबी मुलगी हंसते. ) पण काय ग कुंदे, मग किती वर्षं काढणार कॉलेजला ?



कुंदा– ( रागाने ) बाईसाहेब, तो माझा खाजगी प्रश्न आहे. अगदी म्हातारी होईपर्यंत राहीन कॉलेजला ! तूं कोण मला बोलणारी ? फी माझे बाबा भरतात, कांही तुझे.... ..

लिला– ( गर्वाने ) कुंदे, फार झालं हं ! तूं कोणाशी बोलत आहेस माहित आहे का ? मिस् लिला आडमुठे बी. ए. फर्स्ट क्लासशी ! समजलं ? सिन्हा लेट अस् डिस्कस् गार्डिनरस् स्टाईल् ! ( कुंदा जाते तिला उद्देशून ) ( सिन्हा, ये सी. के. पी. लोग ऐसेही होते है– खुदको बहुत बडे समझते है– बडे चालाकभी है । )

[ लिला आणि सिन्हा वह्या उघडून चर्चा करूं लागतात. ]

[ वेळ– दुपारचे २-१५ वाजले आहेत. मधली सुटी झाली आहे मुली घोळक्याघोळक्याने उभ्या आहेत कांही मुलं वऱ्हांड्यांत उभी राहून लेडीज रूमचें निरीक्षण करीत आहेत. दोन मुलं समोरून जातात. मुलींच्या एका घोळक्याचं तिकडे लक्ष जातं. त्यांची आपापसांत कुजबुज सुरूं होते. ]

एक मुलगी– [ इतर मुलींना ] अग, हाच हं सुलभाचा भाऊ ! आमच्या वर्गांतला स्कॉलर हो ! यंदाच आला आहे या कॉलेजला ! अग परवा किनई आपटे सरांनी त्याला स्कूटरवर 'लिफ्ट' दिली. आणि जोशी सरांच्या घरीसुद्धा जातो. म्हणतात बाई, तो कवितासुद्धा करतो. आणि त्याचं अक्षर तर इतकं सुरेख आहे. हें पहा. ( सगळ्यांना एक वही उघडून दाखवते )

इतर मुली– अय्या खरचं !

एक मुलगी– मला बाई, असचं अक्षर आवडतं ! काय ग, शोभा, पण तुझा विचार तरी काय आहे ? बाकी मोठी नशिबवान् आहेस हं ! अग, आमच्या वर्गांतील तो सुरेश. वही मागितली तर असा कांही कधीसुद्धा वही देत नाही. म्हटलं, बच्चमजी, मस्कासुद्धा महाग झालाय् हल्ली !

दुसरी मुलगी काय ग शोभा, सुलभाचा भाऊ तुझ्याशी होऊन बोलला का ?

शोभा– तसं नव्हे ग ! पण— ( लाजते )

इतर मुली– शोभे, पार्टी पाहिजे हं !

एक मुलगी– वुई वॉन्ट— .

इतर मुली– पार्टी !

[ सगळ्या कॅन्टीनकडे जातात. ]

× × × ×

[ दोन मुली आरशापुढे उभ्या राहून पावडर लावीत आहेत. ]

पहिली– ज्योति, आता बाई उद्यापासून दुसरी पावडर आणूं ! कंटाळा आला हिचा. अग, हल्ली " ब्युटी " म्हणून एक नवीनच पावडर निघाली आहे. म्हणतात, सकाळीं लावली कीं संध्याकाळपर्यंत टिकते. आणि वास इतका सुरेख आहे. अग, बेबी नंदा म्हणे हल्ली तीच वापरते.

ज्योति– अय्या हो ? मग तीच आणूं हं ! मला किनई बाई, चेहरा नेहमी टवटवीत हवा असतो. खरंच, फेस इज् द मिरर ऑफ् अवर माईन्ड !

पहिली– पण काय ग, सुलभाच्या भावाला भेटलीस की नाही ?

ज्योति– हो, फार मनमोकळा आहे ! कां कुणास ठाऊक बाई, आपल्याला तो फार नांवाजतो ! काय ग, सबंध कॉलेजमध्यें आपल्याला कोणीच चांगलं म्हणत नाही; हाच मात्र आपली बाजू घेतो हं !

पहिली– बाईसाहेब, हा निसर्गाचा नियम आहे. चांगल्याला सगळं चांगलंच वाटतं.

ज्योति– अग हो, यंदा गॅदरिंगला तो स्वतःच एक नाटक बसवणार आहे. ए, आपण त्याच्या नाटकांत काम करूंच हं ! मला त्या आडमुठेची चांगली जिरवायची आहे. आम्हाला हंसते काय ? तरी बरं, सदाकदा बडबडतच असते.

पहिली– नाहीतर काय ! अग सकाळीं तर सगळे सर होते बसला; आणि ही बया आपलचं पुराण चालवत होती. तेंहि कांही हळूं नाही. अगदी मोठमोठ्यानी !

[ " शाबास, शाबास, " असा आवाज येतो. कांही मुली एका मुलीची पाठ थोपटत येतात ]

एक मुलगी– ए धारेश्वर कॉन्ग्रॅच्यूलेशन्स हं ! बाकी कॉलेजचं नांव काढलंस ! [ बाजूला बसलेल्या एका मुलीला ] अहो मिस् रानडे, पाहिलंत. असं आहे आमचं जळगांव. नाहीतर तुमचं पुणं. हूः ! म्हटलं बाईसाहेब,

वक्तृत्वस्पर्धा जिंकायला आमची धरेश्वरच हवी, कांही रानडे नको.

मिस् रानडे– [ तोऱ्यांत ] त्यांत कांही नवल नाहीं मोठसं. पाहूं नं, पुढल्या वर्षी कोण बक्षीस घेतय् तें ! कांही झालं तरी मी एस्. पी. चं पाणी प्यायलेय्...

एक मुलगी– अहो एस्. पी. चं वाल्या, जा न पुन्हा पुण्याला. तेथे तर कुणी विचारीत नव्हतं म्हणून तर येथे आल्या ! मारे आम्हांला ज्ञान शिकवते. तरी बरं, अजून एफ्. वाय्. चं लॉजिक राहिलय् !

[ घंटा होते. सुटी संपते. मुली पांगतात. ]

× × ×

[ चवथा तास संपतो. ३–४ मुली चर्चा करत असतात ]

एक मुलगी– ए कांही म्हण बाई, आज सर जें बोलले, तें अगदी कुणालाहि सहन होणार नाही ! नाही का ? उद्या अशी काढीन की नाही. आज बाबांना सगळं विचारून ठेवीन !

दुसरी मुलगी– हो बाई, असंच करूंया. मी सुद्धा आमच्या दादाच्या नोट्स् वाचून येईन ( तिसरीला ) ए, तूं पण तयारी करून ये हं ! मग बघूं या काय होतय तें ! अय्या खरचं, एक सांगायचंच राहिलं. अग किनई, ती राहतेकर आहे नं. तिची चांगली काढली. मारे सौभाग्याच्या बड्या बड्या बाता करत होती. तरी बरं, स्वतः कपाळाला गंधाचा थेंबसुद्धा लावत नाही ! म्हणते कशी ही माझी फॅशन आहे !

तिसरी मुलगी– ए बाई, तें राहूं द्या बाजूला ! आता घरीं जाऊं या. आज किनई आमच्या दादाच्या मुलीचं बारसं आहे. तुम्ही या हं घरीं ! [ सगळ्या जातात. ]

× × ×

[ वेळ– संध्याकाळचे ५ वाजलेत. आपापल्या सायकली घेऊन कांही मुली घरीं जात आहेत. बहुतेक जोडी-जोडींतच आहेत. तोंडावर दिवसभराचा शीण आहे. ]

एक मुलगी– अग बिंबा, आज किनई, त्या पाटीलची खूप टर उडाली ! मारे पहिल्या बाकावर बसला होता. आणि गणिताच्या तासाला ओम् फस् ! बाकी चांगलीच अद्दल घडली बेट्याला ! आम्हाला हंसतो काय ?

बिंबा– मला तर बाई, आज खूप कंटाळा आला होता. त्यांतून एकॉनॉमिक्स् होतं आज ! सर खूप छान शिकवतात ग, पण मेलं डोक्यांतच उतरत नाही ! सगळं करून पाहिलं. गाईडस् घेतलीं, ट्यूशनसुद्धा लावली, पण माझी मेली तीच रड ! आता नुसती घोकंपट्टी करायची. जें होईल तें होवो !

पहिली मुलगी– (एका मुलाला पाहून) अग बिंबा, तो पाहिलास का चौधरी ? काय पण चालतो आहे. स्वतःला अगदी देवानंद समजतो. तरी बरं आजारी पडला म्हणजे आमच्याच बाबांकडून औषध नेतो.

बिंबा– अग, तुला माहित नाही का ? मागे विदाऊट लाईट साकयल चालवली तेव्हा त्याला पकडलं होतं पोलीसांनी ! शेवटीं आमच्या बाबांनी तर सोडवलं त्याला ! आता मारे माझ्यापुढे मान ताठ करून चालतो ! हूंः ! ए, पण उद्यांच्या सुटीचं काय ? पिक्चरला जाऊं या ! कुठचा पाह्यचा मराठी, इंग्लिश की हिंदी ?

पहिली मुलगी– हिंदीच बघूं बाई, कारण मराठी हिरो रड्या रमेश देव पाहून मी अगदी कंटाळलें आहे. आणि इंग्लिश तर डोक्यावरूनच जातं ! आपला हिंदी बरा !

बिंबा– मग ये हं घरीं, सकाळपासूनच ये म्हणजे खूप मजा करूं. माझी ताई पण कालच आली आहे नागपुराहून ! [ दोघी जातात ]

[ वेळ– संध्याकाळचे ६ वाजले आहेत. लेडिजरूम बंद झालं आहे. ]

---



# मी....

ले.– कु. आशा जोशी
प्रथम वर्ष, बी. ए.

खरं म्हणजे मला कांहीच लिहायचं नाही. लिहावं किंवा कांहो करावं ही माझी वृत्तीच नाही. खावं, मैत्रिणीबरोबर फिरावं, वाचावं, झोपा काढाव्या ह्या आदर्श दिनचर्येंतून वेळ मिळेल तसाच आणि तेवढाच अभ्यास. अभ्यास करायचा असतो ही कल्पनाहि मला असह्य, जीवघेणी वाटते. पण मार्क कमी मिळाले कीं, आई–वडील ओरडतात. भावंडें हिणवतात. मैत्रिणी उगीचच काळजी दाखवत विचारतात, " असं काय करतेस ग ? नीट कर ना अभ्यास मनापासून. अशानं कसं व्हायचं तुझं ? " अगदी हाच माझा पण प्रश्न असतो. पण इतक्या दिवसांपासून माझंच मला जिथे उत्तर सांपडत नाही तिथे ... !

माझ्या आळशीपणाची मीच कीव करतें. इतके दिवस स्वतःला गायलेल्या ओव्या आतां शिव्या वाटूं लागतात. डोळ्यांपुढे वेडेवाकडे अंगविक्षेप करीत नाचतात. माझी ही टवाळी मलाच बघवत नाही. मी ठरवतें कांहीतरी करायचं. हा संथ जीवनक्रम सोडून द्यायचा. आईला–वडिलांना खूप अभ्यास करून खूष ठेवायचं. मैत्रिणींना लागलेली काळजी दूर करायची. भावंडांना चकीत करून सोडायचं. असं कांहीतरी करायचं कीं सर्वांना वाटावं, " ही कांही दिसते तेवढी संथ नाही. "

मग मी कांहीतरी लिहूं लागतें. पण लिहायला लागलं कीं, वाचलेलंच आठवतं. कधी जी. ए. कुळकर्णींची कथा तर कधी कुठेतरी वाचलेल्या काव्यपंक्ति. मग मी माझं कपाट उघडतें. तिसऱ्या खणांतील डाव्या हाताची कादंबरी काढतें. पलंगावर पडून वाचत राहतें. संपली कीं ठिकाणीं ठेवतें. एक कागद काढतें. कादंबरीचें परीक्षण सुरूं होतें. चार सहा वाक्यें लिहिलीं जातात. कादंबरींतील अवतरणें कागदावर उतरतात. परीक्षण आणखी थोडं पुढे सरकतं. पण आतां कंटाळा आलेला असतो. फिरण्याची आवश्यकता वाटते. फिरून आलं कीं जेवण. मग झोप. दुसऱ्या दिवशीं उठल्यावर मनांत थोडी हुरहुर — वाया गेलेल्या दिवसाचं एकच क्षण सुतक ! आणि मग मी परत आपला नित्यक्रम सुरूं ठेवतें. असं कां होतय हें माझंच मला कळत नाही. पण एवढं खरं कीं, माझ्यांतच पूर्वीचा उत्साह आतां राहिला नाही. अभ्यासाच्या बाबतींत तर मुळींच नाही. सारं असमाधान चेहऱ्यावर खेळवीत मी कांहीतरी करण्याची इर्षा बाळगतें. उसनं अवसान आणून कंबर कसतें. पण कुणाचीहि टीका ऐकली कीं, माझ्या उत्साहावर विरजण पडतें. अशावेळीं मला मैत्रिणी आवडत नाहीत. घर आवडत नाही. आईची माया अपुरी-थिटी वाटते. मी त्यावेळीं बागेंत बसतें. बागेंत झाडाखालीं बसायला मला फार आवडतें.

अशीच पूर्वी एकदा मी बसलें होतें. वसंतऋतु झाडाझाडांतून पानापानांतून भरून ओसंडत होता. बागेंतील पिवळे–गुलाबी गुलाबाचे गेंद बहरले होते. फाटकाजवळचें गुलमोहोराचें झाड पालवलें होतें. पानोपानीं हिरव्या कळ्या तांबड्या गुच्छांनी लगडल्या होत्या. गुलमोहोराच्या त्या वृक्षावर सायलीची वेल चढली होती. त्याच्या खांद्यावर लडिवाळपणे विसावली होती तो वृक्षहि आपल्या तांबड्या गेंदांनी त्या मानसकन्येला गुदगुदल्या करीत होता. अंगअंग घुसळीत ती हसत होती. स्वःतचीं फुलं मुक्त हस्ताने उधळून देत आपल्या औदार्याचा डंका वाजवीत होती. इतक्यांत माझ्या अंगावर पिकुटलीं पानं गळून पडलीं. मी मान वर केली. आकाशचमेली " आसूं ढाळत " होती. तिच्या बुंध्यावर मी रेलून उभी राहिलें. हळूच गोंजारत विचारलं, " कां ग रडतेस ? " वारा आला. तिला हलवून गेला. मला वाटतें तिनं अस्पष्ट हुंदका दिला असावा. मग ती पुटपुटली, "तूं अगदी अननुभवी आहेस ग ! तुला काय सांगू आणि कसं सांगू ? माझा शरद ....." वाऱ्याची एक झुळूक आली. त्याच वेळीं आकाशचमेलीचा एक हुंदकाहि ऐकूं आला. वाईट वाटलं ! आता तर चैत्र चालूं होता. अजून पांच महिने ती विरहिणीचें जीवन जगणार होती. मी मनाशी ठरवलें, आश्विन येईसतोंवर रोज इथं यायचं. बसायचं. हिला हिचं दुःख विसरायला मदत करायची.

परवाच मी तिच्याकडे गेलें होतें. ६ महिन्यानंतर कार्तिकांतल्या त्या सकाळीं ती आकाशचमेली फुलली होती. आपली पांढरी शुभ्र पुष्पें हलवत-डोलवत शरदाशीं तिचं गुदगुंजन चालू होतं. मी गेल्यावर तिने माझ्यावर फुलें उधळली. त्या श्वेतपुष्पांची भेट देऊन तिनें मला हंसत निरोप दिला. घरीं येतांना उगीचच वाईट वाटलं. ऋणानुंबध सुटला म्हणून कीं, तिने आतिथ्य दाखविलं नाही म्हणून ?...... कळत नाही. कळणारहि नाही. कळवून घ्यायचा अट्टाहासहि करायचा नाही. देतांना द्यावं. मुक्तहस्ताने— मनांत कसलीहि इच्छा न ठेवतां द्यावं. मग आतां वाईट कां वाटतं ? संबंध सुटला तरी आठवणी असतात. स्मरणशक्ति आहे तोवर आठवणी आपली मृगया करणारच. त्या आठवणी आठवत, डोळ्यांपुढे साकार होतांना पाहिल्या कीं, वाटतं साऱ्या जगाला ओरडून विचारावं, " माझ्या हातून कांहीच होणार नव्हतं ना ? मग ? कसं झालं हें ? कुणी केलं ? " पण मी कांहीच करीत नाहीं. " आकाशचमेली माझी मैत्रिण आहे; " असं चुकूनहि घरांत म्हटलं कीं, सारे अशा काही विचित्र नजरेनें पहातात कीं, वाटतं—मला वेडच लागलंय.

आतां परीक्षा हातातोंडावर आलेली असते. तीन महिनेच राहिलेले असतात. तेवढा अभ्यास जर मी केला, तर नक्कीच पास होईन अशीच, इतरांप्रमाणे माझीहि खात्री असते. सहा-सात महिन्यांत पुस्तकं उघडलेलीं नसतात. आतां पुस्तकं बाहेर काढून प्रथम त्यांना मी छानशीं कव्हरें घालतें. साऱ्या पुस्तकांवर कव्हरें चढलीं कीं, मला बरं वाटतं. मग तास-दीडतास खपून सुंदर अक्षरांत त्यांवर नांवें कोरतें. बाजारांत जाऊन बरेचसे कागद, ऑफिसफाईल, वह्या, शाईची मोठी बाटली, " इंक-फिलर " वगैरे साहित्य जमल्यावर " वेळा-पत्रक " तयार होतं. पहाटे चार ते रात्रीं दहापर्यंत जास्तींत जास्त अभ्यास करायचा हें मी माझ्या मनाला शिकवतें. त्याला तें पटतंहि. मग अभ्यासेतर विषयांत लक्ष मुळीच न घालतां मी अभ्यास करण्याचा प्रयत्न करतें. मध्येंच वाटतं, आकाशचमेली काय करीत असेल आतां ! मार्गशीर्ष आला. तिचा शरद गेला असणार ! ती परत विरहिणीचें जीवन जगत असणार ! तिला माझी आठवण येत असेल का ? तिला कुणी सखी भेटली का ? कधी कधी मैत्रीणीची थट्टा जिव्हारी झोंबते—" ॲं हॅं ! काय पण तोरा ! अहो, असा अभ्यास नाही होत. दोन तीन आठवड्यांत एक अक्षरहि बोलल्या नाही तुम्ही तें ! " पण मी कुणाशींच न बोलतां अभ्यासांत मन एकाग्र करण्याचा विफल प्रयत्न करीत असतें. जिथे जाल तिथे " अभ्यासाला भरतं आलेलं दिसतय " अशी लोक टिंगल करीत असतात. त्यांच्या दुतोंडेपणाची चीड येते. वाटतं ह्या साऱ्यांना तीन महिन्यांची सक्तमजूरी व्हावी. किती त्रास द्यायचा एखाद्याला ! आम्ही ऐकून घेतों म्हणून !

दिवस भराभर जात असतात. " लोकांच्या मतें " माझा अभ्यास फार जोरदार चालू असतो. साऱ्यांना माझ्याबद्दल कौतुक वाटूं लागतें. " तशी ती फार चांगली आहे. एकदा मनावर घेतली ना कुठलीहि गोष्ट..." आई शेजारच्या काकूंना सांगत असते. पण माझं मला पटलेलं असतं कीं ही शुद्ध फसवेगिरी आहे. अभ्यास ५-६ तास टेबलासमोर खुर्चीवर बसणं म्हणजे अभ्यास नव्हे. चार वेळा एकच ओळ वाचूनहि एक शब्द देखील दिसत नाही. कानांत कांहीच शिरत नाही. मग डोक्यांत काय उतरणार ? मधून मधून मी चहा करून घेतें. त्यावेळीं वाटतं हें असं चहा पिण्यापेक्षा एका छोट्याशा छानशा बागेंत जाई, जुई, सायली चमेली चौघींना चारी बाजूंनी वर आणून सुंदरसा मांडव करावा. त्यांत छोटसं " राऊंड-टेबल " ठेवावं. तिथे चहा घ्यावा. पण सांगणार कोणाला ? आईला म्हणावं तर म्हणते, " आणि नाही का कांही वाटत ? आम्हाला नाही येत असले चोचले. चांगलं मिळालं तर ठीक. नाही तर आहेच आपलं रोजचं ! " वाटतं उगाच विषय काढतों आपण. सारे टोचून बोलतात. उणी-दुणी काढतात. वेडी समजून हेटाळणी करतात. मग मी परत अभ्यासांत मन रमवायचा प्रयत्न करतें. अट्टाहास करूनहि जमतच नाही. माझ्या असहायतेची मला जाणीव होते. " आपल्या हातून कांहीच व्हायचं नाही. " ह्या भावनेनं मी पुन्हा भारतें. ' कांही कांहीच व्हायचं नाही; कध्धी, कध्धी नाही ! " मला गरगरल्यासारखं वाटतं. टेबलावर ओठंगून मी उदास मनाने बसून राहातें. आणि अशीच केव्हा तरी झोप लागते.



जाग येते तेव्हा डोकं कमालीचं दुखत असतं. अभ्यास करणें जमतच नाही. मग मी परत एक केविलवाणा प्रयत्न करून पहातें. " सबंध आयुष्यांत कांहीच करतां येणार नाही. " ही कटु जाणीव मनाला टोंचत रहाते. आईची माया खोटी वाटूं लागते. मैत्रिणींच्या प्रेमाला— काळजीला अलिप्तपणाची झिलई चढते. भावंडाचा चिडविण्याचा वेग वाढतो. आईला काळजी वाटूं लागते— पोरीचं कसं व्हायचं ? वडिलांना वाटतं— कांही तरी इलाज करणं आवश्यक आहे. आजीला वाटतं— फाजील लाडाचे हे परिणाम. आकाशचमेलीची ओढ तीव्रतर होत जाते. मनावर संयम ठेवीत टेबलासमोर खुर्चीवर बसून मी तीन महिने काढतें. परीक्षा संपल्यावर एखाद्या वारा भरलेल्या वासराप्रमाणे माझें जीवन पूर्ववत् सुरू होतें. खाणें, पिणें, फिरणे, मैत्रिणी, वाचन झोप.

आणि अचानक जून उजाडतो. निकाल लागतो. अर्थात् माझाहि. आई-वडील चिडतात. " कार्टीला अभ्यास नको करायला. नुसतं हुंदडायला हवं. " मैत्रिणी दुरावतात. त्यांचीं क्षितीजें वाढलेलीं असतात मी मात्र माझी पायवाट सोडायला तयार नसतें. मला तें जमतच नाही " मला कांहीच करता येणार नाही. सबंध आयुष्य असंच जाणार. कांहीच न करतां " कानावर हात ठेवून खालच्या मानेनं मी बागेंत जातें.

मला पाहतांच आकाशचमेली दुरुनच आपलीं पिकुटलीं पानं खाली गाळते. तिला " आंसू ढाळतांना " पाहून मी हरखते. तिच्याबद्दल उगीचच आपुलकी·जवळीक वाटत राहते. भरकन् येऊन मी तिच्या खांद्यावर मान टेकतें. दोन अश्रु तिच्या बुंध्यावर पडतात. तिचा शरद दूर गेलेला असतो. वसंताची शोभा पहात त्रयस्थपणे ती स्वतःसाठी अश्रु ढाळते. मी जवळ जातांच तिला विचारतें, " तुला कळलं ? रिझल्ट लागला. किती वेगळ्या मार्गावरनं आपण एकत्र आलों ग ! " तिच्या बुंध्यावर हात टेकून मी आंसू ढाळत होतें. माझ्यासाठी आणि त्या विरहिणीसाठी ! तीहि आपलीं पिकुटलीं पानं गाळून मला दिलासा देत रडूं लागली.

त्या संध्याकाळीं दोघीजणी एकमेकीसाठी रडत दिलासा देत एकमेकींच्या जीवनांत मिसळून गेल्या. अभिन्न झाल्या. " आपल्या हातून कांहीच होणार नाही " ही मनांतली भावना डोळ्यातल्या अश्रूंनी धुऊन टाकली. मन आता स्वच्छ झालं होतं. उदासपणाचा मागमूसहि तेथे नव्हता.

---

जुनें तें सोनें !
जळगांवांतील सर्वांत जुनें व अनुभविक दुकान
★ देवरे टेलरिंग फर्म ★
( झांशीच्या राणीच्या पुतळ्यासमोर ) नवी पेठ, जळगांव.
लेडिज् ॲन्ड जेन्टस स्पेशॅलिस्ट
सर्व प्रकारचे कोट, पॅन्ट, मनीला, शर्ट, बुशशर्ट साठी
—० तसेंच ०—
मोटारचे हूड, कुशिंग व सोफा-सेट जुने अगर नवीन तयार करून मिळतील.
—प्रो. व्ही. एम् देवरे

# पांढरपेशी विरामचिन्हें

( कल्पना- गोविंदाग्रजकृत ' विरामचिन्हें ' )

जेव्हा कारकुनी करून बरवी खोलीहि मी शोधिली
फेऱ्या घालिति भोंवती वधुपिते ' सांगून ' येती मुली
एकाला बघुनी जरी विटत मी दूजीस अर्पी मन
आशा ' स्वल्पच ' होत की घडतसे हुंड्याहुनी भांडण ॥१॥

ही रंगास कशी, कसें कुल, कुण्या प्रांतात ही राहते ?
बोला ती शिकली किती कि नुसती ऐटींत वा राहते
ऐशा या विविधप्रकार वधुना मत्सोयरे पाहत
तेव्हा झोप उडोनी जीवन दिसें जै ' प्रश्नचिन्हांकित ' ॥२॥

अर्धांगी नटुनी जशी कुलवधू येई अखेरीं घरीं
अर्पी मी मम सर्वकांही तिजला घेवोनि डोक्यावरी
रोज प्रातःकालीं चहा मधुर जो भ्रुभंग ही लाजरा
' उद्गारा ' मग काढितो सहजची ' वाः मी भला नोवरा ! ' ॥३॥

झालें व्यापक तें कुटुंब पुढती चंदू, शशी, रेवती
आणि त्यांत भरील भार पुरती ये त्यांचि ती मावशी
साड्या, कापड, दूध, पिक्चर कधी पैसा इथे संपत
पैशाचें बिघडे ' बजेट ' बघुनी मी होय ' अर्ध ' मृत ॥४॥

आशा प्रेम नि ऑफिसांत बढती यांचा उरे मोह ना
तोही मी ढकलीतसे शकट हा याला कधी शांति ना
माझा मात्र भविष्यकाळ मजला वाटे बरा पाहतां
पुत्रा ' थोर ' करीन तोंवरि कशी लाभेल ती ' पूर्ण ' ता ॥५॥

—र. धों. राजहंस
प. पू. कलाविभाग



# अहवाल

## १९६२–६३

## कलामंडळ

या वर्षी दि. १५ ऑगस्ट रोजीं कलामंडळाचें उद्घाटन होऊन त्या वेळीं करमणुकीचे विविध कार्यक्रम सादर करण्यांत आले. नोव्हेंबरमध्यें ' I 'll cry tomorrow ' हा मेट्रोचा उत्कृष्ट बोलपट मंडळाच्या सदस्यांना दाखविण्यांत आला. डिसेंबरमध्यें ' काव्य-गायनस्पर्धा ' घेण्यांत आली. जानेवारी १९६३ मध्यें श्री. अमीचंद शर्मा यांच्या व्हायोलिन वादनाचा कार्यक्रम सादर केला गेला. २६ जानेवारी ६३ रोजीं विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचें प्रदर्शन भरवण्यांत आलें. या कलाप्रदर्शनांतील श्री. हिरोडकर या विद्यार्थ्याचें विविध कलाकृतींतील नैपुण्य विलोभनीय होतें. श्री. केळकर, श्री. बढे, श्री. ताम्हाने या कलावंतांनी परीक्षक म्हणून कलाप्रदर्शनास मार्गदर्शन करून मंडळास उपकृत केलें.

या वर्षी ' कलाविश्व ' ही वैशिष्ट्यपूर्ण योजना सुरूं करण्यांत आली. या योजनेप्रमाणे आमच्या महाविद्यालयांतील कलावंतांच्या कलाकृति दर आठवड्याच्या सुरवातीस शोकेसमध्ये ठेवण्यांत येत होत्या. कलाकृतींचें योग्य रसग्रहण व्हावे यासाठी बरूर तें कलाकृतींचें वर्णन देण्यांत येत होतें. या ' कलाविश्वांत ' श्री. मधु पाटील यांनी सातत्याने भाग घेतला. इतरहि कलावंतानी मनःपूर्वक भाग घेऊन ही योजना यशस्वी केली. कु. चित्रा देशमुख हिचेंहि सहकार्य वेळोवेळीं मिळालें.

शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक तेवढेच कार्यक्रम यावर्षी करावे व सदस्य वर्गणीपैकीं राहिलेली रकम संरक्षणनिधीस देण्यांत यावी असें कलामंडळाने सर्वानुमतें ठरवलें. त्याप्रमाणे रु. १०१ नोव्हेंबरमध्यें देण्यांत आले. वर्षअखेरीस राहिलेली सर्व रकम दिली जाईल.

कलामंडळाचें कार्य अधिक जोमाने पुढे चालूं राहील अशी उमेद वाटते.

प्रा. ग. ह. तारळेकर
चेअरमन

सौ. नूरजहान तडवी
विद्यार्थिनी प्रतिनिधि

प्र. ज. देशमुख
चिटणीस

भीमसिंग मोरे
उपचिटणीस

---

## सेवापथक

सेवा पथकाच्या कामाची सुरवात जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत झाली. श्री. तारळेकर, श्री नाडकर्णी, कु. पाटणकर, कु. राणे व श्री. कोठारी हे प्राध्यापक-वर्गांपैकी आणि २४ विद्यार्थी यांत भाग घेणारे होते. दरवेळी १८ ते २० विद्यार्थी नियमीतपणे हजर असत. खड्डे तयार करून झाडें लावणें, सफाई व रस्त्यांची दुरुस्ती हीं श्रमाचीं कामें केलीं. कांही सामुदायिक वाचन व चर्चा झाली. मा. भाऊसाहेब रानडे व श्री. दिवाकर आगाशे यांनी भेटी देऊन चर्चा केली व मार्गदर्शन केलें.

प्रा. उ. भा. कोठारी

---

# मराठी वाङ्मय मंडळ

मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यास ह्या वर्षी २० जुलै ६२ रोजीं कै. वा. म जोशी स्मृतिदिनीं प्रारंभ झाला. ' कादंबरीकार वा. म. जोशी ' ह्या विषयावर कु. सरला तांबोळी ह्या विद्यार्थिनीचें निबंधवाचन झालें. अध्यक्षस्थानीं प्रा. म. ना. अदवंत होते. कार्यक्रमाच्या शेवटीं कु. रंजनी पोतनीस यांनी आभार मानले.

दि. ११ ऑगस्ट ६२ रोजीं प्रॉ. डॉ. वि. भि. कोलते यांचें ' महाराष्ट्र आणि मराठी भाषा ' विषयावर महत्त्वपूर्ण भाषण झाले. अध्यक्ष प्राचार्य महाजन होते.

दि. १७ नोव्हेंबर ६२ रोजीं रुपारेल कॉलेज (मुंबई) चे प्राचार्य डॉ. सुरू यांचें त्यांनीच लिहिलेल्या " दीप मालवूं नकोरे " या नाटकावर सुंदर भाषण झालें. अध्यक्षस्थानीं प्राचार्य महाजन होते. कु. विद्या देशपांडे यांनी आभारप्रदर्शन केलें.

दि. २७ नोव्हेंबर ६२ रोजीं पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधील इंग्रजीचे प्रा. ग. प्र. प्रधान यांचें प्राचार्य महाजन यांच्या अध्यक्षतेखालीं " साहित्य आणि समरभूमि " या विषयावर व्याख्यान झालें. कु. मीनाक्षी पळसुले यांनी आभार मानले.

दि. २९ नोव्हेंबर ६२ रोजीं कै. डॉ. माधवराव पटवर्धन स्मृतिदिन साजरा करण्यांत आला. त्यावेळीं " माधव ज्युलियन यांचीं खंडकाव्यें " या विषयावर कु. विद्या देशपांडे यांचें निबंधवाचन झालें. अध्यक्ष प्रा. तारळेकर यांनी त्यांना डॉ. माधवराव यांच्या सान्निध्यांत आलेले अनुभव सांगितले. कु. सोहनी व प्रा. तारळेकर यांनी कै. माधवरावांच्या कविता गाऊन दाखविल्या. श्री. पवार यांनी आभार मानले.

दि. ८ डिसेंबर ६२ रोजीं कै. तांबे स्मृतिदिनानिमित्त तांबे यांच्या कविता वाचून व गाऊन दाखविण्यांत आल्या. या कार्यक्रमांत प्रा. अदवंत यांच्या अध्यक्षतेखालीं प्रा. तारळेकर, प्रा. राजा महाजन, कु. सोहनी, कु. प्रभुदेसाई यांनी भाग घेतला.

दि. २३ जानेवारी ६३ रोजीं कै. गोविंदाग्रज स्मृतिदिनानिमित्त मराठी काव्य दर्शनाचा कार्यक्रम सादर करण्यांत आला. प्रा. अदवंत यांच्या अध्यक्षतेखालीं प्रा. राजा महाजन, प्रा. तारळेकर, प्रा. जोशी, प्रा. कु. राणे, श्री. रमेश जैन श्री. प्रमोद पाटणकर, श्री. भावसार, कु. सोहनी, कु. प्रभुदेसाई यांनी कै. गोविंदाग्रज ते विंदा करंदीकर कालांतील कांही प्रमुख कवींच्या काव्याचें दर्शन घडविलें.

दि ११ फेब्रुवारी ६३ रोजी कॉलेजपत्रिका हा कार्यक्रम आकाशवाणी कार्यक्रम पद्धतीनुसार सादर करण्यांत आला. या कार्यक्रमांत श्री. गंधे, भावसार, कुळकर्णी, ए. बी. देशपांडे, श्री. मा. पाटणकर, कु. विद्या देशपांडे, कु. पळसुले, कु. छाया, केळकर कु. सुधाबाला नाईक, व श्री. सुभाष सोनवणे यांनी भाग घेतला. यंदा पुणें केंद्रावरील कार्यक्रमासाठी श्री. दिवाकर द. गंधे यांची निवड करण्यांत आली.

वर्षे अखेरीस वार्षिक दिनीं कथावाचन, ब्रेन ट्रस्ट, कवि-संमेलन असे कार्यक्रम सादर करण्यांत आले. खार्चिक कार्यक्रम रद्द करून मंडळाने १०१ रु. संरक्षण निधीस दिले.

या वर्षीचें महत्वाचें कार्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या साहित्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यांत आलेला –हिरवळ– या भित्तिपत्रिकेचा उपक्रम. अत्यंत आकर्षक स्वरूपांत दर सोमवारी ही सुंदर हस्तलिखित भित्तिपत्रिका श्री. गंधे श्री. भावसार व कु. विद्या देशपांडे यांचे विद्यार्थीप्रतिनिधीमंडळ सादर करीत असे. चांगल्या साहित्यांतील उतारे, उत्तम कविता, ललित लेख व कथा, विनोदी चौकटी असें या साहित्याचें स्वरुप होतें. यंदा कथाकार म्हणून श्री. गंधे, श्री. सुधाकर कुळकर्णी, श्री. उद्धव कुळकर्णी व कवि म्हणून श्री. भावसार, देशपांडे श्री. मा., कुळकर्णी अ. बा., प्रमोद पाटणकर, राजहंस, भीमराव पाटील, राजदेरकर, ललित लेखक म्हणून कु. देशपांडे, श्री. सुभाष सोनवणे, सु. ना. शिंपी, र. ग. झवर इ. विद्यार्थी–विद्यार्थीनींनी चांगली प्रगति केली.

यंदाचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्यांनी आम्हांस मदत केली त्यांचे आम्ही आभारी आहोंत.

| | |
|---|---|
| दिवाकर गंधे | श्री. दत्ता पवार |
| कु. विद्या देशपांडे | कु. रजनी पोतनीस |

चिटणीस

प्रा. म. ना. अदवंत
कार्याध्यक्ष



# वादविवाद सभा

यावर्षी वादविवाद सभेचें उद्घाटन मराठींतील सुप्रसिद्ध संशोधक, समीक्षक व नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्तें दि. ११ ऑ. ६२ रोजीं झालें. ज्ञानदानाचें व ज्ञानग्रहणाचें माध्यम मातृभाषा असावी यावर त्यांचें उद्बोधक व चटकदार भाषण झालें.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे तर्फे नासिक येथे २६ ऑगस्ट १९६२ रोजीं घेण्यांत आलेल्या महाराष्ट्र–गुजराथ संयुक्त हिंदी वक्तृत्वस्पर्धेसाठी चांचणी चर्चा दि. १३–८–१९६२ रोजीं घेण्यांत येऊन श्री. भावसार पी. एन्. व श्री. दुसाने एन्. एन्. यांची निवड करण्यांत आली अध्यक्षस्थानीं प्रा. पुणतांबेकर होते व परीक्षक प्रा. जोशी, प्रा. पुणतांबेकर हे होते.

दि. सप्टेंबर रोजीं कै. न्या. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धेसाठी उमेदवारांची चांचणी घेण्यांत आली अध्यक्षस्थानीं प्रा. चिपळूणकर होते. परीक्षकाची जबाबदारी प्रा. चिपळूणकर प्रा. पुणतांबेकर, प्रा. राजा महाजन यांनी स्विकारली होती. श्री जोशी प्र. ल. आणि कु. कानडे यांची निवड करण्यांत आली. येथे श्री. जोशी यांस प्रशस्तीपत्रक मिळालें.

न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यूट फोरमतर्फे पुणें विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रांतील विद्यार्थ्यांसाठी दि. १५–९–६२ रोजीं घेण्यांत आलेल्या इंग्रजी निबंधस्पर्धेत आपल्या कॉलेजमधील कु. केळकर, श्री. नेहते आर. एस. व श्री. जोशी आर. एस्. यांनी भाग घेतला.

नासिक येथील कै. सौ. डॉ. चंदूबाई कुळकर्णी वादस्पर्धेसाठी प्रा. तारळेकर यांच्या अध्यक्षतेखाली चांचणी चर्चा दि. १५–९–६२ रोजीं घेण्यांत आली. परीक्षकाचें कार्य प्रा. चिरमाडे, प्रा. तारळेकर व प्रा. सिरसीकर यांनी केले. श्री. जोशी प्र. ग. व कु. कांबळी यांची निवड झाली. श्री. जोशी यांना प्रशस्तीपत्रक मिळालें.

खि. प्रिं. डॉ. हिवाळे वादविवाद स्पर्धेसाठी श्री. जोशी प्र. ल. आणि कु. कुमुदिनी कानडे हा संघ पाठविण्यांत आला होता. कु. कानडे यांचें भाषण फारच सुंदर होऊन त्यास शंभर रुपयांचें प्रथम क्रमांकाचें पारितोषिक मिळालें व संघास द्वितीय क्रमांक मिळाला. कु. कानडे व श्री. जोशी यांचें अभिनंदन !

पुणे विद्यापिठातर्फे स्वामी विवेकानंद जन्मशताब्दिनिमित्त घेण्यांत आलेल्या वक्तृत्वस्पर्धेत कु. मीनाक्षी पळसुले यांनी भाग घेतला. या स्पर्धेत त्यांना दुसरा क्रमांक मिळाला व शंभर रुपयांचें द्वितीय पारितोषिक मिळालें. अभिनंदन ! !

दि. १० जानेवारी १९६३ रोजीं डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेसाठीं " अद्ययावत् ज्ञानाच्या प्राप्तीसाठी विद्यापिठीय शिक्षणाचें माध्यम इंग्रजीच असणें आवश्यक आहे. " या प्रस्तावावर धुळें येथे झालेल्या स्पर्धेत श्री. स्नेहकुमार वाणी व श्री. ग. जोजी यांनी भाग घेतला. श्री. जोशी प्र. ग. यांस तृतीय पारितोषक मिळालें. अभिनंदन !!

पुणें विद्यापिठातर्फे " Co-operation " ( सहकार ) ह्या विषयावर घेण्यांत आलेल्या वादविवाद स्पर्धेत श्री. जोशी प्र. ल. आणि कु. गुणसुंदरी केळकर यांना प्रथम क्रमांक मिळाला. त्याचप्रमाणे दिल्ली येथे झालेल्या आंतरविद्यापिठीय वादविवाद स्पर्धेसाठी पुणें विद्यापिठातर्फे भाग घेण्यासाठी त्यांची प्रथम क्रमांकाने निवड करण्यांत आली. दिल्ली येथ झालेल्या स्पर्धेत त्यांची भाषणें खूपच चांगलीं झालीत.

स्वामी विवेकानंद जन्मशताब्दिनिमित्त पुणें विद्यापीठातर्फे घेण्यांत आलेल्या निबंधस्पर्धेसाठी श्री. जोशी पी. एल्., श्री. देशपांडे आर. एल्., श्री. राजदेरकर एस्. एम्., श्री. देशपांडे व्ही. पी., श्री. ताम्हणकर व्ही. बी. यांचे निबंध पाठविण्यांत आले.

दि. २५ जानेवारी १९६३ रोजीं स्वामी विवेकानंद– (१) जीवन व कार्य (२) विश्वधर्मकल्पना (३) साहित्य (४) परदेशांतील कार्य या विषयांवर विद्यार्थ्यांची वक्तृत्वस्पर्धा घेण्यांत आली अध्यक्षस्थानीं प्रा. अदवंत होते. परीक्षक प्रा. चिपळूणकर व प्रा. अदवंत होते. कु. पळसुले, श्री. जोशी, प्र. ल., श्री. राजदेरकर यांना पारितोषिकें देण्यांत आली.

यंदा औरंगाबाद येथे रोटरी–क्लब ढालीसाठी The Policy of nonalignment of our Govt. has stood he ttest of time. ह्या विषयावर इंग्रजींतून झालेल्या वादविवाद स्पर्धेत

कु. मीनाक्षी पळसुले व भोळे एल्. एम्. यांनी भाग घेऊन अनुक्रमें दुसरा व तिसरा क्रमांक मिळविला. सांघिकदृष्ट्या त्यांना प्रथम क्रमांक मिळून रोटरी क्लब ढाल मिळाली. अभिनंदन !

यावर्षी वादविवादस्पर्धेत भाग घेण्यांत विद्यार्थी विद्यार्थीनींनी कमालीचा उत्साह व नैपुण्य दाखविलें.

हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी व प्राध्यापकांनी आम्हांस सहाय्य व सहकार्य दिले त्यांचे आम्ही आभारी आहोंत.

**स्नेहकुमार वाणी**
सेक्रेटरी

**प्रा. सु. का. जोशी**
चेअरमन

---

# लेडीज ॲसोसिअेशन

असोसिअेशनचें कार्य ह्या वर्षी ५ ऑगष्ट १९६२ रोजीं (जिल्हाधिकारी ह्यांच्या पत्नी) सौ. पाठक B. A. ह्यांच्या हस्तें उद्घाटन होऊन सुरू झालें. उद्घाटनानंतर झिम्मे, फुगड्या, कोवडा, असे विविध प्रकारचे खेळ खेळण्याचा कार्यक्रम होता. विद्यार्थिनींनी सौ. पाठक, सौ. महाजन, सौ. पोतनीस ह्या पाहुण्यांनाहि खेळांत ओढल्यामुळे कार्यक्रमाला रंग चढला. कॉफीपानानंतर कार्यक्रम संपला.

१९ सप्टेंबरला 'समान स्वातंत्र्य व समान अधिकार मिळूनहि स्त्री मुळीच सुखी झाली नाही' ह्या विषयावर वादविवाद आयोजित करण्यांत आला होता. त्यांत कु. पळसुले, कु. दिक्षित, कु. चौधरी, कु. चिने, कु. परचुरे, कु. कुळकर्णी, कु कानडे, सौ. तडवी इत्यादि विद्यार्थिनींनी भाग घेतला. विषयाच्या बाजूने व विरुद्ध बोलणाऱ्या विद्यार्थिनींनी आपलीं मतें आग्रहानें मांडून वादविवादास मौज आणली. शेवटीं प्राचार्य महाजन ह्यांनी अत्यंत समर्पक समारोप केला.

९ डिसेंबरला असोसिअेशनची सहल असोदा येथे कु. शंकुतला चौधरी हिच्या मळ्यांत गेली होती. सबंध दिवस गाणीं, भेंड्या, खेळ, गप्पा ह्यांत मजेंत पार पडला.

ह्या वर्षीचा विशेष कार्यक्रम 'आनंदबाजार' २३ नोव्हेंबरला आयोजित करण्यांत आला होता. २०-२५ विद्यार्थिनी व प्राध्यापिका ह्यांनी विविध खाद्यपदार्थ घरून करून आणले व त्यांची विक्रीहि विद्यार्थिनींनीच केली. विक्रीचें उत्पन्न सुमारे रु. २२५ आलें. त्यांत वर्गणीतून थोडी भर घालून असोसिअेशनने २५१ रु. राष्ट्रीय संरक्षण निधीस दिले.

असोसिअेशनला ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांची असोसिअेशन आभारी आहे.

**कु. सुषमा जोगळेकर**
सेक्रेटरी

**प्रा. कु. लता पाटणकर**
चेअरमन

---

# हिन्दी-विभाग

भगवतीचरण वर्मा लिखित 'चित्रलेखा' उपन्यास पर दिसंबर ६२ में प्रा. शं. र. पुणताम्बेकरजीकी अध्यक्षतामें एक परिसंवाद आयोजित किया गया था। प्रा. उ. भा. कोठारी और छात्र १) कु. सुषमा जोगलेकर २) भालचंद्र पाटील ने चर्चा में भाग लिया। बाहरसे श्री. रा. वा. पाटील M. A. B. T. और श्री सुंदरलालजी मल्हारा M. A. खास इसी कार्यक्रमके लिए पधारे थे। चर्चा बहुत मनरंजक एवचं छात्रोंकेलिए लाभदायक हुयी।

**प्रा. शं. र. पुणतांबेकर**

---



# अ ज न्ता

## हिन्दी विभाग

हर महान संकट ने हमारे देश को नया बल प्रदान किया है, नई गरिमा प्रदान की है। सिकंदर के आक्रमण से लेकर माओ त्से तुंग के आक्रमण तक हर बार हम सशक्त राष्ट्र के रूप में जागकर अपनी महान नियति के साक्षात्कार की ओर एक कदम और बढ़े हैं। इस आक्रमण के समक्ष हमारे राष्ट्र के जन जन का जागरण सचमुच जनतंत्र का जागरण, जनतंत्र के मूल्यों का जागरण बन सकेगा तभी उसकी सार्थकता है।

—डॉ. धर्मवीर भारती

# जाग उठा है हिन्दुस्तान !

सावधान हो जाओ चीनी
अब जाग उठा है हिन्दुस्तान ।

मिट्टीका कण कण झूम उठा
घर घर में सैनिक जाग उठा
इस देश की रक्षा करने को
लो सारा भारत डोल उठा
हम देश की खातिर देंगे प्राण
अब जाग उठा है हिन्दुस्तान

यह भारत हमको प्यारा है
जयहिंद हमारा नारा है
इस देशपे हमला करके अब
हमें चीनियोंने ललकारा है
है स्वतंत्रताकी हमको आन
अब जाग उठा है हिन्दुस्तान

दो देशकी खातिर सब कुछ दान
धन या कांचन अपनी जान
जाग उठो अब भारत वासी
जाये ना इस तिरंगा की शान
झुक झुक कहता है आसमान
अब जाग उठा है हिन्दुस्तान

—बी. जी. पाटील
[ बी. ए., तृतीय वर्ष ]



# " गुरुदेव टागोर का व्यक्तित्व "

ले.– देवदियाल मुंजाळ, तृतीय वर्ष ( विज्ञान )

महाकवि कालिदास के कुमारसंभव में एक स्थान पर परमात्मा की आलोचना की है। वे कहते हैं परमात्मा की यह नीति रही है कि वह सभी गुण एक में ही केन्द्रित नहीं करता, जैसे एक पुष्प को सुगन्धि दी है तो रूप नहीं, दूसरे को रूप तो सुगन्धि नहीं। इसी आधार पर कल्पना की जाती है कि सर्वगुण सम्पन्न मानव दुर्लभ है। जो कलाकार होगा, वैज्ञानिक नहीं होगा, जो भक्त होगा, ज्ञानी नहीं होगा, जो गृहस्थ होगा, सन्यासी नहीं होगा, जो कवि होगा, राजनीतिज्ञ नहीं होगा। परन्तु गुरुदेव रवीन्द्रनाथ इस उक्ति के अपवाद थे।

साहित्यकार टागोर ने अग्रगण्य उत्कृष्ट साहित्य का सृजन करके विश्व में अपनाही नाम नहीं, भारत का नाम भी चमका दिया। उन्होंने साहित्य के किसी भी अंग को अछूता नहीं छोडा, उन्होंने कविता, कहानी, नाटक, उपन्यास, निबन्ध, पत्र आलोचना आदि विविध प्रकार के साहित्यका सृजन कर विश्व-साहित्य वाटिका में हर प्रकार के फूल खिला दिये। विश्व की शायदही ऐसी कोई भाषा होगी जिस में उन की अमर कृति "गीतांजलि" का अनुवाद न हो चुका हो। भक्ति और ज्ञान के अमृत रस से आप्लावित मुक्तक छन्द में लिखे हुए इसके गीतों में उनकी उत्कट-भावुकता और दार्शनिकता फूट पडती है। उनकी रहस्यवादी रचनाओं को पढ़कर पाठक का मन आत्मविभोर होकर, वह संसार के माया के पर्दे को हटाकर उस अनंत और असीम के दर्शन करना चाहता है।

महाकवि टागोर ने भारतीय–साहित्य क्षेत्र में एक क्रांति सी मचा दी। उन्होंने नए नए प्रयोग किये, नई नई शैलियां प्रस्तुत कीं। भारत की कोई भी भाषा नहीं, जिसमें उन के साहित्य का प्रभाव न पड़ा हो।

**" कलाकार टागोर " :—**

टागोर ने भारतीय चित्रकला, नाट्यकला, संगीतकला, नृत्यकला, मूर्तिकला को प्रवीणता और सिद्धहस्तता के उच्च शिखर पर पहुंचा दिया। उन्होंने "रवीन्द्र संगीत" नामक अनुपम शैली प्रस्तुत की तथा रंगमंच पर अपने नाटकों को प्रस्तुत करके नृत्य और नाट्यकला को नवीन दिशा दी।

**" दार्शनिक टागोर " :—**

टागोर ने उपनिषद्काल वर्तमान समय तक के सांख्ययोग, अद्वैत वेदान्त, द्वैतवेदान्त, विशिष्ट अद्वैत, बौद्धसिद्धांत, कर्मयोग आदि दार्शनिक सिद्धान्तों का एकीकरण किया। राममोहन राय का ब्रम्होसमाज, विवेकानन्द का ज्ञान-योग वेदान्त, एनीबेसेन्ट की थियासफी, अरविन्द घोष का दिव्य जीवन-नाद आदि का निचोड़ गुरुदेव की एकरूपता में मिलता है।

**" देशभक्त टागोर " :—**

भारत की स्वाधीनता, पद-दलित पीडित देशवासियों के पुनरुत्थान के वे स्वप्नद्रष्टा थे। उनकी कृतियों में भारत की आत्मा बोलती है। उनका सन्देश विश्व के लिये भारत का संदेश है। उनके भगवान भारत के श्रमिकों में बोलते हैं।

**" विश्व–नागरिक " :—**

टागोर संकीर्ण देशभक्ति के प्रतिपादक नहीं थे, वे विश्व–बंधुत्व वाद के पुजारी थे। वे विश्व में आध्यात्मवाद और शान्ति की स्थापना करना चाहते थे। उनके काव्य में शान्ति का नाम गूँजता है, मानवता की पुकार फूटती है।

**" विद्या के भण्डार " :—**

टागोर ने संसार के किसी भी विषय को पढ़े बिना नहीं छोड़ा। साहित्य, इतिहास, भूगोल, विज्ञान, अर्थ–शास्त्र, मनोविज्ञान दर्शन आदि से लेकर रंगाई–धुलाई, भोजनविधि, खेलकूद बागवानी कताई–बुनाई आदि सभी सांसारिक विद्याओं के अध्येता के सम्बन्ध में "रवीन्द्रोच्छिष्टं जगत्सर्वं" वाली उक्ति चरितार्थ होती है।

**" आचार्य और शिक्षाशास्त्री " :—**

टागोर ने शान्तिनिकेतन में जिस उच्च-शिक्षण-पद्धति की नींव डाली और उसका पोषण किया, वह समस्त मानव-जाति के लिये पथ--प्रदर्शक है। उनकी शिक्षण पद्धति में प्रकृतिवाद, आदर्शवाद, यथार्थवाद, आध्यात्मवाद एवं मानवतावाद का सामंजस्य है। वे प्रकृति के क्रीडांगण में दी गई प्राथमिक शिक्षा को अधिक महत्व देते हैं क्यों कि " **प्रकृतिप्रभु की हस्त-लिपि है** "। इस प्रकार आचार्य टागोर के मत में शिक्षा का सर्वोत्तम उद्देश्य था आत्मा का विस्तार अथवा आध्यात्मिक उन्नति। उनके विचारानुसार " **शिक्षण और पुस्तकें** उस आन्तरिक राजपथ पर केवल साईन बोर्ड है "। इसी सूत्रपात को लेकर उन्होंने कहा है कि " वह शिक्षक नहीं बन सकता, जो अपने अन्तर का बालक खो चुका है। "

इस प्रकार गुरूदेव टागोर सर्वतोमुखी प्रतिभा-सम्पन्न सम्पूर्ण व्यक्तित्व- सम्पन्न थ। उन की शिक्षा सम्पूर्ण-व्यक्तित्व की शिक्षा है। वे अमर हैं और स्वतंत्र भारत के आराध्य देवता हैं। उन की दिवंगत आत्मा युग-युगांतर तक हमारे जीवन पथ को आलोकित करती रहेगी।

———

# अधूरा गीत !

सजल मेघ लो बरस गये हैं
धरती की मस्ती चमक उठी है
फूल खिले मुरझाये लेकिन
मेरे गीत अधूरे हैं ।

सजके बिजली नभसे उतरो
रात होगयी देखो गहरी
पवन गंध बिखराये लेकिन
मेरे गीत अधूरे हैं ।

अरमानोंकी महफिल सूनी
शाम सुनाये वही कहानी
छिड़े तार हैं दिलके लेकिन
मेरे गीत अधूरे हैं ।

— प्रमोद पाटणकर
एस्. वाय्., बीएस्. सी.



# रिझर्वेशन....

ले.– कु. सुषमा जोगळेकर
एस्. वाय्., बी. ए.

ठणं ! ठणं ऽ ठणं ऽ !

अरे ! वॉर्निंग बेल हो गयी ? यह क्या है, अभी तो सिर्फ पांचही बजे हैं, और गाडी छूटनेको है ? इसका छूटनेका समय तो पांच–बीस है ! मैंने कुलीको पुकारा और कहा, ' जल्दी करो, इसी गाडीसे मुझे बम्बई जाना है।'... पर भौंहें चढाकर वह बोला–

' बाईजी ट्रेन तो छूट रही है, और इतनी भरी है कि, मै आपको न चढा सकूँगा ।'

' पर मेरी सीट रिझर्व्ड् है नंबर पांचकी।'

तब उसने झट्से सामान उठाया और चलने लगा।

मै डिब्बेमें घुसी नहीं कि गाडी चल दी। कुलीको पैसे देकर मैं अपनी सीट की तरफ बढी।

डिब्बेमें भीड तो थी नही, क्योंकि रिझर्वेशनके डिब्बेमें अन्योंको चढना मना होता है। मैंने नजर उठाकर चारोंओर देखा तो अेक भी सीट खाली न थी। मैंने पर्ससे रिझर्वेशन टिकट निकाला और गौरसे देखा तो सचमुचही मेरा सीट नंबर पांचही था, पर उस सीटपर कोअी सूट–बूट–धारी श्रीमानजी स्थानापन्न थे, और किसी मासिक पत्रिकामें डूबे हुअे नजर आ रहे थे।

मैंने सोचा कोअी भी साहब हों– अपनी सीटसे उठ जानेके लिये उन्हें कहनाही चाहिये। पर कहूँ तो कैसे– मर्दोंसे बात करते मुझे हिचकसी होती है– कुछ भयसा लगता है। फिर भी मैंने मनही मन ढाडस बटोरा और उस श्रीमानजीकी ओर बढी—

' जी ! एस्क्यूज मी ! ये सीट मेरी है, ये देखिये मेरा रिजर्वेशन।' मगर उनका तो ध्यान तक न गया, मुझे बहुत गुस्सा आया। मैंने फिर कहा... ' एस्क्यूज मी !'

' जी, ? आप मुझसे कुछ कह रही हैं ?' इति श्रीमानजी। ' नही तो किससे ?' मगर ये मनही मन। प्रगट्में उनसे बोली, ' ये सीट मेरी है, जिसपर आप बैठे हैं।'

' जी ! पर यही तो मेरा भी सीट नंबर है। देखिये न मेरा रिजर्वेशन टिकट।' ऐसा कहकर उन्होंने अपना टिकट मुझे दिखाया। मैं एकदम चौंक गयी। " ये कैसे हो सकता है कि दोनोंका एकही सीट नंबर हो। " मैंने भी अपना टिकट दिखलाया। वे भी चौंक पडे, और नम्रतासे बोले,

' जी इसमें कुछ गलती है, मगर आप फिक्र न करे, आप यहाँ बैठ जाइये मैं खडा रहूँगा।'

मैंने इन्कार कर दिया। पर वे नहीं माने ! शिष्टताके नाते उन्होंने तो अपना फर्ज अदा किया, किन्तु अब मेरे सामने समस्या थी ! मैं कैसे अपना फर्ज अदा करूं, क्योंकि उसी सीट पर उनका भी हक था। आधी सीटपर बैठ जानेकी बात नहीं कह सकती थी। अतः धन्यवाद देनेके सिवा मैं उनसे कुछ न कह सकी। मैं पत्रिका निकालकर पढ़ने बैठी वे भी खडे खडे पढ रहे थे, मगर मेरा मन पढ़ने में न लगा, खिडकी के पासकीही सीट होने के कारण मैं सृष्टिसौंदर्य को निहारने लगी।

अचानक गाडी रुकी। कोई स्टेशन था। यहाँ मेरे सामने की सीटवाला पॅसेंजर उतर गया। अतः उस श्रीमानजी को वह जगह मिल गयी। मुझे संतोष हुआ कि उन्हें बहुत देर तक खडा न रहना पडा। गाडी फिर चल पडी अब वह खण्डाला पास की घाटी बोरघाट चढ़ रही थी... जब जागी घडी में देखा, सिर्फ पांच बजे थे, जितने गाडी में चढ़ते वक्त बजे थे। क्या मेरी घडी बन्द थी ? मैंने श्रीमानजी से पूछा, ' जी कितने बजे है ?' वे बोले, ' नौ !'

' नौ ?' और गाडी यहाँ ? इस समय तो यह कल्याण होनी चाहिये थी ! पर लोगोंसे मालूम हुआ कि, आगे पटरीपर कोई बडा पत्थर गिरा है, उसे जबतक हटाया नहीं जायगा तबतक गाडी आगे नहीं जा सकती। सुनकर मैं तो घबरा गयी, अकेली जा रही हूँ न जाने कितनी देर रुकना होगा ? और उधर मौसी स्टेशनपर आ जायगी और राह देखते देखते लौट जायगी। एक न दो ! मैं चकरा गयी। ' अब कैसे होगा ?'

**" आचार्य और शिक्षाशास्त्री " :—**

टागोर ने शान्तिनिकेतन में जिस उच्च-शिक्षण-पद्धते की नींव डाली और उसका पोषण किया, वह समस्त मानव-जाति के लिये पथ--प्रदर्शक है। उनकी शिक्षण पद्धति में प्रकृतिवाद, आदर्शवाद, यथार्थवाद, आध्यात्मवाद एवं मानवतावाद का सामंजस्य है। वे प्रकृति के क्रीडांगण में दी गई प्राथमिक शिक्षा को अधिक महत्व देते हैं क्यों कि "**प्रकृतिप्रभु की हस्त-लिपि है**"। इस प्रकार आचार्य टागोर के मत में शिक्षा का सर्वोत्तम उद्देश्य था आत्मा का विस्तार अथवा आध्यात्मिक उन्नति। उनके विचारानुसार "**शिक्षण और पुस्तकें** उस आन्तरिक राजपथ पर केवल साईन बोर्ड है"। इसी सूत्रपात को लेकर उन्होंने कहा है कि "वह शिक्षक नहीं बन सकता, जो अपने अन्तर का बालक खो चुका है।"

इस प्रकार गुरूदेव टागोर सर्वतोमुखी प्रतिभा-सम्पन्न सम्पूर्ण व्यक्तित्व– सम्पन्न थ। उन की शिक्षा सम्पूर्ण-व्यक्तित्व की शिक्षा है। वे अमर हैं और स्वतंत्र भारत के आराध्य देवता हैं। उन की दिवंगत आत्मा युग-युगांतर तक हमारे जीवन पथ को आलोकित करती रहेगी।

---

# अधूरा गीत !

सजल मेघ लो बरस गये हैं
धरती की मस्ती चमक अुठी है
फ़ूल खिले मुरझाये लेकिन
मेरे गीत अधूरे हैं ।

सजके बिजली नभसे अुतरी
रात होगयी देखो गहरी
पवन गंध बिखराये लेकिन
मेरे गीत अधूरे हैं ।

अरमानोंकी महफिल सूनी
शाम सुनाये वही कहानी
छिड़े तार हैं दिलके लेकिन
मेरे गीत अधूरे है ।

— प्रमोद पाटणकर
एस्. वाय्., बीएस्. सी.



# रिझर्वेशन....

ले.– कु. सुषमा जोगळेकर
एस्. वाय्., बी. ए.

ठणं ! ठगं् ऽ ठगं् ऽ !

अरे ! वॉर्निंग बेल हो गयी ? यह क्या है, अभी तो सिर्फ पांचही बजे हैं, और गाडी छूटनेको है ? इसका छूटनेका समय तो पांच–बीस है ! मैंनें कुलीको पुकारा और कहा, 'जल्दी करो, इसी गाडीसे मुझे बम्बई जाना है।'... पर भौंहें चढाकर वह बोला–

'बाईजी ट्रेन तो छूट रही है, और इतनी भरी है कि, मै आपको न चढा सकूँगा ,'

'पर मेरी सीट रिझर्वड् है नंबर पांचकी।' तब उसने झट्से सामान उठाया और चलने लगा।

मै डिब्बेमें घुसी नहीं कि गाडी चल दी। कुलीको पैसे देकर मैं अपनी सीट की तरफ बढी।

डिब्बेमें भीड तो थी नही, क्योंकि रिझर्वेशनके डिब्बेमें अन्योंको चढना मना होता है। मैंने नजर उठाकर चारोंओर देखा तो अेक भी सीट खाली न थी। मैंने पर्ससे रिझर्वेशन टिकट निकाला और गौरसे देखा तो सचमुचही मेरा सीट नंबर पांचही था, पर उस सीटपर कोअी सूट–बूट–धारी श्रीमानजी स्थानापन्न थे, और किसी मासिक पत्रिकामें डूबे हुअे नजर आ रहे थे।

मैंने सोचा कोअी भी साहब हों– अपनी सीटसे उठ जानेके लिये उन्हें कहनाही चाहिये। पर कहूँ तो कैसे– मर्दोंमे बात करते मुझे हिचकसी होती है– कुछ भयसा लगता है। फिर भी मैंने मनही मन ढाढस बटोरा और उस श्रीमानजीकी ओर बढी—

'जी ! एस्क्यूज मी ! ये सीट मेरी है, ये देखिये मेरा रिजर्वेशन।' मगर उनका तो ध्यान तक न गया, मुझे बहुत गुस्सा आया। मैंने फिर कहा... 'एस्क्यूज मी !'

'जी, ? आप मुझसे कुछ कह रही हैं ?' इति श्रीमानजी। 'नही तो किससे ?' मगर ये मनही मन। प्रगटमें उनसे बोली, 'ये सीट मेरी है, जिसपर आप बैठे हैं।'

'जी ! पर यही तो मेरा भी सीट नंबर है। देखिये न मेरा रिजर्वेशन टिकट।' ऐसा कहकर उन्होंने अपना टिकट मुझे दिखाया। मैं एकदम चौंक गयी। "ये कैसे हो सकता है कि दोनोंका एकही सीट नंबर हो।" मैंने भी अपना टिकट दिखलाया। वे भी चौंक पडे, और नम्रतासे बोले,

'जी इसमें कुछ गलती है, मगर आप फिक्र न करे, आप यहाँ बैठ जाइये मैं खडा रहूँगा।'

मैंने इन्कार कर दिया। पर वे नहीं माने ! शिष्टताके नाते उन्होंने तो अपना फर्ज अदा किया, किन्तु अब मेरे सामने समस्या थी ! मैं कैसे अपना फर्ज अदा करूं, क्योंकि उसी सीट पर उनका भी हक था। आधी सीटपर बैठ जानेकी बात नहीं कह सकती थी। अतः धन्यवाद देनेके सिवा मैं उनसे कुछ न कह सकी। मैं पत्रिका निकालकर पढ़ने बैठी वे भी खडे खडे पढ रहे थे, मगर मेरा मन पढ़ने में न लगा, खिडकी के पासकीही सीट होने के कारण मैं सृष्टिसौंदर्य को निहारने लगी।

अचानक गाडी रुकी। कोई स्टेशन था। यहाँ मेरे सामने की सीटवाला पॅसेंजर उतर गया। अतः उस श्रीमानजी को वह जगह मिल गयी। मुझे संतोष हुआ कि उन्हें बहुत देर तक खडा न रहना पडा। गाडी फिर चल पडी अब वह खण्डाला पास की घाटी बोरघाट चढ़ रही थी... जब जागी घडी में देखा, सिर्फ पांच बजे थे, जितने गाडी में चढ़ते वक्त बजे थे। क्या मेरी घडी बन्द थी ? मैंने श्रीमानजी से पूछा, 'जी कितने बजे है ?' वे बोले, 'नौ !'

'नौ ?' और गाडी यहाँ ? इस समय तो यह कल्याण होनी चाहिये थी ! पर लोगोंसे मालूम हुआ कि, आगे पटरीपर कोई बडा पत्थर गिरा है, उसे जबतक हटाया नहीं जायगा तबतक गाडी आगे नहीं जा सकती। सुनकर मैं तो घबरा गयी, अकेली जा रही हूँ न जाने कितनी देर रुकना होगा ? और उधर मौसी स्टेशनपर आ जायगी और राह देखते देखते लौट जायगी। एक न दो ! मैं चकरा गयी। 'अब कैसे होगा ?'

' कहिये, कहाँ जाना है आपको ? ' उन्होंने पूछा। ' दादर उतरूंगी, पर गाडी लेट पहुँचेगी, मौसी लौट जायगी।' ' घबराइये नहीं मैं आपको आपके निवास स्थान तक पहुँचा दूँगा, ' उनकी बातें सुनकर मेरे जी में जो आ गया। —कितने सभ्य हैं ये श्रीमान !

अब मैंने अपना टिफिन खोला। उनके साथ तो केवल एक बॅगही था। अतः मैंने उन्हें टिफिन में हाथ बटाने की विनती की और उन्होंने भी बिना संकोच के स्वीकार करली। मन को संतोष हुआ। खाना खानेके बाद मुझे कुछ नींद सी आ गयी। बीच में नींद खुली गाडी चल रही थी। कल्याण निकल चुका था।

दादर आया। स्टेशनपर मौसी दिखायी दी। मैं श्रीमानजी को धन्यवाद देती हुअी उतर गयी। गाडी चली तो उन्होंने भी हसते हसते मुझसे विदा ली।

काफी समय बीत गया। मैं अब बी. ए. हो गयी, और शादी का चक्कर चलने लगा ! एक जगह बात पक्की हो गयी। मुझे कहा गया था, ' भावी पति महोदय सांवले रंग के हैं पर खूबसूरत और फॉरेन रिटर्न्ड।' जब वे मुझे देखने के लिये आ गये और चाय लेकर मैं बैठककी और बढी —तो— आँखों को विश्वास नहीं हुआ— उधर उन की आँखों में भी स्मितहास्य नजर आ रहा था। फिर तो लज्जावश दूसरी बार आँखही न उठा सकी।

शादी धूमधाम से निपटी। किसीको भी पता न था कि, हम दोनों एकदूसरे को पहचानते हैं !

जब प्रत्यक्ष मुलाकात हुअी तो कहने लगे, " अजीब रिज़र्वेशन है ये ! आज भी वही परिस्थिति है, एकही सीट के दो दावेदार हैं तो... अब उस पर किसका अधिकार है ? " मैं तो लज्जा से गड़ गयी। मेरा मन भी कह रहा था, " अजीब रिज़र्वेशन है ये ? उस वक्त तो केवल सीट का रिज़र्वेशन था, अब दोनोंके लिये सीट ही नहीं तो एक ही डगर जीवनभर के लिये रिज़र्व कर दी गयी है। "

---

## — सीखो —

फूलोंसे नित हँसना सीखो,
भौरों से नित गाना।
तरु की झुकी डालियोंसे,
नित सीखो शीश झुकाना॥
सीख हवाके झोंकों से लो,
कोमल भाव बहाना।
दूध तथा पानीसे सीखो,
मिलना और मिलाना॥
सूरज की किरणोंसे सीखो,
जगना और जगाना।
लता तथा पेड़ोंसे सीखो,
सब को गले लगाना॥
वर्षा की बूँदोंसे सीखो,
सबसे प्रेम बढ़ाना।
मेहंदी से सीखो सब ही पर,
अपना रंग चढ़ाना॥

मछलीसे सीखो,
स्वदेश के लिये प्रेम नित करना।
पतझड़ के पेड़ोंसे सीखो,
दुखमें धीरज धरना॥
दीपक से सीखो,
जितना हो सके अँधेरा हरना।
पृथ्वी से सीखो,
प्राणी की सच्ची सेवा करना॥
जल–धारा से सीखो आगे,
जीवन–पथ में बढ़ना ।
और धुएँ से सीखो हरदम,
ऊंचे ही पर चढ़ना ॥
सत्पुरुषों के जीवन से,
सीखो चरित्र निज गढ़ना ।
अपने गुरु से सीखो प्यारे.
उत्तम विद्या पढ़ना ॥

—डीसुज़ ए. सी.
बी. एस्सी. द्वितीय वर्ष)



# कुणाल : चरित्र चित्रण....

ले.– भालचन्द्र र. पाटील,
[ बी. ए, द्वितीय वर्ष ]

पाटलीपुत्रके महान् सम्राट अशोकका महान्पुत्र कुणाल रूप, गुण और आचरण में पिताके अनुरूप ही था। उसे ईर्ष्या, द्वेष, क्रोध, घृणा आदि छू भी नहीं सकते थे। माँने आँखें निकाल लीं, निष्कासित कर दिया फिरभी वह क्रोधित नही हुवा। माँ के प्रति श्रद्धा जरा भी कम नहीं हुअी। वह माँको नहीं, उसके विचारोंको दोष देता है।

" वे अबला हैं और प्रबल हैं ईर्ष्या, द्वेष, विकार "

कुणालमें परोपकार और त्याग की वृत्ति थी। वह कहता है –

" मैंने जो यह मार्ग लिया है,
माँको सदा सुयोग दिया है
करके वे अनुताप शुद्ध हो, बहें पाप बन पानी। "

कितना महान् त्याग है उसका। साथही कितना धैर्य, कितनी सहनशक्ति।

कुणाल अेक आदर्श मानव है। जिन गुणोंसे मनुष्य देवत्व प्राप्त कर लेता है, वे कुणालके चरित्रमें विद्यमान है। रजस और तमस उसे छू तक नहीं सकते।

" जा रजस, तू खोज अपना और कोई चटुल चेरा,
डाल देखें तमस् मुझपर दस–गुना घनघोर घेरा,
स्वगति सत्पथपर रहें तो क्या करेगा यह अंधेरा। "

शत्रुको भी क्षमा करनेवाला कुणालका शील दिव्य है...।

" माँको क्षमा करें ये बस अब,
पूरे मेरी आस। "

वह दृढनिश्चयी और स्थिर है। कठिनसे कठिन, भयंकरसे भयंकर परिस्थितियोंमें भी वह अपने मनका संतुलन नहीं खोता। वह कहता है–

" डरो परिस्थितियोंसे यदि तुम
तो अपनेको नर न कहो, "

कुणाल सन्तोषी प्रकृतिका है। वह कहता है कि मेरी चक्षु–इंद्रियही तो गयी है। आज भी मैं पक्षियोंका गान, भ्रमरकी गुँजार, कोयलका गीत सुन सकता हूँ, पुष्प गंधको सूंघ सकता हूँ। आज भी स्पर्श–इंद्रिया सबल हैं। आज भी कल्पनाके सहारे उन वस्तुओंका मानस चित्र अंकित कर सकता हूँ जिन्हें देख पाना मेरेलिए संभव नहीं है।

कुणाल आशावादी है। वह कहता है कि अच्छा हुआ दृष्टि गयी ! अेक तरह की बला गयी। अब मैं कांचनमालाको बूढी होती हुअी नहीं देख सकूँगा– जब कि वह सचमुच बूढी हो जायगी।

" दृष्टि गयी वा गयी जरा है ?
मेरी वधू हुअी अब मुझको चिरयुवती नवबाला। "

कुणाल का अीश पर पूरा पूरा भरोसा है। उसका आस्तिकवाद सदा स्पष्ट है। किन्तु उसका विचार है कि सुख तथा वैभव से घिरे होने पर हमारी ईश्वर–भक्ति में दिखावा अधिक, मनोविनोद अधिक है, हृदय की सच्चाअी कम होती है।

" कुंजों में ही अपने प्रभु की बाट जोहते थे जब हम,
उनको भूल कुसुम-वैभव ही देख मोहते थे तब हम "

कुणाल नियतिवादी है। किन्तु उस का भाग्यवाद उसे कर्महीन नहीं बनाता। अपने भाग्य का विधाता वह स्वयंको समझता है वह सच्चा कर्मयोगी है —

" मैं क्या करूँ नियति से,
जाऊँ न क्यों स्वगति से ?
जब कर्म की कृपा की यह कोर खींचता है "

कर्मयोगी होने के कारण " मा फलेषु कदाचन " सी वृत्ति उस की है—

" फल कहीं हो, पर यहाँ कर्तव्य मेरे हाथ मेरा "

कुणाल का हृदय लोककल्याण की भावना से लबालब भरा हुआ है। " वसुधैव कुटुम्बकम् " ही उस की वृत्ति है। स्वयं दुःख-सागर में डुबकियाँ ले रहा है, पर क्या चाहता है—

" सब सस्मृति पर हो अमृत वृष्टि
गूँजे घर घर में तीन ग्राम "

उस की आँखे भले ही मुँद जाय पर जगत के कान खुल जाने की अभिलाषा वह रखता है ! परोपकारी कुणाल गयी " दृष्टि " की ज्योति को कहता है—

" अथवा पर-हितार्थ तू निज से
ऊँचे उठकर कही क्षितिज से
ध्रुव तारक सा भ्रान्त पथिक को उचित दिशा दिखलाएगा
मैं कृतार्थ यदि कभी किसी के काम यहाँ तू आयगा।

कुणाल ने मानव-जीवन के लक्ष्य तथा उद्देश्य को समझ लिया था। जीवन-मरण का रहस्य वह समझ चुका था। आत्मा-परमात्मा सम्बधी आध्यात्मिक ज्ञान से वह परिपूर्ण था। शरीर की नश्वरता तथा क्षण भंगुरता को वह जानता था, साथही वह मानवतावादी था।

" बहुजन हिताय, बहुजन सुखाय " के लिए अपने जीवन को वह आर्पित कर चुका था। उस का विश्वास है—

" मैत्री करुणा में कल्याण
विश्व-बन्धुता में ही त्राण "

संसार में अनेक मत-मतान्तर हैं। अनेक धर्म हैं, और उनके अनेक भेद तथा उपभेद हैं। पर गन्तव्य स्थान सब का एक ही है। तनिक गहरे जाकर सोचों तो समस्त भिन्नता में भी एकता है—

" आकृति, वर्ण और बहुवेष,
ये सब नित वैचित्र्य विशेष,
डालो अन्तर्दृष्टि निमेष,
देखो अहा ! एक ही प्राण— "

कुणाल को ग्राम-जीवन और प्रकृति से प्रेम है। पत्नी कांचनमालाको वह गाँव की और चलने को कहता है—

" चलो गाँव की ओर, जहाँ जन सभी एकसे मिले जुले।
मनुज सभी श्रद्धालु सुखी हैं
स्त्रियाँ संगिनि सरल सुखी हैं "

प्रकृति से मनोरम दृश्य उसको भाते हैं। अपने पत्नी का भी मनोविनोद वह प्रकृति के द्वारा करता है ... !

" देखती चलो वहीं के रंग !
प्रकृति वायु-सेवन करती- सी खडी खोल कर अंग ! "

नर नारी के विना अपूर्ण है। नारी नर की पूर्णता होती है। कुणाल की पूर्णता उस की अर्धांगिनि कांचनमाला में हम पाते हैं। कुणाल की बहुत सी कठिनाईयाँ अपने कर्तव्य-परायणा, पतिव्रता पत्नी के साथ रहने से आसान हो गयी है। एकपत्नीव्रती कुणाल भी उस की ओर बहुत ध्यान रखता है।

" तुझ में मेरा सारा जग है,
मेरे पग हैं तेरा मग है "

कुणालका प्रणयभाव यद्यपि मुखर नहीं, फिरभी जो उसकी अभिव्यक्ति जहाँ–तहाँ हुयी है वह निःसंदेह मनोहर है। पत्नीके प्रति प्रेमकी गहराई निम्नलिखित पँक्तियोंमें निहित है।

" पीठ भेदते हैं तृण तेरी,
छाती छेद रहे व्रण मेरी
मेरी बाँह उसीसे रख ले "

कुणाल मृत्युंजय हो चुका है। मृत्युकी उसे चिन्ता नहीं। वह मृत्युको चुनौती देता है। जीवन–मरणके रहस्यको जान चुका है।

" रहे मरण, फिर आगया मैं
देख जीवन ही अमर है, जन्म फिर पागया मैं। "

अन्तमें हम कह सकते हैं कि कुणाल महान् पिता का महान् पुत्र है। उपकार उसका जीवन और कर्तव्य उसकी भावना है। आदर्शपूर्ण जीवन होतेहुए भी दाम्पत्य–प्रणय और प्रकृतिके प्रति, प्रकृति सुषमाके प्रति उल्लासपूर्ण आकर्षणके कारण उसका चरित्र अति मानवीय या अव्यावहारिक नहीं लगता। वह मनुष्य होकर भी देवता है और देवता होकर भी मनुष्य है।

———



# मैं अजन्ता हूँ !

ले.– प्र. न. भावसार,
[ पी. डी सायन्स ]

मैं आदर्श शिल्पकला हूँ, उत्कृष्ट चित्रकारी हूँ, सुंदर साधना का अमर रूप हूँ। मैं बौद्धों का इतिहास हूँ, आर्यों की संस्कृति हूँ, उनकी उच्चता का चिन्ह हूँ, कलाभिरुचि का व उसके विकास का मूर्त स्वरूप हूँ, मैं अजंता हूँ,।

मैं अडिग हूँ, अविचल हूँ। आँधियाँ आयीं, बरसात में पानी ही पानी हुआ, बाढ आयी, बिजलियाँ चमकीं, उल्काएँ गिरीं, भूकंप हुए फिरभी मैं स्थिर हूँ, निर्बिकार हूँ। कितनेही वर्ष हुअे एकही आसन पर स्थानापन्न हूँ। ऋषि-मुनियों की स्थितप्रज्ञताका जीता-जागता उदाहरण हूँ, मैं अजंता हूँ।

एक समय जहाँ चारों ओर बियाबान जंगल ही जंगल था वहाँ अब सडकें मुझ से हाथ मिला रही हैं, मोटरें मुझसे मिलने के लिए दौडी आ रही हैं, जहाँ केवल पशु-पक्षीही थे वहाँ अब इन्सान भी बस रहे हैं, मैं सब को बरबस आकृष्ट करनेवाला अनोखा चुंबक हूँ, मैं अजंता हूँ।

